CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा


SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ७८ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आज विजया एकादशी : रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजी यांचा आज तिथीप्रमाणे जन्मदिन

जसा गंगेच्या प्रवाहातील एक जलबिंदू हा अनित्य आहे; परंतु गंगेचा अखंड प्रवाह नित्य आहे, असेच राष्ट्राचेही आहे. राष्ट्रजीवनाचा प्रवाह चिरंतन चालणारा आहे. म्हणून राष्ट्राची उन्नती नित्य होत राहिली पाहिजे. उन्नतीच्या मार्गात वेळोवेळी येणाऱ्या समस्या अनित्य आहेत. अनित्यासाठी काय करायचे व नित्यासाठी काय करायचे याचा विचार करावा लागेल. आपल्या जीवनात देखील अनित्यासाठी किती वेळ खर्ची घालायचा व नित्यासाठी किती, हा विवेक केला पाहिजे.

**- श्रीगुरुजी**
रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक

# १ १ ४ राफेल खरेदीवर मोहोर

## ३.२५ लाख कोटींच्या कराराला मंजुरी

## अमेरिकेकडून टेहळणी विमानेही मिळणार



वायुदलाची ताकद वाढणार

**नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी**

फ्रान्सच्या द सॉल्ट कंपनीकडून ११४ राफेल लढाऊ विमाने आणि अमेरिकेकडून सहा पी-८आय टेहळणी विमाने खरेदी करण्यास संरक्षण विभागाने मान्यता दिली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेत गुरुवारी झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषद अर्थात् डीएसीच्या बैठकीत ३.२५ लाख कोटींच्या कराराला मान्यता देण्यात आली. मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत नवीन ९६ विमानांची भारतातच निर्मिती केली जाणार आहे, तर १८ विमाने फ्रान्सच्या द सॉल्ट एव्हिएशनकडून तयार स्थितीत येणार आहेत. यामुळे नोकऱ्या वाढतील आणि तंत्रज्ञान हस्तांतरण सुलभ होईल. या निर्णयामुळे वायुदलाची ताकद कैकपटीने वाढणार आहे.



संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेत झालेल्या बैठकीला लष्करप्रमुख, नौदलप्रमुख, वायुदलाचे प्रमुख, सीडीएस अनिल चौहान आणि केंद्रीय गुप्तचर संस्थेचे अधिकारी उपस्थित होते. संरक्षण विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, बैठकीत फ्रान्सच्या द सॉल्ट एव्हिएशन कंपनीकडून ११४ अतिरिक्त राफेल लढाऊ विमाने आणि अमेरिकेकडून सहा पी-८आय टेहळणी विमाने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. कराराची एकूण किंमत ३.२५ लाख कोटी रुपये आहे. भारतीय वायुदलाची लढाऊ क्षमता बळकट करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत राफेल विमानांचे भारतातच उत्पादन केले जाईल. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या भारत भेटीपूर्वी हा निर्णय घेण्यात आला. मॅक्रॉन १५-१७ फेब्रुवारी रोजी राजधानी दिल्लीत होणाऱ्या एआय समिटमध्ये सहभागी होणार असून यावेळी करारावर स्वाक्षरी करण्यात येणार आहे. या कराराला पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाच्या संरक्षण विषय समितीने मान्यता दिल्यानंतर व्यवहाराची पुढील प्रक्रिया पार पडणार आहे. (वृत्तसंस्था)

### हवाई दलासाठी खरेदी का महत्त्वाची?

सध्या भारतीय वायुसेनेकडे केवळ ३६ लढाऊ राफेल विमाने आहे. वायुदलाला मोठ्या प्रमाणात विमानांची कमतरता भासत आहे. पश्चिम आणि उत्तर सीमेवरील वाढत्या सुरक्षा आव्हानांच्या पृष्ठभूमीवर ही खरेदी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

### अशी आहे राफेलची वैशिष्ट्ये?

- राफेल हवेतून हवेत, हवेतून जमिनीवर हल्ला करण्यास, शोध घेण्यास आणि अण्वस्त्रे वाहून नेण्यास सक्षम. ते मेटेओर क्षेपणास्त्र आणि स्कॅल्प क्रूझ क्षेपणास्त्राने सुसज्ज आहे
- नवीन विमाने फ्रेंच कंपनी द सॉल्ट एव्हिएशनकडून मिळवली जातील, परंतु मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत भागीदार कंपनीसह भारतात उत्पादित केली जातील.
- भारताने फ्रान्सकडून ५९,००० कोटी किमतीचे ३६ राफेल विमान खरेदी केले. ते २०२२ पर्यंत वितरित केले गेले आणि अंबाला आणि हाशिमारा हवाई तळांवर तैनात केले गेले.
- चीन आणि पाकिस्तानकडून धोका लक्षात घेता, भारतीय हवाई दलाला आधुनिक विमानांची आवश्यकता आहे. बालाकोट हल्ला आणि लडाख संघर्षात राफेलने आपली क्षमता दाखवली आहे.

# राहुल गांधींविरुद्ध विशेष प्रस्ताव

## सदस्यत्व रद्द करण्याची भाजपाची मागणी

**नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. भाजपाने त्यांच्याविरोधात विशेष प्रकारचा प्रस्ताव लोकसभेत सादर केला आहे.



राहुल गांधी यांची वागणूक शहरी नक्षल्यांसारखी आहे; त्यांचे जॉर्ज सोरोस आणि फोर्ड फाऊंडेशनशी संबंध असल्याचा आरोप भाजपाचे निशिकांत दुबे यांनी प्रस्ताव सादर करतांना केला. राहुल गांधी कधी निवडणूक आयोगावर आरोप करतात तर कधी संविधानावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात, असे दुबे म्हणाले.

राहुल गांधी यांच्याविरुद्ध विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव आणण्याची घोषणा संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी केली होती, त्यानंतर भाजपाने आपल्या व्यूहरचनेत बदल करीत राहुल गांधींविरुद्ध विशेषधिकार भंगाचा नाही तर विशेष प्रकारचा प्रस्ताव आणण्याच्या हालचाली सुरू केल्या होत्या. भाजपाचे निशिकांत दुबे यांनी राहुल गांधींचे लोकसभा सदस्यत्व रद्द करण्याची तसेच त्यांना आजीवन निवडणूक लढवण्यापासून प्रतिबंध करण्याची मागणी करणारा प्रस्ताव गुरुवारी लोकसभेत सादर केला आहे.

### म्हणून आणला विशेष प्रस्ताव

राहुल गांधी यांच्याविरुद्ध विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव आणला तर विरोधक सभागृहात आणखी गोंधळ घालतील आणि कामकाज ठप्प करतील, अशी शक्यता असल्यामुळे भाजपाने विशेष प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेतला. सोरोस फाऊंडेशन, फोर्ड फाऊंडेशन आणि युएसएडच्या माध्यमातून राहुल गांधी वारंवार थायलंड, कंबोडिया, व्हिएतनाम आणि अमेरिकेला जातात आणि तेथे भारतविरोधी शक्तींना भेटत असतात, असा आरोप दुबे यांनी केला.

राहुल गांधी यांनी बुधवारी लोकसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेताना एपस्टीन फाईलचा उल्लेख केला होता तसेच केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी यांचे नावही घेतले होते. अमेरिकेसोबत व्यापार करार करताना मोदी सरकारने देश विकल्याचा आरोपही त्यांनी केला होता. त्यामुळे भाजपाने त्यांच्याविरुद्ध विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव आणण्याची भूमिका घेतली होती. लोकसभेचे कामकाज मंगळवारपासून सुरळीत सुरू झाले आहे. गेल्या आठ दिवसांपासून विरोधकांच्या प्रचंड गदारोळामुळे सभागृहाचे कामकाज ठप्प झाले होते. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### आयटी क्षेत्रावरील दबावामुळे शेअर बाजारात घसरण

**मुंबई :** आयटी क्षेत्रातील समभागांची जोरदार विक्री झाल्यामुळे मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक गुरुवारी ५५८ अंकांनी घसरला. एआय क्षेत्रात



निर्माण झालेले व्यत्यय, अमेरिकी फेडरेशन व्याजकपातीची मावळलेली शक्यतेचा बाजारावर परिणाम झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. आजच्या सत्रात मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ५५८ अंकांनी घसरून ८३,६७४ अंकांवर स्थिरावला. दिवसभराच्या सत्रादरम्यान निर्देशांकाने ७१६ अंकांची घसरण अनुभवली. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १४६ अंकांनी घसरून २५,८०७ या पातळीवर बंद झाला. आजच्या सत्रात टेक महिंद्रा, इन्फोसिस आणि टीसीएसला सर्वाधिक फटका बसला. दुसरीकडे बजाज फायनान्स, आयसीआयसीआय बँक, ट्रेंट, भारत इलेक्ट्रॉनिक लि., भारतीय स्टेट बँकेला फायदा झाला.

### किरकोळ महागाईचा दर २.७५ टक्क्यांवर

**नवी दिल्ली :** गुरुवारी जाहीर झालेल्या अखिल भारतीय ग्राहक किंमत निर्देशांकाच्या (सीपीआय) नवीन मालिकेअंतर्गत, जानेवारीमध्ये किरकोळ महागाईचा दर २.७५ टक्के आहे. याचा आधारवर्ष २०२४ होते. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या नवीन मालिकेत अधिक चांगल्या प्रकारे किमतीची परिस्थिती दाखवण्यासाठी वस्तूंची संख्या २५९ वरून ३०८ आणि सेवांची संख्या ४० वरून ५० पर्यंत वाढवण्यात आली.

## बांगलादेशात बीएनपी आघाडीवर

**ढाका, १२ फेब्रुवारी**

बांगलादेशात गुरुवारी २९९ जागांसाठी ४७.८० टक्के मतदान झाले. मतदानानंतर दोन तासांतच मतमोजणीस सुरुवात झाली. यात बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात् बीएनपी आघाडीवर होती. मतमोजणीच्या पहिल्या टप्प्यात त्यांचे ६० पेक्षा अधिक उमेदवार निवडून आले.

निवडणुकीवेळी अनेक जिल्ह्यातील मतदार केंद्राच्या परिसरात वादावादी आणि हिंसाचाराच्या घटना झाल्या यात ६० पेक्षा अधिक नागरिक जखमी झाले. निवडणुकीत प्रमुख लढत बीएनपी आणि जमात-ए-इस्लामी यांच्यात आहे. सकाळी ७.३० ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत ४७ टक्के मतदान झाले. (वृत्तसंस्था)

# भारताचा नामिबियावर ९३ धावांनी विजय

## इशान किशन, हार्दिक पंड्याचे अर्धशतक

**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषकाच्या १८ व्या सामन्यात भारताने नामिबियाचा ९३ धावांनी पराभव केला. विश्वचषकात टीम इंडियाचा हा सलग दुसरा विजय आहे. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने ९ विकेट गमावत २०९ धावा केल्या. शेवटच्या ४ धावा करताना भारताने ५ विकेट गमावल्या.

इशान किशनने ६१ धावा आणि हार्दिक पंड्याने ५२ धावा केल्या. नामिबियाचा कर्णधार जेरार्ड इरास्मसने ४ विकेट घेतल्या. २१० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नामिबिया १८.२ षटकांत ११६ धावांवर संपुष्टात आला. वरुण चक्रवर्तीने ३, अक्षर आणि हार्दिकने प्रत्येकी २ विकेट घेतल्या. नामिबियाकडून लॉरेन सर्वाधिक २९ धावा केल्या.



**हार्दिक पंड्या**

| | |
|---|---|
| धावा | ५२ |
| चेंडू | २८ |
| चौकार | ०४ |
| षटकार | ०४ |
| विकेट | ०२ |

## एकनाथ खडसेंना हायकोर्टाकडून दिलासा

**मुंबई :** एकनाथ खडसे यांना पुण्यातील भोसरी जमीन खरेदी घोटाळ्याप्रकरणी सत्र न्यायालयात सुरू असलेल्या आरोप निश्चितीच्या प्रक्रियेवर मुंबई हायकोर्टाने स्थगिती दिली. त्यामुळे, खडसे कुटुंबियांविरोधातील १३ मार्च रोजी होणारी आरोप निश्चिती टळली आहे.

# पायलटनेच बंद केले इंधन पुरवठ्याचे बटन?

## विदेशी वृत्तपत्राने प्रसिद्ध केलेल्या अहवालातील धक्कादायक खुलासा

**अहमदाबाद, १२ फेब्रुवारी**

अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडियाच्या विमानाला झालेला अपघात तांत्रिक चूक नसून पायलटनेच इंधन पुरवठ्याचे बटन बंद केले होते, असा धक्कादायक खुलासा इटालियन वृत्तपत्राने प्रकाशित केलेल्या अहवालातून करण्यात आला आहे. या अपघातात २६० नागरिकांचा मृत्यू झाला होता.

अहवालानुसार, ही दुर्घटना केवळ तांत्रिक बिघाडामुळे नसून जाणीवपूर्वक केलेल्या कृतीचा परिणाम असू शकते, असा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केल्याचे म्हटले आहे. मात्र, भारतीय अधिकाऱ्यांकडून अद्याप अंतिम अधिकृत अहवाल जाहीर करण्यात आलेला नसल्याने या दाव्यांबाबत अधिकृत भूमिका स्पष्ट झालेली नाही.

१२ जून २०२५ रोजी एअर इंडियाचे बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमान अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण घेतल्यानंतर काही क्षणांतच कोसळले होते. या अपघातातून




माहितीनुसार, इंजिनमध्ये इंधन पुरवठा अचानक बंद झाल्यानंतर ही दुर्घटना घडली. प्राथमिक तांत्रिक विश्लेषणात कोणताही मोठा यांत्रिक बिघाड आढळून आला नसल्याचे सांगितले जाते. यामुळे तपासकर्त्यांनी कॉकपिटमधील इंधन नियंत्रण स्विचकडे लक्ष केंद्रित केले. ब्लॅक बॉक्समधील ध्वनिमुद्रणात एका पायलटने दुसऱ्याला इंधन बंद केल्याबाबत प्रश्न विचारल्याचे ऐकू आले असून त्यावर संबंधित पायलटने नकार दिल्याचा उल्लेख आहे.

एका वृत्तानुसार, तपास अधिकाऱ्यांना इंजिन इंधन नियंत्रण स्विच मॅन्युअली बंद केल्याचे संकेत मिळाले असून यामुळे विमानाची शक्ती कमी होऊन अपघात झाला असावा, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. यावेळी कॅप्टन सुमित सभरवाल हे विमानाचे कमांडर होते, तर क्लाईव्ह कुंदर हे सह-पायलट म्हणून कार्यरत होते. मात्र नेमकी जबाबदारी कोणाची, याबाबत अधिकृतरीत्या काहीही स्पष्ट झालेले नाही. (वृत्तसंस्था)



# तुकाराम मुंढे यांचा दणका; ९०० संस्थांवर कारवाई

## २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ऑनलाईन नोंदणीची मुदत

**मुंबई, १२ फेब्रुवारी**

राज्यात दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत दिव्यांगांसाठी कार्यरत असलेल्या सर्व संस्थांनी दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. मात्र, विविध कारणांमुळे अपात्र ठरलेल्या सुमारे ९०० संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आल्याची माहिती दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली.

राज्यात अंदाजे दोन हजारांहून अधिक संस्था दिव्यांगांच्या कल्याणासाठी



संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. विभागनिहाय पाहता, कोकण विभागातील ५२, नाशिक ४९, पुणे ६०, नागपूर ४९, अमरावती ५० आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील १०३ संस्थांचा समावेश आहे.

दिव्यांग क्षेत्रात कार्यरत किंवा कार्य करू इच्छिणाऱ्या सर्व संस्थांनी २८ फेब्रुवारी २०२६ पूर्ण करावी. अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

**निधी योग्य संस्थांकडे जाण्यासाठी कारवाई**

सचिव मुंढे यांनी स्पष्ट केले की, संस्था सोसायटी नोंदणी कायदा १८६०, बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा १९५० किंवा कंपनी कायदा (कलम ८) अंतर्गत नोंदणीकृत असली तरी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ५० नुसार स्वतंत्र नोंदणी करणे आवश्यक आहे. शासनाचा निधी योग्य आणि पात्र संस्थांकडेच

## बांगलादेशात हिंदू कामगाराची हत्या

**ढाका, १२ फेब्रुवारी**

सार्वत्रिक मतदानाच्या एक दिवस अगोदर बांगलादेशात आणखी एका हिंदू युवकाची हत्या करण्यात आली आहे. चहाच्या मळ्यात काम करणार रतन कर, असे त्याचे नाव आहे.

ढाक्यापासून २०० किलोमीटर अंतरावर असलेल्या कमालगंज उपजिल्हा भागातील मौलवीबाजार येथील चहाच्या मळ्यात २८ वर्षीय रतनचा मृतदेह पोलिसांना आढळून आला. त्याचे हातपाय बांधलेले होते आणि शरीरावर असंख्य जखमा होत्या. मंगळवारी रात्री आम्ही त्याचा शोध घेत होतो पण बुधवारी सकाळी त्याचा मृतदेह आढळून आला, अशी माहिती रतनच्या भावाने दिली. सार्वत्रिक निवडणुकीशी या घटनेचा संबंध जोडला जात असला तरी तसा

# भरती बंदी उठविली

## राज्यात प्राध्यापकांच्या ५०१२ भरणार

- प्राध्यापकांतून स्वागत, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांतून नाराजी
- सोलापूर विभागातून सुमारे ३५० जागा रिक्त

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

राज्यातील अनुदानित म हाविद्यालयातील प्राध्यापक भरतीस राज्य शासनाने अखेर हिरवा कंदील देत ११ फेब्रुवारी रोजी शासन निर्णय जारी केला आहे. राज्यातील विविध अनुदानित महाविद्यालयातून रिक्त असलेल्या प्राध्यापकांच्या जागांपैकी ५०१२ जागा उच्च शिक्षण विभाग भरणार आहे. प्राध्यापक संघटनेतून स्वागत करण्यात येत आहे. सोलापूर विभागातून ४० सलंग्न महाविद्यालयातून सुमारे ३५० जागा रिक्त असल्याचे सोलापूर विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयतून सांगण्यात आले.

अनेक वर्षे रखडलेली शिक्षक भरती सुरु होणे ही उच्च शिक्षणाच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल आहे. मात्र, याचवेळी महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी भरतीकडे शासनाने



पुन्हा दुर्लक्ष केले आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हे महाविद्यालयीन व्यवस्थारुपी रथाची दोन चाके असल्याचे वारंवार सांगितले जाते. परंतु प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत मात्र शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा रिक्त जागा भरण्याचा शासनाने विचार केला नाही. त्यामुळे शिक्षकेतर कर्मचारी संघटनेतून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

**गुणांकनासाठी ६०-२०-२० चा पॅटर्न**

सार्वजनिक विद्यापीठांतील प्राध्यापक भरतीच्या निकषांमध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागाने चार महिन्यांतच पुन्हा एकदा बदल केला आहे. आता नव्या निकषांनुसार उमेदवारांच्या शैक्षणिक आणि संशोधन गुणवत्तेला ६० गुण, अध्यापन कौशल्य मूल्यमापनाला २० टक्के गुण आणि मुलाखतीसाठी २० टक्के गुण दिले जाणार आहेत. या निर्णयामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील रिक्त १२ पदांपैकी ७ पदांच्या रखडलेल्या भरती प्रक्रियेस गती येणार आहे.

**प्रक्रियेस देण्यात आली होती स्थगिती**

सोलापूर विद्यापीठास पूर्णवेळ कुलसचिवसह, प्राध्यापक भरतीची प्रक्रिया युध्दपातळीवर सुरु झाली होती. ६ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयात नवीन गुणदान पध्दतीचा अवलंब केल्याने त्या प्रक्रियेस स्थगिती देण्यात आली होती. त्या नवीन गुणदानमध्ये शैक्षणिक पात्रतेला ८० व मुलाखतीसाठी २० अशी सरसकट पध्दत होती. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि प्राध्यापक संघटनेने त्यास विरोध केल्याने ऐन निवडणुकांच्या तोंडावर उच्च व तंत्रशिक्षण विभागाची कोंडी झाली होती.

### काय आहेत नवीन निकष?

नव्या निकषानुसार ६० गुण शैक्षणिक आणि संशोधनास, २० टक्के गुण अध्यापन कौशल्य मुल्यमानाला, २० टक्के गुण मुलाखतीसाठी असतील. उमेदवाराच्या शैक्षणिक आणि संशोधन कामगिरीचे गुणांकन करताना त्याने विविध पदव्या घेतलेल्या शिक्षण संस्थांचे एनआयआरएफ आणि क्यूएस रॅंकिंगचाही विचार केला जाणार आहे. नवीन बदलानुसार उमेदवाराच्या अध्यापन कौशल्याच्या मूल्यमापनाला स्वतंत्र २० गुण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे उमेदवारांच्या पदव्या, मुलाखत यांसोबतच वर्गात प्रत्यक्ष शिकविण्याचे कौशल्य या बाबीही भरतीमध्ये महत्त्वपूर्ण राहणार आहेत. यात आधुनिक तंत्रज्ञान आणि भाषाप्रभुत्वाचाही समावेश असेल. या निवड प्रक्रियेत पीएच.डी. आणि एम.फिल. केलेल्या उमेदवारांसाठी १७ गुण तर नेट, सेट केलेल्या उमेदवारांना केवळ ५ गुण दिले जाणार आहेत. त्यातून पीएच.डी. धारकांना अधिक संधी असेल, तसेच नामांकित शिक्षणसंस्थांतील विद्यार्थ्यांना प्राधान्य मिळणार आहे.

### जागा भरताना विषयाचा समतोलही पाळणार

दि.१ ऑक्टोंबर २०२५ च्या विद्यार्थी संख्येनुसार प्राध्यापकांच्या किती जागा रिक्त होतात? याची माहिती उच्च शिक्षण संचालनालयास पाठवण्यात येईल. त्यानुसार रिक्त जागा किती भरावयाच्या? याची संख्या मिळाल्यानंतर सोलापूर विभागातून प्रक्रिया सुरु करण्यात येईल. ह्या जागा भरताना विषयाचा सम तोलही पाळण्यात येईल.

**- डॉ. अजयकुमार जाधव,**
शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण, सोलापूर विभाग

### शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचीही भरती होणे आवश्यक

"कार्यालयीन कामकाज, परीक्षा व्यवस्था, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, वेतननिर्गमन, प्रशासकीय समन्वय आदी सर्व जबाबदाऱ्या शिक्षकेतर कर्मचारी सक्षमपणे पार पाडत असतात. त्यांच्या अभावी शैक्षणिक प्रक्रिया सुरळीत चालूच शकत नाही. शिक्षक भरतीसोबतच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचीही तातडीने भरती होणे आवश्यक आहे. अन्यथा संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा विस्कळीत होण्याचा धोका आहे. शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन शिक्षकेतर कर्मचारी भरतीसही तात्काळ मान्यता द्यावी.

**-राजेंद्र गिड्डे, सरचिटणीस कॉलेज कर्मचारी युनियन, सोलापूर**

### थांबलेली प्रक्रिया आता पुन्हा सुरु होईल

विद्यापीठातील प्राध्यापकांची भरती प्रक्रीया सुरु करण्याचे आदेशानुसार १२ पैकी ७ पदांची थांबलेली प्रक्रीया आता पुन्हा सुरु करण्यात येईल. शासनाच्या निकषानुसार ७ पदांची भरती होईल. रिक्तपदांच्या मंजुरीसाठी विद्यापीठाचा पाठपुरावा सुरु आहे.

**- प्रा.डॉ.अतुल लकडे,**
प्र. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ

### विद्यापीठांमध्ये संशोधक प्राध्यापक येतील

शासनाने स्वतःच्या निर्णयात बदल करुन भरती बाबत घोषणा केली, ही चांगली गोष्ट आहे. या निमित्ताने विद्यापीठांमध्ये संशोधक प्राध्यापक येतील, एनआयआरएफ आणि क्यूएस रॅकींगमध्ये सोलापूर विद्यापीठ सहभागी होईल. आता, संलग्न महाविद्यालयातील रिक्त पदांसाठी त्वरीत निर्णय घ्यावा.

**- प्रा. डॉ. भगवान आदटराव,** सचिव, सुटा संघटना



# माता-बालक उत्कर्ष प्रतिष्ठानचा ४७ वा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१२ फेब्रुवारी -**

माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला या संस्थेच्या ४७ व्या वर्धापन दिनानिमित्त दासनवमीच्या पावन दिनी आयोजित कार्यक्रमात गुणवंत कर्मचारी, मान्यवर तसेच स्पर्धा विजेत्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते समर्थ रामदास यांच्या प्रतिमेचे पूजनाने झाली.

यावेळी पूर्व प्राथमिकच्या सहशिक्षिका विद्या म्हेत्रे, संस्था कार्यालय लेखनिक निहारिका ताकभाते, प्राथमिकचे सहशिक्षक नवनाथ शेळके, माध्यमिकच्या सहशिक्षिका सुवर्णा सपताळ, शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार महेश फुले तसेच गुणवंत सेविका पुरस्कार स्वाती टेके यांना देऊन त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले.

दासनवमी निमित्त यावर्षी शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ यावेळी पार पडला. याप्रसंगी सांगोल्याचे नूतन नगराध्यक्ष आनंदा माने तसेच नगरसेवक, नगरसेविकांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या मागील ४७ वर्षांच्या कार्याचा आढावा घेणारा दिंडी परिवर्तनाची हा माहितीपटही यावेळी प्रदर्शित करण्यात आला.

याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा प्रा.निलिमा कुलकर्णी, नगराध्यक्ष आनंदा माने, नगरसेविका राणी माने व सुजाता केदार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा.बबन गायकवाड यांनी उत्कर्ष विद्यालयासाठी ११ हजार रुपये देणगी जाहीर केली. कार्यक्रमास संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा डॉ.संजीवनी केळकर, विश्वस्त माधवी देशपांडे, सहसचिव डॉ.केतकी देशपांडे, तिन्ही विभागांचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, कार्यकर्ते उपस्थित होते. संस्थेच्या खजिनदार डॉ.शालिनी कुलकर्णी, सूत्रसंचालन अश्विनी कुलकर्णी यांनी केले. आभार मंगल कुलकर्णी यांनी मानले.



# १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसाचा दर्जा

**◆ मुंबई, १२ फेब्रुवारी**

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १२ ऐतिहासिक किल्ल्यांना 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मानांकन मिळाले असून त्याचे अधिकृत प्रमाणपत्र राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी फ्रान्समधील पॅरिस येथे युनेस्को मुख्यालयात स्वीकारले. सुमारे दीड वर्षांच्या प्रक्रियेनंतर जुलै २०२५ मध्ये युनेस्कोच्या ४७व्या अधिवेशनात हा ऐतिहासिक निर्णय जाहीर करण्यात आला होता.**



या मानांकनामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी या १२ किल्ल्यांना समावेश आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेली गड-किल्ल्यांची साखळी ही प्रभावी लष्करी नियोजन, सुरक्षित शासनव्यवस्था आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचा अद्वितीय नमुना मानली जाते. या वारशाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाल्याने महाराष्ट्रासह देशाचा सन्मान वाढला आहे.

दरम्यान, युनेस्को मुख्यालयात महाराष्ट्र शासनातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्यास मंत्री आशिष शेलार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त या पुतळ्याची स्थापना करण्यात आली होती. सामाजिक न्याय, समानता आणि बंधुतेचा संदेश देणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या विचारांना जागतिक पातळीवर अभिवादन करण्याचा हा महत्त्वाचा क्षण असल्याची भावना मंत्री शेलार यांनी व्यक्त केली. या संपूर्ण प्रक्रियेत केंद्र व राज्य सरकारच्या मार्गदर्शनाबद्दल तसेच युनेस्कोमधील भारताचे स्थायी प्रतिनिधी आणि संबंधित अधिकाऱ्यांचे मंत्री शेलार यांनी आभार मानले. हा महाराष्ट्र, देश आणि शिवप्रेमींसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे त्यांनी सांगितले. ◀(तभा वृत्तसेवा)

**शिवभक्त, देशासाठी अभिमानाचा क्षण**

# पंढरपूर नगरपरिषदेतर्फे आज महास्वच्छता अभियान

**पंढरपूर, दि.१२ फेब्रुवारी -**

पंढरपूर नगरपरिषदेकडून १३ फेब्रुवारीला महास्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वच्छ पंढरपूरसाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ.सौ.प्रणिता भगीरथ भालके यांनी केले. अभियाना संदर्भात माहिती देताना नगराध्यक्षा भालके यांनी सांगितले की, नगरपरिषदेतर्फे १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता महास्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियाना अंतर्गत शहरातील पद्मावती उद्यान, स्टेशन रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौकसह या अभियानांतर्गत पद्मावती उद्यान, स्टेशन रोड परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, विवेक वर्धिनी शाळा परिसर तसेच भक्ती मार्ग रोड परिसर येथे विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे.

लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ.प्रणिता भगीरथ भालके यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, स्वच्छ पंढरपूर ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.शहर स्वच्छ ठेवण्या साठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. या उपक्रमात सर्व शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, विविध संघटना, नगरपरिषद कर्मचारी तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ए.आय.वापरावर जनजागृती

**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

इंटरनेटचा सुरक्षित, जबाबदार व प्रभावी वापर समाजात व्हावा, या उद्देशाने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर येथे इंटरनेट दिवसनिमित्त आर्टिफिशियल इंटेलिजन्स विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य मनोज बिडकर यांनी इंटरनेटच्या सुरक्षित वापरावर मार्गदर्शन केले.



इंटरनेटचे फायदे जितके आहेत तितकेच धोकेही असल्याने प्रत्येकाने जागरूक राहणे गरजेचे अडून,फसव्या लिंक, बनावट कॉल, ब्लॅकमेलिंग व आर्थिक फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन बिडकर यांनी केले.

यावेळी कार्यक्रमास एनआयसी अधिकारी रवी पवार, प्राचार्य मनोज बिडकर, असरेड्डी, शिल्पनिरीक्षक नितीन भांगे, मस्करे, अमित चव्हाण, गटनिदेशक म्हेत्रे, गटनिदेशक गोरेकर उपस्थित होते. तद्नंतर एनआयसी अधिकारी रवी पवार यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या दैनंदिन वापराविषयी माहिती दिली. कार्यक्रमात सायबर हायजिन, मजबूत पासवर्ड, टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन, संशयास्पद लिंकपासून दूर राहणे यावर भर

# ओंकार ग्रुपकडून ५० लाख क्रशिंग; शेतकऱ्यांना १२७० कोटी ऊस बिले अदा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१२ फेब्रुवारी-**

चालू गळीत हंगामात ओंकार ग्रुपच्या सर्व साखर कारखानाकडून आत्ता पर्यंत ५० लाख मे.टन ऊस गाळप केला आहे. शेतकरी जगला पाहिजे, शेतकऱ्याच्या घामाला योग्य दाम मिळालाच पाहिजे या उदार भूमिकेतून हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना १२७० कोटी रु चे ऊस बिले वेळेत अदा केली आहे.

गाळपासाठी शेतकऱ्यांनी पुरवठा केलेल्या ऊसापोटी ओंकार शुगर ग्रुपने १२७० कोटी रुपयांचे ऊस बिल सर्व युनिट्समार्फत अदा केली असून सर्वोच्च ऊस दर, काट्यावर योग्य वजन आणि वेळेवर ऊस बिल ही ओंकार शुगर ग्रुपची ठाम ओळख असल्यांची परंपरा याही हंगामात कृतीतून सिद्ध केली आहे. शेतकरी जगला पाहिजे, शेतकऱ्याच्या घामाला योग्य दाम मिळालाच पाहिजे. कुठेही वजन करा आणि ऊस घेऊन या काटा बरोबरच राहील, शेतकऱ्याला सर्वोच्च ऊस दर दिला जाईल आणि ऊस बिल वेळेत मिळेल अशी प्रतिपादन ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील यांनी केली आहे. ओंकार शुगर ग्रुपच्या विविध युनिट्समध्ये आधुनिक यंत्रसामग्री, पारदर्शक व्यवस्थापन आणि नियोजनबद्ध गाळपामुळे शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळपाला गेला. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला नाही.शेतकऱ्यांचा ऊस हा आमची जबाबदारी आहे या भावनेतून कामकाज केले आहे.



ओंकार ग्रुपने केवळ साखर उत्पादनच नव्हे तर शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास आणि स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती साधत आहे. भविष्यातही शेतकरी केंद्रबिंदू ही भूमिका कायम ठेवत, ओंकार शुगर ग्रुप शेतकरी हितासाठी, ग्रामीण विकासासाठी आणि विश्वासार्ह उद्योग समूह म्हणून वाटचाल सातत्याने पुढे असेल असा विश्वास शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

**- बाबुराव बोत्रे-पाटील, चेअरमन ओंकार शुगर ग्रुप**

# कोन्हाळी सरपंच चिदानंद उण्णद यांचा जातीचा दाखला वैध

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१२ फेब्रुवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी गावचे सरपंच चिदानंद सिध्दप्पा उण्णद यांचा हिंदू-कोष्टी इतर मागासवर्गीय ओबीसी प्रवर्गातील जातीचा दाखला वैध असल्याचा निकाल कोल्हापूर येथील सर्किट बेंच येथील न्यायाधीश अजित बी. कडेठाणकर आणि आर. जी. अवचट यांच्या उच्च न्यायालयाच्या न्यायपालिकेने दिला आहे.



यामुळे उण्णद कुटुंबियांना मोठा दिलासा आहे. चिदानंद उण्णद विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर प्रतिवादी यांच्यात चिदानंद उण्णद यांचा जातीचा दाखला अवैध असल्याचा कोर्टात वाद सुरु होता. यामुळेच चिदानंद उण्णद यांचे सरपंचपद देखील धोक्यात आले होते.

या न्यायालय निकाला मुळे चिदानंद उण्णद कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे.चिदानंद उण्णद यांच्या जातीचा दाखला त्यांचा मुलगा सिध्देश चिदानंद उण्णद यांच्या जारी केलेल्या वैधतेच्या प्रमाणपत्राचा आधार घेऊन दि ५ फेब्रुवारी २६ रोजी हा निकाल देण्यात आला आहे.

या निकालामुळे दि.११ जून २४ रोजीचा विवादित आदेश रद्द करण्यात आला आहे. याचिकाकर्त्याकडून ॲड. राकेश भाटकर, ॲड. मोहित दळवी, ॲड. आर्या अंबुलकर तर प्रतिवादी कडून तेजस जयप्रकाश कापरे यांनी काम पाहिले.

# 'लायन्स'मध्ये आंतरशालेय मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. १२ फेब्रुवारी-**

येथील लायन्स प्राथमिक शाळेत समर्थ भारत अभियान, पुणे यांच्या माध्यमातून आंतरशालेय मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धा उत्साहात पार पडली.

या स्पर्धेत अक्कलकोट शहरातील विश्व इंटरनॅशनल अकॅडमी (शिवपुरी), लायन्स प्राथमिक शाळा, संस्कार प्री स्कूल (एवन चौक), श्री शहाजी हायस्कूल, शारदामाता इंग्लिश मीडियम स्कूल आणि गिरीजामाता कल्याणशेट्टी हायस्कूल या सहा शाळांनी सहभाग नोंदविला. प्रथम शाळास्तरावर स्पर्धा घेऊन त्यातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आंतरशालेय स्तरावरील अंतिम स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत विविध गटांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पाठांतर सादर करत उपस्थितांची दाद मिळवली.

दीक्षाभूमी गायकवाड, रियांशी चव्हाण, प्रज्वल लंगोटे, शंभूराजे सावंत, लोकीत भोसले, शिवतेज सावंत, स्पृहा शहा, तृप्ती नरुणे, आचल जाजू, वेद गवंडी, श्रेयस मठपती, श्रावणी पुजारी, समृद्धी कालीबत्ते, तेजश्री नरुणे, समर्थ चितली, रोहन नरुणे आणि अमृता जगदाळे.या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी आहे.यापैकी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय मनाचे श्लोक



पाठांतर स्पर्धेसाठी निवड करण्यात आली असून सदर स्पर्धा दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी महर्षी कर्वे शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सौ. डॉ. शिवलीला शिरवाळ पाटील व श्री संतोष वगाले यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच श्री माधव शिरोळे, सौ. प्रतिभा रणसुभे, ग्रामोपाध्ये वहिनी, श्रीमती मनीषा करंदीकर, अक्षय सरदेशमुख व आदित्य जोशी यांनी परीक्षक म्हणून कार्य पाहिले. अक्कलकोट विभाग संयोजक म्हणून श्री राजीव कोरे यांनी परिश्रम घेतले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

## महाशिवरात्रीनिमित्त बंकलगीत यात्रा महोत्सव

**दक्षिण सोलापूर :**

गिरणारे मुक्त धाम आश्रमतर्फे महाशिवरात्रीनिमित्त १४ ते १६ फेब्रुवारीपर्यंत यात्रा महोत्सव आयोजिल्याची माहिती व्यवस्थापक समितीच्या वतीने रूपनुरे यांनी दिली. या कार्यक्रमास सितारामजी बापू महांतेश महाराज (बंकलगी), सिद्धानंद महाराज (दुधनी), ईशप्रसाद स्वामीजी अमोघसिद्ध महाराज (संजवाड) कडलासकर महाराज उपस्थित राहणार आहेत. पूजा, होमअर्चक, प्रसादसेवा आशिष देशमुख, सागर हरकरे, भैरप्पा कोणदे,सचिन चौगुले, धर्मण्णा कोणदे हे करणार आहेत. गोपूजन, सुवासिनी भोजन होणार आहे. ज्ञानेश्वरी भजनी मंडळ बंकलगी यांच्याकडून भजन सादर होणार आहे. प्रकाश अर्जुन, नागनाथ पुजारी, आनंद अर्जुन यांच्या वतीने गायन होईल.

# सात वर्षाच्या मुलीवर अनैसर्गिक अत्याचार; आरोपीस २० वर्षे सश्रम कारावास

- **बार्शी सेशन कोर्टाचा निर्णय**
- **२४ हजारांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी/माढा, दि. १२ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील सात वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर अनैसर्गिक अत्याचार केल्याप्रकरणी बार्शी येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी आरोपी गणेश मारुती पवार यास दोषी ठरवत २० वर्षे सश्रम कारावास व एकूण २४ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंडाची संपूर्ण रक्कम पीडित मुलीस नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

प्राप्त माहितीनुसार, दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास पीडित मुलगी टीव्ही पाहण्यासाठी आरोपीच्या घरी गेली होती. त्यावेळी घरात कोणी नसल्याचा फायदा घेत आरोपीने तिला स्वयंपाकघरात नेऊन अनैसर्गिक अत्याचार केला. घटनेबाबत कुणाला सांगितल्यास जिवे मारण्याची धमकीही दिली. घरी परतल्यानंतर मुलगी घाबरलेली दिसल्याने आई-वडिलांनी विचारपूस केली असता तिने घडलेला प्रकार सांगितला.



यानंतर पीडितेच्या आईने माढा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. आरोपीविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ अंतर्गत कलम ४, ६, ८, १२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर व दप्तरी पोलीस हेड कॉन्स्टेबल संदीप निचळ यांनी तपास करुन आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र सादर केले. सरकार पक्षातर्फे एकूण सात साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली.

फिर्यादी, पीडिता, वैद्यकीय अधिकारी तसेच तपास अधिकारी यांच्या साक्षी आणि तपासादरम्यान गोळा केलेले पुरावे न्यायालयासमोर मांडण्यात आले. सरकार पक्षाचे वकील ॲड. दिनेश देशमुख यांनी प्रभावी युक्तिवाद करत आरोपीविरुद्ध ठोस पुरावे सादर केले. पुराव्यांचा व युक्तिवादाचा विचार करुन न्यायालयाने आरोपीस भा.दं.वि. कलम ३७७ अंतर्गत १० वर्षे सक्त मजुरी व ५ हजार रुपये दंड, तसेच पोक्सो कायद्यानुसार विविध कलमांखाली स्वतंत्र शिक्षा सुनावल्या. त्यामध्ये कलम ६ अंतर्गत २० वर्षे सक्त मजुरी व १० हजार रुपये दंड अशी मुख्य शिक्षा आहे. सर्व शिक्षा एकत्रित भोगण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या खटल्यात सरकारी वकील दिनेश देशमुख यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोलीस हवालदार अमृत खेडकर व महिला पोलीस अमलदार रीना शेख यांनी साक्षीदारांना योग्य मार्गदर्शन करुन न्यायालयात हजर ठेवण्याची जबाबदारी पार पाडली. उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर व सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर यांनी तपास प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली.

# 'कल्याणशेट्टी'मध्ये कॉपीमुक्त परीक्षा यंत्रणा

**गट शिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांनी केली पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१२ फेब्रुवारी-**

सौ.सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १२ वी परीक्षा केंद्रातील परीक्षा यंत्रणा अतिशय कार्यक्षम असल्यामुळे परीक्षा अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात सुरू आहे. विद्यालयाची ही कामगिरी कौतुकास्पद आहे, परीक्षा केंद्राच्या परिसरात कमालीची शांतता असून आम्ही तर गुरुकुलाची शांतता येथे अनुभवली असे मत गट शिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांनी व्यक्त केले.

सध्या बारावीच्या परीक्षा सुरू आहेत, त्यानिमित्त महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयात बारावी मराठी विषयाच्या पेपर दिवशी अचानक भेट देऊन प्रत्यक्ष परीक्षा हॉलमध्ये जाऊन त्यांनी परीक्षा पद्धतीची पाहणी केली, त्यानंतर पर्यवेक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य तथा केंद्रप्रमुख मलकप्पा भरमशेट्टी व प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यालयाने परीक्षा कॉपीमुक्त, पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी परिसर व प्रत्येक वर्ग खोलीत सी सी कॅमेरे बसवलेले आहेत सर्व विद्यार्थी नियमांचे पालन करून एकाग्रतेने प्रश्नपत्रिका सोडवत असल्याचे चित्र दिसून आले . पर्यवेक्षक आणि शिक्षक सतत लक्ष ठेवून परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी सहकार्याची भूमिका पार पाडत आहेत. शांत आणि सुरक्षित वातावरणामुळे विद्यार्थी निर्धास्तपणे आपले ज्ञान प्रदर्शित करताना दिसले, त्यामुळे आपण समाधानी आहोत अशी प्रतिक्रिया गटशिक्षणाधिकारी अरबाळे यांनी व्यक्त केली. यावेळी बैठे पथक म्हणून विषय तज्ञ गोविंद राठोड, शंकर आजगोंडा तसेच भरारी पथकातील केंद्रप्रमुख वीरेंद्र गजा हे उपस्थित होते.



**परीक्षेसाठी शिक्षकांची यंत्रणा**

परीक्षा व्यवस्थित, सुरळीत आणि यशस्वीपणे पार पडाव्यात म्हणून शिक्षकांची यंत्रणा सज्ज करण्यात आली असून अनुचित प्रकार घडणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घेण्यात आली असल्याचे यावेळी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांनी सांगितले.

# स्वयंम योजना वसतिगृह प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्जाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या जिल्हायातील प्रथम वर्षातील विदयार्थ्यांसाठी वसतिगृह आधार व स्वयंम योजनेकरीता अर्ज करण्याची प्रक्रिया दि. ६ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सुरू राहणार असल्याचे सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण गणेश सोनटक्के यांनी कळविले आहे.

ऑनलाईन अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध असून प्रवेश प्रक्रियेचा गरजु व पात्र विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बी.ए./बी.कॉम/बी.एस.सी. अशा १२ वी नंतरच्या उच्च शिक्षण घेण्याऱ्या व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमा साठी शासकीय वसतिगृह/स्वयंम व आधार सन २०२५-२६ साठीचे प्रवेशाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे - प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी - दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ ते दिनांक १५ फेब्रुवारी २०२६,

▸ **अर्ज छाननी करावयाचा कालावधी** - दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ ते दि.१८ फेब्रुवारी २०२६ ▸ **पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार अंतिम करणे व प्रसिध्द करणे** - दिनांक २० फेब्रुवारी २०२६ ▸ **पहिल्या निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत** - दिनांक २६ फेब्रुवारी २०२६

# दिल्ली बॉम्बस्फोटात जैशचा हात

## संयुक्त राष्ट्रांच्या अहवालातील माहिती ● महिला दहशतवाद्यांची घेतली मदत

◆ **न्यू यॉर्क, १२ फेब्रुवारी**

राजधानी दिल्लीत गेल्या वर्षी ९ नोव्हेंबरला ऐतिहासिक लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटासाठी पाकिस्तानातील दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मद जबाबदार आहे. या हल्ल्यात पहिल्यांदाच महिला दहशतवाद्यांचा समावेश करण्यात आला होता. भारताच्या सरकारला हादरविणे आणि जागतिक स्तरावर शक्तीचे प्रदर्शन करण्याचा दहशतवादी संघटनेचा उद्देश होता, असे संयुक्त राष्ट्र संघाने जारी केलेल्या अहवालात म्हटले आहे.



संयुक्त राष्ट्रसंघाच्या दहशतवाद देखरेख तपास पथकाच्या अहवालात पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदचा दिल्ली हल्ल्याशी संबंध जोडण्यात आला. या अहवालात संघटनेच्या नवीन कटाबद्दलही चिंता व्यक्त करण्यात आली, ज्यामध्ये महिलांसाठी स्वतंत्र शाखा तयार करणे आणि दहशतवादी कारवायांमध्ये त्यांचा सहभाग समाविष्ट आहे. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यातील तिन्ही दहशतवादीही मारले गेल्याचा उल्लेख अहवालात आहे. ३३ पानांच्या अहवालात दिल्ली बॉम्बस्फोटासंदर्भात म्हटले की, जैशने दिल्ली हल्ल्याची योजना भारताने पाकिस्तानात राबविलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर आखली होती. यासाठी त्यांनी उच्चशिक्षितांना हाताशी धरले, याशिवाय महिला दहशतवाद्यांचा समावेश करून घेतला. यावेळी आर्थिक पुरवठ्यासाठी त्यांनी स्थानिकांची मदत घेतली. दिल्लीसह सहा शहरांत एकाचवेळी स्फोट घडविण्याचा त्यांचा उद्देश होता, मात्र घातपाताची योजना भारतीय तपास यंत्रणांनी उघडकीस आणल्याने मोठे नुकसान टळले. दरम्यान एनआयएन या हल्ल्यासाठी जैश-ए-मोहम्मद आणि अंसार गजवात-उल-हिंदला जबाबदार मानले आहे. या प्रकरणात आतापर्यंत ९ लोकांना अटक करण्यात आली, त्यात तीन डॉक्टरांचाही समावेश आहे.

### मोठ्या हल्ल्याची योजना

जैश-ए-मोहम्मद भारतात सक्रिय असून मोठ्या हल्ल्यांची योजना आखत आहे. मध्य आणि दक्षिण आशियातील वाढत्या दहशतवादी धोक्यासंदर्भात अहवालात म्हटले की, अनेक दहशतवादी संघटना प्रादेशिक अस्थिरता निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे. नवीन भरती, क्षमता मजबूत करणे आणि नेटवर्क वाढविण्यावर त्यांचा भर आहे. ◂(वृत्तसंस्था)

### हल्ल्याची पद्धत बदलली

बंदी घातलेल्या दहशतवादी संघटना त्यांच्या पद्धती बदलत आहेत. हल्ल्यांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी दीर्घकालीन परिणामावर लक्ष केंद्रीत करीत आहेत. जैश-ए-मोहम्मद आता निवडक आणि उच्च प्रभाव हल्ला करण्याला प्राधान्य देत आहे. संघटनेत पुनर्रचना आणि बळकटीकरण करण्याचे प्रयत्न देखील सुरू आहेत. संघटना आपली उपस्थिती टिकवून ठेवू इच्छित आहे आणि तिच्या क्षमता कमी झालेल्या नाहीत. ■

### जमात-उल-मुमिनातला प्रतिबंधित यादीत टाकावे

जैश प्रमुख मसूद अजहरने ऑक्टोबर २०२५ मध्ये महिला दहशतवाद्यांची एक वेगळी शाखा (विंग) तयार केली होती. तिचे नाव जमात-उल-मुमिनात आहे. ही शाखा दहशतवादी कारवायांना पाठिंबा देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. मात्र, ही शाखा संयुक्त राष्ट्रांच्या यादीत समाविष्ट नसल्याने चिंता व्यक्त करण्यात आली. या संघटनेला प्रतिबंधित यादीत टाकावे अशी शिफारस अहवालातून करण्यात आली. ■

# दीपू दासच्या कुटुंबीयांनी ५० लाखांची मदत नाकारली

## सरकारला सुनावले, भरपाई नको, आरोपींना फाशी हवी

◆ **ढाका, १२ फेब्रुवारी**

बांगलादेशमध्ये जमावाच्या हिंसाचाराचा बळी ठरलेल्या कारखान्यातील कामगार दीपू चंद्र दासच्या कुटुंबाने सरकारने जारी केलेली ५० लाख टका (बांगलादेशी चलन) मदत नाकारली. पैशाने दीपूच्या जीवाची किंमत मोजता येणार नाही, आम्हाला भरपाई नको, आरोपींना फाशी द्यावी, अशा शब्दात मदतीचा धनादेश घेऊन आलेल्या अधिकाऱ्यांना कुटुंबातील सदस्यांनी सुनावले.

कोणतीही संपत्ती दीपूच्या जीवाची जागा घेऊ शकत नाही असे कुटुंबीयांनी वृत्तसंस्थेशी बोलताना म्हटले आहे. बांगलादेश सरकारचे अंतरिम सल्लागार मोहम्मद युनूस यांनी दोन दिवसांपूर्वी दीपूच्या कुटुंबीयांची भेट घेतली होती आणि त्यांनी आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार बुधवारी प्रशासनाचे अधिकारी दीपूच्या घरी धनादेश घेऊन पोहोचले असता, त्यांनी भरपाई नाकारली. एका अधिकाऱ्याने सांगितले की, सरकारने दिपूच्या कुटुंबाला २५ लाख टका घरबांधणीची मदत जाहीर केली आणि राष्ट्रीय गृहनिर्माण प्राधिकरणाला घर बांधण्याचे आदेश दिले. दीपूचे वडील आणि पत्नीला प्रत्येकी १० लाख टका मिळतील. त्याच्या मुलाच्या नावावर पाच लाख टक दिले जाईल. ही मदत कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आहे.



### हत्येप्रकरणी २२ जणांना अटक

गेल्यावर्षी १८ डिसेंबर रोजी मयमनसिंग जिल्ह्यातील भालुका येथे जमावाने दीपू दासची निर्घृण हत्या केली होती. जमावाने दिपूवर इस्लामचा अनादर केल्याचा आरोप केला आणि त्याचा मृतदेह जाळून टाकला. या घटनेचा जगभरातून निषेध करण्यात आला आणि बांगलादेशातील धार्मिक अल्पसंख्याकांच्या संरक्षणाचा मुद्दा समोर आला. ◂(वृत्तसंस्था)

### माझा मुलगा परत आणून देता का ?

दिपूचे वडील रबी चंद्र दास म्हणाले, ५० लाख टका विसरून जा, जगातील सर्व पैसे देखील आमची भरपाई करू शकत नाही, तुम्ही माझा मुलगा परत आणू शकता का, आम्हाला माझ्या मुलाच्या मारेकऱ्यांना शिक्षा हवी आहे. हा खटला अशा पद्धतीने चालवला पाहिजे की तो देशाच्या कायद्यात एक आदर्श निर्माण करेल. दीपू कुटुंबाचा एकमेव कमावता होता. त्याला इतक्या क्रूरपणे मारले जाईल, असे मला कधीच वाटले नव्हते. ■

# गाझात हल्ल्यासाठी व्हॅक्यूम बॉम्बचा वापर

## मानवाधिकार संघटनांचा इस्रायलवर आरोप | हजारो मृतदेहाचा थांगपत्ताच नाही

◆ **वॉशिंग्टन, १२ फेब्रुवारी**

गाझा पट्टीत हल्ला करण्यासाठी इस्रायलने 'व्हॅक्यूम बॉम्ब' वापरला, यामुळे हजारो मृतदेह जळून राख झाल्याने अनेक मृतदेह अद्याप सापडलेच नसल्याचा आरोप मानवाधिकार संघटनांनी केला.

वॉशिंग्टन पोस्ट मध्ये 'द रेस्ट ऑफ द स्टोरी' या शिर्षकातंर्गत प्रकाशित करण्यात आलेल्या अहवालात म्हटले की, हे बॉम्ब आधी हवेत ढग पसरवतात आणि नंतर आग लावते. यामुळे आगीचा एक मोठा गोळा तयार होतो आणि आजूबाजूची हवा खेचली जाऊन एक प्रकारची पोकळ (व्हॅक्यूम) स्थिती निर्माण होते. या स्फोटांमुळे तापमान ३,५०० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचते. या बॉम्बमध्ये अॅल्युमिनियम आणि मॅग्नेशियमसारखे घटक असतात, जे काही सेकंदात शरीराला जाळून टाकतात. लष्करी तज्ज्ञ, प्रत्यक्षदर्शींनी केलेल्या दाव्याच्या आधारे मानवाधिकार संघटनांनी जारी केलेल्या निवेदनाच्या आधारे अहवाल प्रकाशित करण्यात आला. मृतकांची ओळख पटू नये आणि हल्ल्याची तीव्रता वाढविण्यासाठी 'व्हॅक्यूम बॉम्ब' बॉम्बचा वापर करण्यात आला, यात ३५०० नागरिकांचा मृत्यू झाला. अल-ताबीन शाळेवर झालेल्या हल्ल्यानंतर घटनास्थळी मृतदेहच सापडले नव्हते,तिथे केवळ राख शिल्लक होती. शाळेवर हल्ल्यासाठी 'व्हॅक्यूम बॉम्ब' बॉम्बचा वापर करण्यात आला. हजारो माता आजही आपल्या रुग्णालये आणि शवागारांमध्ये नातेवाईकांचे मृतदेह शोधत आहेत. दाट लोकवस्तीच्या भागात अशा बॉम्बचा वापर करणे गंभीर बाब असल्याचे अहवालात नमूद आहे. ◂(वृत्तसंस्था)

### व्हॅक्यूम बॉम्बचे प्रकार आणि तीव्रता

**एमके-८४ 'हॅमर'**: सुमारे ९०० किलोचा बॉम्ब, जो ३,५०० अंश सेल्सिअसपर्यंत तापमान निर्माण करू शकतो. याचा दाब आणि उष्णता शरीराला जाळून टाकते

**बीएलयू-१०९ बंकर बस्टर**: हे मजबूत संरचनेत घुसून आत स्फोट घडवते आणि बंद ठिकाणी आगीचा मोठा गोळा तयार करते.

**जीबीयू-३९**: याला अचूक लक्ष्य साधणारे ग्लाइड बॉम्ब म्हटले जाते. अल-तबिन शाळेवरील हल्ल्यात याचाच वापर केल्याची शक्यता वर्तवण्यात आली

यांचा परिणाम इतका भीषण असतो की इमारत बाहेरून जास्त खराब दिसत नाही, परंतु आत असलेली प्रत्येक गोष्ट जळून खाक होऊ शकते. ■

# लष्कराचा जवान श्रीनगरमधून बेपत्ता

◆ **श्रीनगर, १२ फेब्रुवारी**

भारतीय लष्करातील १० व्या बटालियनमध्ये तैनात एसएसबीचा जवान टिंकू कुमार बेपत्ता झाला. एका महिन्याच्या रजेनंतर तो बुधवारी बटालियनमध्ये हजर होणार होता. तथापि, श्रीनगर विमानतळावर उतरल्यानंतर त्याचा कोणताही पत्ता लागला नाही. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. टिंकू कुमार १२ जानेवारी ते १० फेब्रुवारीदरम्यान ३० दिवसांच्या रजेवर होता. तो ११ फेब्रुवारी रोजी १० व्या बटालियनमध्ये हजर होणार होता. तथापि, तो श्रीनगर विमानतळावर उतरल्यापासून बेपत्ता असल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. भारतीय लष्कराकडून माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. यापूर्वी, दक्षिण काश्मीरमधील कोकेरनागच्या गडोल वनक्षेत्रातही दोन लष्करी कमांडो बेपत्ता झाले होते. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी बेपत्ता झालेले दोन्ही सैनिक ५ पॅरा येथील अग्नीवीर होते. दोन्ही सैनिक गस्तीदरम्यान बेपत्ता झाले होते. त्यापैकी एकाचा मृतदेह दोन-तीन दिवसांनी सापडला. ◂(वृत्तसंस्था)

# मुख्यमंत्र्यांच्या मानहानीच्या खटल्याला अंतरिम स्थगिती

◆ **दीसपूर, १२ फेब्रुवारी**

आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांची बदनामी केल्याच्या आरोपात काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांच्याविरोधात दाखल केलेल्या ५०० कोटींच्या मानहानीच्या खटल्याला कामरूप न्यायायालयाने गुरुवारी अंतरिम स्थगिती दिली. गोगोई यांनी हस्तक्षेप अर्ज सादर केल्यानंतर न्यायालयाने त्यांच्यासह सात जणांना प्रत्यक्ष न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले. न्यायालयाने याप्रकरणाची सुनावणी ९ मार्च रोजी निश्चित केली. गोगोई यांनी सरमा आणि त्यांच्या कुटुंबीयांवर जमीन घोटाळ्याचा आरोप केल्यानंतर आसामच्या कामरूप जिल्ह्यातील न्यायालयात ५०० कोटी रुपयांचा मानहानीचा खटला दाखल केला होता. न्यायालयाने या खटल्याला अंतरिम स्थगिती दिली. न्यायालयाने आसाम काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि लोकसभा सदस्य गौरव गोगोई यांना मुख्यमंत्र्यांच्या मालमत्तेशी संबंधित कोणतीही विधाने करण्यावर बंदी घातली. ◂(वृत्तसंस्था)



बांगलादेशात सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान झाले. ढाका येथील मतदान केंद्रावर मतदानासाठी रांगेत उभे असलेले नागरिक. सायंकाळी मतदान झाल्यानंतर लगेच मतमोजणीला प्रारंभ झाला

### मंत्री, आमदारांवर माओवादी हल्ल्याची शक्यता

**रांची** : माओवादी गटाकडून मंत्री, आमदारांवर हल्ला होण्याची शक्यता असून सुरक्षेत वाढ करण्यात आल्याची माहिती झारखंड पोलिसांनी निवेदनातून दिली आहे. गुन्हेगार किंवा माओवादी प्रवासादरम्यान मंत्री, आमदारांवर माओवाद्यांकडून हल्ला होण्याची शक्यता असून, त्यांनी दुर्गम भागात जाणे टाळावे असे निर्देश पोलिसांनी जारी केले. पोलिस मुख्यालयाच्या वतीने सर्व जिल्हा पोलिस अधीक्षकांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले. मंत्री आणि आमदार ज्या मार्गांवर प्रवास करतात,तिथे सुरक्षा वाढवावी, संवेदनशील भाग, रस्ते आणि रेल्वे मार्गांवर गस्त वाढवून सुरक्षा बळकट करण्याचे सांगण्यात आले. ■

# इराणने अटी मान्य न केल्यास विध्वंस

## डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा, करारासाठी वाढवला दबाव

◆ **वॉशिंग्टन, १२ फेब्रुवारी**

इराणने अणुचाचणी आणि अण्वस्त्राचा हट्ट सोडावा आणि अणु करारासाठी दिलेल्या अटी मान्य कराव्या अन्यथा त्यांना विध्वंसाला सामोरे जावे लागेल, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी दिली.



इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प यांची भेट घेतली आणि इराणच्या परिस्थितीवर चर्चा केली. बैठकीनंतर ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, इराणसोबत झालेल्या दोन बैठकीतून अद्याप कोणताही निष्कर्ष समोर आलेला नाही. इराणने तत्काळ अणुकरार करण्याचा निर्णय घ्यावा अन्यथा त्यांना विध्वंसाला सामोरे जावे लागेल आणि याची जबाबदारी तेथील सरकारची असेल. आम्हाला वाटाघाटीतून मार्ग काढायचा आहे, मात्र त्यांनी ताठर भूमिका घेतल्यास वाईट परिणाम होतील. मागील कारवाईत अमेरिकेने कसे प्रत्युत्तर दिले, हे इराणी सत्ताधाऱ्यांनी विसरू नये. नेतान्याहू यांच्यासोबत झालेल्या बैठकीची माहिती देताना त्यांनी सांगितले की, आम्ही गाझामध्ये होत असलेल्या प्रगतीबद्दल चर्चा केली. युद्धबंदीनंतर मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित होत आहे. अमेरिकेने आखाती देशांमध्ये लढाऊ युद्धनौका तैनात केल्या आहेत. तसेच इजिप्तमध्ये विमानविरोधी तोफा सज्ज ठेवल्या आहेत. बोलणी फिस्कटल्यास युद्धाचा भडका उडू शकतो. ◂(वृत्तसंस्था)

### सैन्याची तैनाती वाढविली

अणु करार करण्यासाठी ट्रम्प इराणवर दबाव वाढवत आहेत. अमेरिकेचा संरक्षण विभाग पेंटागॉनने इराणच्या सागरी सीमेकडे दुसरी विमानवाहू युद्धनौका स्ट्राइक ग्रुप तैनात करण्याचे आदेश दिले आहेत. वाटाघाटी अयशस्वी झाल्यास ताकदीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. इराणवरील संभाव्य हल्ल्याची तयारी म्हणून या हालचालीकडे पाहिले जात आहे.अमेरिकेची अब्राहम लिंकन युद्धनौका आधीच इराणच्या सागरी सीमेवर तैनात आहे. वाटाघाटी अयशस्वी झाल्यास अमेरिका इराणच्या अणु सुविधा केंद्रावर हल्ल्यासाठी एफ-३५ सारखी गुप्त लढाऊ विमाने वापरण्याची शक्यता आहे. ■

### इराणमध्ये सात हजार निदर्शकांचा मृत्यू

इराणमध्ये सरकारविरोधात सुरू असलेल्या हिंसक आंदोलनात आतापर्यंत सात हजारपेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याचा दावा मानवाधिकार संघटनांना केला आहे. विविध भागात सुरक्षा दल आणि निदर्शकांमध्ये संघर्ष सुरू आहे. आंदोलन दडपण्यासाठी बळाचा वापर केला जात आहे, अनेक ठिकाणी निदर्शकांवर बेछूट गोळीबार करण्यात येत आहे. दरम्यान अमेरिकेने निदर्शकांना लढा सुरू ठेवण्याचे आणि मदतीसाठी लष्करी कारवाईचा विश्वास दिला होता. मात्र अमेरिकेने वाटाघाटी सुरू केल्याने निदर्शकांची भ्रमनिरास झाला.

# अभिव्यक्तीच्या नावाखाली बदनामी करू शकत नाही

## 'घुसखोर पंडत' वरून सुप्रीम कोर्टाने निर्मात्याला सुनावले

**नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी**

अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली तुम्ही समाजातील एखाद्या घटकाची बदनामी करू शकत नाही, अशा कडक शब्दात सुप्रीम कोर्टाने 'घुसखोर पंडत' या शीर्षकावरून चित्रपट निर्माता नीरज पांडेयला गुरूवारी सुनावले आहे. ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफिक्सवर 'घुसखोर पंडत' हा चित्रपट प्रसारित करू नये यासाठी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती.

या चित्रपटाविरोधात न्यायामूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्या. उज्जल भुयान यांनी केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालय, चित्रपट प्रमाणपत्र मंडळ आणि निर्माता नीरज पांडेय यांना नोटीस पाठविली. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा वेगळा विषय आहे. अशा प्रकारचे शीर्षक देऊन तुम्ही समाजातील एखाद्या घटकाची बदनामी का करीत आहात? अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ एखाद्याची बदनामी करण्याचा परवाना नव्हे. अशाप्रकारचे शीर्षक देणे हे सामाजिक सुव्यवस्थेच्या नैतिकतेच्या विरोधात आहे. त्यामुळे जोपर्यंत शीर्षक बदलल्याचे आम्हाला कळविणार नाही तोपर्यंत चित्रपट प्रसारणावर बंदी घालत असल्याचे दोन न्यायालयाने म्हटले आहे. तसेच यासंदर्भात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा निर्देशही न्यायालयाने दिला.

तसेच पुढील सुनावणी १९ तारखेला घेण्याचे निश्चित केले. 'घुसखोर पंडत' या चित्रपटाची घोषणा मुंबईत झालेल्या कार्यक्रमात निर्माता नीरज पांडेय याने केली होती. मनोज वाजपेयी, नुश्रत भरूचा, साकीब सलीम, अक्षय ओबरॉय आणि दिव्या दत्ता यांच्या भूमिका चित्रपटात आहेत. या चित्रपटाच्या विरोधात अखिल भारतीय ब्राम्हण समाजाचे राष्ट्रीय सचिव अतुल मिश्रा यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे.

## चित्रपट वार्ता

### मर्दानी ३ ने केली ४० कोटींहून जास्त कमाई

**मुंबई** : मर्दानी ३ चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दुसऱ्या मंगळवारी १.६० कोटी रुपयांची निव्वळ कमाई करत भारतात एकूण ४० कोटी रुपये कमवले आहेत. यशराज फिल्म्सच्या या चित्रपटात राणी मुखर्जी मुख्य भूमिकेत आहे. चित्रपटाने दुसऱ्या शुक्रवारी २.१५ कोटी, शनिवारी ३.८५ कोटी आणि रविवारी ४.५५ कोटी रुपयांची कमाई केली. दुसऱ्या सोमवारी १.३० कोटी आणि मंगळवारी १.६० कोटी रुपये कमावले आहेत. बुधवारी २.२० कोटी आणि गुरुवारी दोन कोटी रुपयांचे कलेक्शन केले. पहिल्याच दिवशी चित्रपटाने चार कोटी कमावले. ■



### दृश्यम ३ मध्ये दिसणार प्रकाश राज



**मुंबई** : अजय देवगणच्या दृश्यम ३ चित्रपटाच्या कास्टमध्ये प्रकाश राज सामील झाले आहेत. अभिनेत्याने समाज माध्यमांवर ही माहिती शेअर केली. चित्रपटाच्या हिंदी आवृत्तीचे चित्रीकरण सुरू केले असल्याची माहिती प्रकाश राज यांनी इंस्टाग्रामवर पोस्ट करत दिली. त्यांनी याला एक आकर्षक फ्रँचायझी म्हटले आहे तसेच एका उत्कृष्ट टीम आणि दमदार भूमिकेशी जोडले गेल्याचे सांगितले. त्यांनी मी कोणाची जागा घेत नसल्याचे देखील स्पष्ट केले आहे. तिसऱ्या भागात प्रकाश राज यांच्यासाठी खास नवीन पात्र लिहिले गेले असल्याची बातमी आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अभिषेक पाठक करत आहेत. अजय देवगण पुन्हा एकदा विजय साळगावकरची भूमिका साकारणार आहे. ■

### प्रियांका मुलीला शिकवतेय् भारतीय संस्कृती

**मुंबई** : निक जोनासशी लग्न केल्यानंतर ग्लोबल आयकॉन प्रियांका चोप्रा कदाचित विदेशात स्थायिक झाली असली तरी ती भारतीय संस्कृती विसरलेली नाही. विदेशात राहूनही ती तिच्या कुटुंबासह प्रत्येक सण मोठ्या उत्साहाने साजरा करते. प्रियांका तिची लहान मुलगी मालती हिलाही भारतीय संस्कृतीशी जोडून ठेवते. अनेक धर्मांचे पालन होणाऱ्या घरात मुलीगी वाढवते आहे. येथे सांस्कृतिक मूल्यांना उच्च समजले जाते. आम्ही आमच्या मुलीला हिंदू मूल्ये सांगत आहोत आणि त्यांचा खरा अर्थ शिकवत आहोत. माझे कुटुंब बहुसांस्कृतिक आणि बहुधार्मिक आहे याबद्दल मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो, असे निकने सांगितले. ■




# प्रयोगशाळेत तयार केला मानवी मेंदू

## रक्तवाहिन्यांचे जाळे झाले विकसित
## विस्मरणाच्या आजाराला ठरणार वरदान

◆ **वॉशिंग्टन, १२ फेब्रुवारी**

एका काचेच्या प्लेटमध्ये काही मुख्य पेशी आणि रसायनांच्या मदतीने मानवी मेंदूचे एक छोटे रुप प्रयोगशाळेत तयार केले आहे. यामध्ये मानवी मेंदूप्रमाणेच रक्तवाहिन्यांचे जाळे विकसित करण्यात आले आहे. हा मेंदू कॅलिफोर्निया विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी प्रयोगशाळेत तयार केला आहे. या प्रयोगामुळे कल्पनाशक्ती वास्तवात येऊ शकते हे सिद्ध झाले आहे.

हा छोटा मेंदू म्हणजे मानवी मेंदूतील सेरिब्रल कॉर्टेक्सची एक छोटी प्रतिकृती आहे. मेंदूच्या या भागाचे काम विचार करणे, निर्णय घेणे, स्मरणशक्ती आणि समस्या सोडवणे हे आहे. विशेष म्हणजे यामध्ये रक्तवाहिन्या विकसित झाल्यामुळे हा ढाचा हुबेहुब खऱ्या मेंदूप्रमाणे दिसतो. हा छोटा मेंदू स्टेम सेल्सपासून तयार केला आहे. या पेशींना विशिष्ट रासायनिक संकेत दिले जातात. ते एकत्र येऊन मेंदूची रचना तयार करतात. २०१३ मध्ये पहिल्यांदा अशा प्रकारचा छोटा मेंदू तयार करण्यात आला होता, मात्र आता रक्तवाहिन्यांचे जाळे तयार करण्यात आल्याने हे यशस्वी ठरले आहे. हा छोटा मेंदू भविष्यात अनेक गंभीर आजारांवरील संशोधनात मैलाचा दगड ठरणार आहे. या छोट्या मेंदूतील



रक्तवाहिन्यांमध्ये 'ल्यूमेन' (पोकळ रस्ता) तयार झाला आहे. तो खऱ्या मेंदूतील रक्तवाहिन्यांप्रमाणेच असल्याचे अभ्यासात असे दिसून आले आहे.

रक्तवाहिन्यांमध्ये 'ल्यूमेन' (पोकळ रस्ता) तयार झाल्यामुळे मेंदूचे हानिकारक घटकांपासून संरक्षण करणारे 'ब्लड-ब्रेन बॅरियर' तयार होण्यास मदत झाली आहे. जरी शास्त्रज्ञांनी रक्तवाहिन्या तयार केल्या असल्या, तरी खऱ्या शरीरात हृदय ज्याप्रमाणे सतत रक्त पंप करते, तशी व्यवस्था प्रयोगशाळेत नाही. यावर सध्या अधिक संशोधन सुरू आहे. असे असले, तरी मेंदूच्या आजारांवर उपचार शोधण्याची वाट आता अधिक सुकर झाली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### आजारांना आळा घालण्यासाठी ठरणार उपयुक्त

**अल्झायमर आणि डिमेंशिया** : विस्मरण होणाऱ्या रुग्णांच्या मेंदूत नक्की काय बिघाड होतो, हे आता जवळून पाहता येईल.

**मानसिक आजार** : स्किझोफेनिया, ऑटिझम आणि डिप्रेशन (नैराश्य) यांसारख्या आजारांवर संशोधन करणे सोपे होईल.

**पार्किन्सन आणि एपिलेप्सी (अपस्मार)** : या आजारांमधील पेशींची कार्यपद्धती समजून घेता येईल.

**सुरक्षित औषध चाचणी** : नवीन औषधांची थेट मानवावर चाचणी करण्यापूर्वी ती या छोट्या मेंदूवर करून पाहता येतील, जे अत्यंत सुरक्षित असेल. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# वास्तवाच्या दोन बाजू

समन्वय, संयम, सहिष्णुता, समजूतदारपणा, सहजता ही समंजस समाजाची ओळख असते. अशा सर्वसंपन्न स्वभावाचा समाज सहसा सर्वत्र दिसत नाही. भारताच्या प्राचीन संस्कृतीला अभिप्रेत असलेली समाजपुरुषाची वैशिष्ट्ये हीच असून अशा वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असा समाज निर्माण करण्यासाठी या देशातील अनेकांनी आपली आयुष्ये समर्पितही केली आहेत. पाश्चात्त्य जगात चंगळवाद फोफावला असल्याने श्रीमंती हाच सुखी समाजाचा निकष मानला जात आहे. एपस्टिन फाईल्स नावाच्या नव्या धक्क्याने जगाला हादरे बसू लागले असून या चंगळवादी समाजजीवनाचा विळखा जगाभोवती आवळला जात आहे. एका बाजूला संस्कृती आणि परंपरांचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न आणि दुसरीकडे चंगळवादाचा विळखा अशा कोंडीत सापडलेल्या समाजव्यवस्थेमुळे सामाजिक स्वभावाचे कोडे किचकट होत चालले आहे. त्यामुळेच कोणत्याही समाजाच्या स्वभावाची नेमकी ओळख आणि वैशिष्ट्ये यांची उकल करणे कठीण होत असून 'आपला समाज नेमका आहे तरी कसा' हा प्रश्न विचारला गेला, तर कदाचित संशोधनच करावे लागेल. एकाच समाजात एकाच वेळी दिसणाऱ्या स्वाभाविक विसंगतींमुळे संभ्रमावस्था वाढण्याचीच शक्यता अधिक असून एखाद्या स्वभाव वैशिष्ट्यावर बोट ठेवून तीच समाजाची ओळख आहे, असे मानले तर त्याच वेळी त्याच वैशिष्ट्याला छेद देणारे उलटेच काही समोर येऊन संभ्रम अधिक वाढतो आणि प्रश्न अधिक अवघडच होऊन जातो. समोर येणारे विसंगत रूप हे संयमाचे, असहिष्णुतेचे, असमंजसपणाचे किंवा नेमके कसे हे ठरविणे कसोटीचा प्रसंग ठरतो.

भारतातील लोकसंख्येच्या कपाळावरची दारिद्र्यरेषा ही स्वातंत्र्यापासून सतत सतावणारी समस्या आहे. अनेक प्रयत्न करूनही ही रेषा सहजपणे पुसली जात नाही. दारिद्र्यरेषा पुसणे हे खडतर आव्हान असल्याने दारिद्र्यरेषेची लांबी कमी-जास्त करणे तुलनेने अधिक सोपे असते हे लक्षात आल्यावर दारिद्र्याचे निकष बदलत राहिले आणि या रेषेची लांबी कमी-अधिक होत राहिली. सुमारे साडेसहा दशकांनंतर पहिल्यांदाच या रेषेखाली सातत्याने पिचलेली २५ कोटी लोकसंख्या त्यातून बाहेर आली, तेव्हा भारताने मोठा उत्सव साजरा केला होता. तरीही जागतिक बँकेच्या अहवालानुसार, भारतातील प्रत्येक १०० लोकसंख्येपैकी पाच जणांना जगण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान गरजाही मिळत नसल्याचे दिसून येते. दोन वर्षांपूर्वीच्या या पाहणीनुसार २०१०-११ पर्यंत भारतातील अत्यंत गरिबांची संख्या खूप जास्त होती. पुढच्या दशकात ही संख्या घटत गेली आणि दारिद्र्याचा शिक्का पुसट होत गेला, तरीही जगण्याच्या गरजा भागविण्यापुरते जगणेच अजूनही अनेकांच्या वाट्याला आले असून काटकसर करणे हाच त्यांच्या बचतीचा मार्ग आहे. असा संघर्ष करावा लागला की सहनशीलता आपोआपच स्वभावात भिनते आणि समंजसपणाही वाढतो. सगळ्यांच्याच समस्या समान असतात तेव्हा सहिष्णुता हा आपोआपच स्वभाव होऊ लागतो आणि समन्वयाने जगणे ही सामूहिक गरज होऊ लागते. परिस्थितीशी सामना करताना तयार होत गेलेल्या या स्वभाव वैशिष्ट्यांवर बोट ठेवून समंजस समाज अशी आपल्या समाजाची ओळख असल्याचा छातीठोक दावा करावा, तर लगेचच त्याला छेद देणारे वेगळेच काही समोर येऊन नवा संभ्रम निर्माण होतो. एकीकडे उपजीविकेपुरते कमावण्यासाठी करावा लागणारा संघर्ष ही बहुसंख्य समाजाची ओळख होत असतानाच, समोर आलेल्या एका ताज्या वास्तवाने त्यास छेद दिला आहे. पैसा पैसा गाठीशी बांधून कष्टाने जगणाऱ्या बहुसंख्यांच्या देशात, तब्बल ७२ हजार कोटी रुपये एवढ्या प्रचंड रकमेचा पैसा वर्षानुवर्षे न वापरता बँकांमध्ये पडून राहिला असून त्यावर हक्क सांगण्यासाठी कोणी पुढेच येत नसल्याची बाबही उघडकीस आली आहे. देशातील वेगवेगळ्या बँकांमध्ये पडून राहिलेल्या ७२ हजार ४५४ कोटींच्या ठेवींना दावेदारच नसल्याने ही रक्कम अक्षरशः बेवारस ठरल्याचे माहिती केंद्र सरकारने संसदेत दिल्याने, समाजाच्या स्वभावाची दोन्ही रूपे आपोआपच समोर येत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार १० वर्षे वा त्याहून अधिक काळ बँक खातेदारांनी आपल्या खात्यात कोणतेही व्यवहार केले नसतील तर ती खाती निष्क्रिय समजली जातात. या खातेदारांना त्याची आठवण करून देण्यासाठी बँकांनाच पाठपुरावा करावा लागतो आणि त्याला खातेदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यास ही रक्कम अन्य एका राखीव निधीमध्ये वळती करावी लागते. देशातील आघाडीच्या आणि परदेशी बँकांमध्ये अशी सुमारे ७२ हजार कोटींची रक्कम पडून आहे.पाठपुरावा करूनही त्यावर दावा करण्यास कोणीच पुढे येत नाही, हे समाजाच्या स्वभावाचे दुसरे विसंगत रूपच म्हणावे लागेल. अशा पडून राहिलेल्या रकमेचे दावेदार शोधून ती त्यांच्या हवाली करण्यासाठी बँकांनी विशेष मोहिमा राबविल्या, रिझर्व्ह बँकेने खास मंच स्थापन केला, तरीही ७२ हजार कोटींची रक्कम विनादावा पडून राहिली, ही वास्तवाची दुसरी अस्वस्थ बाजू म्हणावी लागेल. समाधानी जगण्यासाठी पुरेशा सुविधांची उपलब्धता आणि त्या सुविधा प्राप्त करण्यासाठी पुरेसे उत्पन्नाचे स्रोत ही समाजाची किमान गरज असते. आज देशाचे दरडोई उत्पन्न वाढत आहे, विकासाचा आलेख उंचावत आहे, विकासदराचा दर जागतिक आर्थिक स्थितीच्या तुलनेत स्थिर आणि आश्वासकही आहे, तरीही साधने आणि संपत्तीचे विषम वाटप ही समस्या संपलेली नाही. मूठभर लोकांच्या हाती संपत्तीचा मोठा वाटा आणि असंख्यांची झोळी अक्षरशः रिकामी ही या वास्तवाची दुसरी बाजू आहे. दिवंगत केंद्रीय मंत्री अरुण जेटली यांनी यासंदर्भात काही वर्षांपूर्वी व्यक्त केलेले विचार नक्कीच अंतर्मुख होण्यास भाग पाडणारे आहेत. आजही त्या वास्तवात फारसा फरक पडलेला नसावा.

दरवर्षी केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर, देशात प्रामुख्याने आयकर सवलतीबाबत व्यापक चर्चा होते. कधी दिलासा, कधी नाराजी असे सूर उमटू लागतात. कधीतरी कोणतीच नवी घोषणा नसल्याचे कारण देत मध्यमवर्गीयांच्या तोंडास पाने पुसल्याचा संताप चहुबाजूंनी व्यक्त होऊ लागतो. मध्यमवर्गीयांविषयी कळकळ ही चांगली बाजू यातून समोर येत असल्याने त्याचे स्वागत करायलाच हवे. पण आयकरासंबंधीचा एकंदर मागोवा घेताना अर्थमंत्री या नात्याने अरुण जेटली यांनी समोर आणलेले ते जुने वास्तव पुन्हा आठवणे साहजिकही ठरते. देशातील बहुसंख्य लोक राष्ट्रभक्त आहेतच; तरीही हा देश बहुसंख्य अप्रामाणिकांचाच आहे. चुकवेगिरी, बुडवेगिरी, फसवेगिरी आणि ढोंगीपणा नसानसात भरलेली माणसे देशात आहेत; अशा माणसांतीलच काही देशाला शहाणपणाचे डोस पाजण्यात पुढे असतात. देशातील १३० कोटी लोकसंख्येपैकी फक्त दीड टक्का (१.९ कोटी) भारतीय लोक आयकर भरतात. त्यापैकी फक्त २३ हजार ९३२ (०.१ टक्का) भारतीयांचा इन्कम टॅक्समधील वाटा २६ टक्के आहे. त्यापुढील एक टक्का (१,९५,३४२) लोकांचा एकूण आयकर वसुलीतील वाटा १९ टक्के आहे. दोन टक्के (४,१५,३०२) लोकांचा वाटा १४ टक्के तर ७ टक्के लोकांचा वाटा १८ टक्के एवढा आहे. उरलेल्या ८९.९ टक्के (९१ लाख) भारतीयांचा एकूण आयकर महसूलातील वाटा २३ टक्के आहे. म्हणजे आयकर महसुलातील ९० टक्के वाटा केवळ १० (९ लाख) टक्के भारतीयांचा आहे. तरीही देशात दरवर्षी रियल इस्टेटमधील गुंतवणूक वाढते, वाहनांची संख्या वाढते, महागड्या मोबाईल कंपन्यांना भारताच्या बाजारपेठा खुणावत असतात. म्हणजेच, ९८.५ टक्के लोकसंख्या भयावह गरिबीत जगत असली पाहिजे किंवा प्रचंड आयकर चुकवेगिरी करत असली पाहिजे. तरीही आयकर सवलतीकडे १०० टक्के जनतेचे लक्ष लागून राहते. अशी नेमकी आकडेवारी तेव्हा बहुधा प्रथमच उजेडात आल्याने समाजाच्या स्वभावाचे नेमके वैशिष्ट्य ठरविणे अवघड होत असून त्या परिस्थितीत फरक पडला असेल, असे ठामपणे सांगता येणार नाही. कारण आर्थिक शिस्त लावण्याच्या प्रत्येक प्रयत्नात कशी पळवाट शोधली जाईल, हे सांगण्याचीच स्पर्धा अर्थतज्ज्ञांतही दिसते. त्यामुळे पळवाटांवरूनच चालणारा समाज अशी ओळख असेल, तर त्यावर सत्ता कोण गाजवतो हा मुद्दा महत्त्वाचा नाही. समाजाची दुहेरी ओळख पुसली नाही आणि वास्तवाची दुसरी बाजू बदलली नाही, तर बदलाची अपेक्षाच न करणेच चांगले!

## विशेष

**अभय बाळकृष्ण पटवर्धन**

# ११४ राफेल विमान खरेदीचा अन्वयार्थ

१६ जानेवारी २६ ला संरक्षण सचिवांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण खरेदी मंडळानी फ्रेंच विमान कंपनी दसॉल्टकडून ४-५ प्रणालींची ११४ राफेल लढाऊ विमान खरेदी करण्याचा प्रस्ताव मान्य केला. यानंतर संरक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेतील संरक्षण अधिग्रहण परिषदेच्या मंजुरीपश्चात ९ फेब्रुवारी २६ ला हा प्रस्ताव, पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ समितीकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवला गेला. सूत्रांनुसार या समितीच्या मंजुरीनंतर १८-२० फेब्रुवारी २६ दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या भेटीच्या वेळी या ३६ दशांश १ अब्ज डॉलर्स/१७० दशांश ३ अब्ज रुपयांच्या करारावर शिक्कामोर्तब होईल. करारानुसार ११४ पैकी जवळपास ८०-९० राफेल विमानांची निर्मिती भारतात होईल. त्यासाठी फ्रान्समधील दसॉल्ट कंपनीच्या अनेक यंत्रणा भारतात येतील. यासंबंधी वाटाघाटी आधीच सुरू झाल्या आहेत. या खरेदीतच २४ राफेल एफ ५ विमानांचा अतिरिक्त पर्याय आणि नागपूरमध्ये होणार असून एअरफ्रेम कोन उत्पादन आणि विमान जोडणी (असेम्ब्ली) यात सामील आहेत.

नागपूरमधील दसॉल्ट रिलायन्स एरोस्पेस लिमिटेड, टाटा, महिंद्रा आणि डायनॅमॅटिक टेक्नॉलॉजी मिळून प्रतिवर्ष २४-३० राफेल विमानांची अंतिम जोडणी करतील; जी फ्रान्सच्या २५-३० विमान उत्पादनाची पूरक शक्ती असेल. टाटा आणि दसॉल्ट यांच्यातील फ्यूसीलाज स्थानिकीकरण संबंधित कारखान्याचे बांधकाम सुरू होणार असून २०२८ च्या शेवटी विमानांची डिलिव्हरी सुरू होईल. याचबरोबर विमानांची स्थानिक दुरुस्ती, देखभाल आणि आधुनिकीकरणासाठी आवश्यक केंद्र तयार होत आहे. हा करार अपेक्षाकृत झाला तर ही विमान खरेदी संख्या २०० विमानांपर्यंत जाण्याची संभावना आहे. संरक्षणतज्ज्ञांनुसार चीनच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील सततचा संघर्ष आणि भारताच्या पश्चिम आघाडीवर पाकिस्तानचा सततचा लष्करी दबाव यामुळे बिघडत चाललेल्या प्रादेशिक सुरक्षा वातावरणाला तोंड देण्यासाठी ही खरेदी अत्यावश्यक आहे. यामुळे भारतीय वायुसेना, भविष्यातील युद्ध तयारीची योजना कशी आखते तसेच तत्काळ ऑपरेशनल क्षमता आणि त्याच्या अग्निशक्तीवर सार्वभौम नियंत्रण कसे आणते, यामध्ये निर्णायक बदल होईल. या आधी खरेदी केलेल्या ३६ आणि नौसेनेसाठी खरेदी प्रक्रिया सुरू असलेल्या २९ राफेल एफ ३ आर विमानांसंबंधी सांकेतिक आंशिक शब्द स्रोत हस्तांतरासाठी (सोर्स कोड क्सेस ट्रान्स्फर) फ्रान्सने स्पष्ट नकार दिला होता. एकतर्फी अपग्रेडेशनसाठी आवश्यक मिशन एव्हियोनिक्स आणि फ्लाय बाय वायर फ्लाईट कंट्रोल सिस्टिमसाठी हे



ऑपरेशनल सोर्स कोड जरूरी असत/आहे. या हस्तांतर नकारामुळे भारताचे दीर्घकालीन तांत्रिक सार्वभौमत्व, राफेलच्या माध्यमातून जलद हवाई शक्ती विस्तार आणि आत्मनिर्भर भारत या संदर्भात मोठा धोरणात्मक अडथळा निर्माण झाला आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. आजमितीला रडार फ्यूजन, इलेक्ट्रॉनिक युद्ध, शस्त्र एकत्रीकरण आणि मिशन सिस्टिम नियंत्रित करणाऱ्या सॉफ्टवेअर आर्किटेक्चरचे सोर्स कोड फ्रान्सकडेच आहेत. यामुळे आत्मनिर्भर भारत सिद्धांतांतर्गत लढाऊ प्रणालींवर स्वदेशी नियंत्रण, अपग्रेडेशन मार्ग, ऑपरेशनल चपळता आणि भविष्यातील क्षमता उत्क्रांती या गृहितांना या नकाराचा जबरदस्त हादरा बसला असून भारतीय वायुसेना दीर्घकालीन बाह्य अवलंबित्वांना तोंड देत आहे. हे या पुढे होऊ नये म्हणून आगामी खरेदी करारात राफेल सोर्स कोडची उपलब्धता अनिवार्य करण अपरिहार्य आहे.

राफेल सोर्स कोडची वानवा, विमानाच्या डिजिटल आर्किटेक्चरला भारतीय नियंत्रणाबाहेर ठेवते कारण सेन्सर्स, शस्त्र आणि इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणालींना परस्पर संवाद साधण्याची परवानगी देणार तर्कशास्त्र याच सोर्स कोडद्वारे नियंत्रित केले जात. सॉफ्टवेअर केंद्रित हवाई चकमकींमध्ये सॉफ्टवेअर नियंत्रण हे एअर फ्रेम्सवरील नियंत्रणाइतकच निर्णायक असत. स्पर्धात्मक वातावरणात सेन्सर फ्यूजन अल्गोरिदम, इलेक्ट्रॉनिक युद्ध ग्रंथालय, प्राणघातकता आणि डेटा-लिंक टिकून राहण्याची क्षमता अत्यावश्यक असते. सोर्स कोड असल्याशिवाय भारतीय एरोनॉटिकल इंजिनीअर्स या विमानांसाठ; अस्त्र पल्याड दृश्यमान श्रेणीतील (बियाँड व्हिज्युअल रेंज) रुद्रम अँटी रेडिएशन क्षेपणास्त्र आणि भविष्यातील नेटवर्क केंद्रित युद्ध प्रणालीसाठी आवश्यक शस्त्र एकीकरण सार्वभौम सॉफ्टवेअरच अपग्रेडेशन करू शकणार नाही. शिवाय हे करण्यासाठी आपल्याला या सर्वांसाठी वारंवार फ्रान्सची मान्यता मिळण्यास होणारा विलंब आणि त्या अनुषंगाने होणारा अतिरिक्त खर्च सोसावा लागेल. शिवाय सॉफ्टवेअर चालित युद्धाच्या गतिमान युगात अशा प्रकारच तांत्रिक अवलंबित्व अत्यंत धोकादायक असते. परिणामस्वरूप सक्षम सैन्य संरचनेसाठी डिजिटल आर्किटेक्चरवरील भारताचे सार्वभौम नियंत्रण नसलेला विस्तारित राफेल ताफा, दीर्घकालीन तर्क संगततेला अनुरूप नसेल. सोर्स कोड आवश्यक आहे. कारण भविष्यात भारताला राफेल, सुखोई ३० एमके १, तेजस एमके १ ए आणि एएमसीएसारख्या वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मना एकात्मिक, नेटवर्क-केंद्रित लढाऊ परिसंस्थेत एकत्रित करायचे आहे.

सूत्रांनुसार, १) नवीनतम राफेल विमान खरेदी करारात स्वदेशी सामग्रीचा अंदाजे वापर केवळ ३० टक्के असून यात तंत्रज्ञान हस्तांतरणाची (ट्रान्स्फर ऑफ टेक्नॉलॉजी: टीओटी) वचनबद्धता नाही. मात्र करारानुसार, भविष्यात ऑर्डरच्या ८० टक्के संसाधनांचे स्थानिकीकरण होईल.

२) ॲडव्हान्स्ड मीडियम कॉम्बॅट एअर क्राफ्ट (एएमसीए) चा किमान एक स्क्वॉड्रन वायुसेनेत सामील होईस्तोवर ऑपरेशनल गॅप भरून काढण्यासाठी स्टेल्थ फायटर राफेलची खरेदी; मल्टी-रोल फायटर एअरक्राफ्ट (एमआरएफए) प्रकल्पांतर्गत केल्या जाईल.

३) स्पर्धक लढाऊ विमानांचे मूल्यांकन, राफेलचे संचालन आणि देखभाल करण्यासाठी भारतीय वायुसेनेने आधीच पायाभूत सुविधा, प्रशिक्षण आणि लॉजिस्टिक्सची मोठी गुंतवणूक केली असल्यामुळे अतिरिक्त राफेल्सना आत्मसात करणे सोप असणार आहे.

४) जलद खरेदी आवश्यक आहे. कारण ऑर्डर दिल्यानंतर स्क्वॉड्रनना पूर्ण कार्यरत करणे किंवा पुन्हा वाढविणे ही वर्षानुवर्ष चालणारी दीर्घकालीन प्रक्रिया असते.

५) भारतीय उद्योग जे काही जलद आणि विश्वासार्हपणे तयार करू शकतात ते भारतात बनवले पाहिजे; उर्वरित आयात केले पाहिजे. या करारासाठी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांची फेब्रुवारी २०२६ मध्ये होणारी भारत भेट एक महत्त्वाचा उत्प्रेरक असेल. करारावर एकमत झाल्यानंतर या वर्षाच्या मध्यापर्यंत औपचारिक वाटाघाटी सुरू होतील.

नवीन राफेल स्क्वॉड्रन्स भारताच्या सर्व प्रगत एअर टू एअर आणि एअर टू सर्फेस युद्धसामग्रींनी परिपूर्ण होण्यासाठी त्यांच्यावर एकात्मिकतेसाठी नियोजित हवाई लढाईच्या संपूर्ण स्पेक्ट्रमची शस्त्र प्रणाली असणे अपरिहार्य असेल/आहे. **(पूर्वार्ध)**

(लेखक निवृत्त कर्नल आहेत.)

९४२२१४९८७६

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# अभेद्य लॅबिरिन्थ!

चक्रव्यूहाची रचना, ते भेदण्याचे कौशल्य आणि न भेदणाऱ्याचा अभिमन्यू होणे, या संकल्पना आपण सर्वांनीच महाभारताच्या कथांमध्ये जाणल्या आहेत. सामान्यत: चक्रव्यूहाच्या रचनेशी साधर्म्य सांगणाऱ्या रचना गेल्या काही काळापासून पुरातत्त्व अभ्यासकांना आढळल्या आहेत. त्यांना शास्त्रीय भाषेत लॅबिरिन्थ असे म्हणतात. लॅबिरिन्थचा 'वेध' आज घेण्याचे कारण विशेष आहे. आपल्या देशात सर्वत्र आढळलेल्या लॅबिरिन्थपैकी सर्वात मोठी रचना महाराष्ट्रातील सोलापूरमध्ये सापडली आहे. सोलापूरजवळच्या बोरामणीत जवळपास ५० फुटांचा व्यास असणारं लॅबिरिन्थ हे अशा प्रकारचं भारतात सापडलेलं सर्वात मोठं वर्तुळाकार लॅबिरिन्थ अथवा चक्रव्यूह आहे. १५ समकेंद्रित वर्तुळांच्या रचनेमुळे ते



सर्वाधिक गुंतागुंतीचे लॅबिरिन्थ ठरले आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत बोरामणीसह १२ तर देशभरात जवळपास ७० लॅबिरिन्थस् सापडलेत. लॅबिरिन्थमध्ये कायम एकच रस्ता असतो. तो सर्वात बाहेरच्या परिघावरून आत केंद्रबिंदूपाशी येतो किंवा केंद्रापासून शेवटापर्यंत जातो. ही रचना भारतीय तत्त्वज्ञानाशी जवळीक सांगणारी आहे. जगभरात सापडलेली बहुतांश लॅबिरिन्थ ही वर्तुळाकार असली, तरी तामिळनाडूत गोदीमेडू इथं ५६ फूट रुंदीचं एक आयाताकृती लॅबिरिन्थही सापडलं आहे. सहज बघितलं तर ती एकावर एक अशी अनेक वर्तुळांची अथवा भौमितीय आकारांची रचना आहे. काही दगडांनी घडवलेली तर काही ठिकाणी ती खडकांवर, भिंतीवर आणि नाण्यांवरही कोरलेली आहे. अनेक ठिकाणी देवळं किंवा कॅथेड्रलसारख्या धार्मिक स्थळांवर कोरलेली अथवा चित्रित केलेलीही सापडतात.

जेफ सवार्ड नावाचे संशोधक गेल्या पाच दशकांपासून जगभरातल्या लॅबिरिन्थस्चा अभ्यास करीत आहेत. लॅबिरिन्थस् हजारो वर्षांपासून सर्वत्र असली, तरी अगदी अलिकडे त्यांचा अभ्यास सुरू झाला आहे. भारतातही अभ्यासकांनी तशा नोंदी करणं सुरू केलं आहे. कर्नाटकात विजापूरमध्ये मातीत रोवलेल्या दगडांची अशीच गूढ रचना सापडली आहे. गोव्यामध्ये उसळाई माळ इथं दगडांमध्ये कोरलेलं लॅबिरिन्थ पाहायला मिळतं, जे कातळशिल्पांच्या समूहात आहे. आंध्र प्रदेशात अप्पर गोदावरी जिल्ह्यात पाषाणात कोरलेले तर सम्राट अशोकांच्या काळातील स्तंभांवरही लॅबिरिन्थ सापडलेत. पश्चिम बंगालमध्ये लॅबिरिन्थला यमद्वार म्हणजे मुक्तीचा मार्ग, असे म्हटले जाते.

लॅबिरिन्थ रचना उत्तर भारतात सापडल्या असल्या तरी आतापर्यंत सर्वाधिक लॅबिरिन्थ दक्षिण भारतात सापडले असून त्यांची संख्या ३० ते ३५ आहे.

ॲरिझोना, आईसलँड, आर्क्टिक रशिया, संपूर्ण युरोप, उत्तर आफ्रिका आणि आशियापर्यंत लॅबिरिन्थ सापडतात. विशेषतः भारत, श्रीलंका, पाकिस्तान, नेपाळ आणि इंडोनेशियातील सुमात्रा आणि जावामध्येही या गूढ रचना आहेत. त्यांना त्या-त्या भागात विविध दंतकथाही चिकटल्या आहेत. एक बाब मात्र या सगळ्यांना जोडते की, ही सगळी अशा ठिकाणी सापडली आहेत जिथून इतिहासकालीन व्यापारी मार्ग जात होते. त्यामुळेच भारताच्या पश्चिम तटाशी विशेषत: युरोपातील रोमन आणि ग्रीक साम्राज्यांशी असलेल्या व्यापाराचा लॅबिरिन्थच्या कल्पनेचा भारतापर्यंत प्रवास करण्याशी संबंध असावा, अशी शक्यता अभ्यासकांना वाटते. सम्राट ऑगस्टसने विविध प्रकारच्या पौराणिक गोष्टी असलेली नाण्यांची एक मालिका जारी केली होती. त्यापैकी एकावर लॅबिरिन्थ कोरलेले आहे. त्या नाण्यांच्या मागील बाजूस, भारतात आढळणाऱ्या चक्रव्यूहांसारखीच हुबेहूब रचना आहे. व्यापारादरम्यान त्यापैकी काही नाणी भारतात पोहोचली असतील. आता धाराशिव जिल्ह्यात असलेलं तगर म्हणजे आजचं तेर इथं रोमन साम्राज्याशी असलेल्या व्यापाराचे पुरावे अतिशय ठळकपणे सापडले आहेत. बोरामणीच्या लॅबिरिन्थपासून तेर हे साधारण ५० किलोमीटर अंतरावर आहे, हे उल्लेखनीय!

असेच संदर्भ आताचा नालासोपारा आणि तत्कालीन शुपरका, राजापूरचे बंदर, जुन्नर, नाशिकमार्गे पैठण अथवा प्रतिष्ठान या व्यापारी केंद्रांपर्यंत सापडतात. संशोधकांनी पहिली ११ लॅबिरिन्थस् सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये शोधली असून ती कदाचित रस्ता निश्चित करण्यासाठी कोरलेली असावीत. सरळ समोर फारसं काही दिसत नाही. एकदम उंच भाग आहे किंवा दुसरीकडे सखल प्रदेश आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी गोंधळ होतो आहे, तिथे लॅबिरिन्थस् आहेत. दिशादर्शनासाठी व्यापारी मार्गावर ही वर्तुळं असावीत. लॅबिरिन्थस् कोणी केली? ती सर्वत्र एकसारखी कशी आहेत? ती करण्यामागचं कारण काय? असे असंख्य प्रश्न आहेत. या प्रश्नांच्या उत्तरांना अधिक पुरातत्त्वीय संशोधनाशिवाय पर्याय नाही.

९८५०३३९२४०

## प्रासंगिक

**विजय पांढरीपांडे**

# आमचे हिरो अन् आजचे झीरो

आमची पिढी खरेच श्रीमंत होती. आमच्यापुढे चांगले आदर्श होते. एकाहून एक राष्ट्रभक्त, विचारवंत हिरो होते. स्वातंत्र्याच्या चळवळीचे ज्वलंत वैचारिक पाठबळ मागे होते. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राणा प्रताप, राणी लक्ष्मीबाई यांच्या राष्ट्र प्रथम, बाकी सगळे दुय्यम या निष्ठेचे पाठबळ होते. स्वातंत्र्यासाठी आपापल्या परीने योगदान दिलेले महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, लाल, बाल, पाल, स्वातंत्र्यवीर सावरकर, शाहू, फुले, डॉ. आंबेडकर अशा एकाहून एक थोर माहात्म्यांच्या विचारधारेत आम्ही चिंब भिजलो होतो वेळोवेळी. या सर्वांचे विचार, वेगवेगळे असले तरी त्यांच्यासाठी देशाचे हित हीच प्राथमिकता होती. तीही माणसेच होती. त्यांनीही चुका केल्या असतील किंवा ती त्यावेळची, परिस्थितीची गरजही असेल कदाचित. पण एक निश्चित, त्यांनी आपला स्वार्थ साधला नाही. ते आपल्या मताशी, विचारधारेशी ठाम राहिले शेवटपर्यंत. अगदी भिन्न विचारधारेचे नेते एकत्र बसून एक दुसऱ्याचे ऐकून घेत त्यातून सुवर्णमध्य शोधीत असत. कारण त्यांचे वैचारिक मार्ग भिन्न असले तरी गंतव्य स्थान एक होते. अंतिम लक्ष्य एक होते. देश प्रथम, बाकी सगळे दुय्यम! हीच समान विचारधारा होती.

हळूहळू सगळेच बदलले. एका पाठोपाठ दशके बदलली. शतक बदलले. इंडस्ट्री युग, तांत्रिक युग अन् काय काय आले. सगळेच नावीन्याने भुरळ घालणारे. मोहित करणारे. आपल्या नंतरच्या पिढ्या त्या मोहजालात फसत गेल्या. वाहवत गेल्या. आदर्श मागे पडले. क्षणिक सुख पुढे आले. प्रत्येकाला घाई झाली पुढे जाण्याची. कुठे जायचे माहीत नाही. कशासाठी जायचे माहीत नाही. बरोबर कोण माहीत नाही. असा सगळा संभ्रम. या पिढीला जेन झी म्हणतात. हा शब्द कुठून आला, कसा आला मला माहिती नाही. झेड हे इंग्रजी वर्णमालेतले शेवटचे अक्षर. म्हणजे पुढे काहीच नाही. ध्येय, दिशा काहीच नाही. सगळेच भरकटल्यासारखे. दाट धुक्यात वाट हरवल्यासारखे. उद्देशहीन वाटचाल. आपल्याला नेमके कुठे जायचे आहे, तिथेच का जायचे आहे, आपल्याला नेमके काय हवे आहे, कशासाठी हवे आहे, काहीच स्पष्ट कल्पना नाही. फक्त हवे आहे ही भावना, सुप्त आकांक्षा. तेही झटपट हवे आहे. वाट पाहण्याची तयारी नाही. परिश्रम करण्याची जिद्द नाही. शिवाय प्रत्येकाचे वर्तुळ छोटेसे, आक्रसलेले. त्यात इतर कुणाला प्रवेश नाही. प्रत्येकाला म्हणे ज्याची त्याची/तिची स्पेस हवी आहे. फक्त वाद, संवाद नको आहे. स्वतःचेच घोडे पुढे दामटायचे आहे. त्यात अवती भवती चांगल्या, आदर्श माणसांचा दुष्काळ आहे. पूर्वीसारखे ज्यांना हिरो म्हणता येईल असे कुणी दिसतच नाही. सगळे स्वार्थी. आपापल्या विश्वात दंग, मस्त. ज्यांना आपण लोकप्रतिनिधी म्हणून निवडून देतो त्यांच्याबद्दल तर विचारायलाच नको. ते स्वतःला आपले पुढारी म्हणवतात. त्यांच्या हातात सत्ता आहे, सरकार आहे. पण त्यांची योग्यता काय? ते आज इथे, उद्या तिथे. खरे तर आज कोण नेमका कुठे हेच कळेनासे झाले आहे. त्यांना गणित येत नाही. पण नंबर गेम येतो! त्यांची सगळी धडपड त्या विशिष्ट नंबर गेमसाठी असते. प्रत्येक पक्षाची एक विचारधारा असते म्हणे. पण ती कागदावर. ते तत्त्व, ते विचार फक्त भाषणबाजीसाठी. आज ज्याला शिव्या दिल्या त्याच्याच गळ्यात गळा घालून उद्या ते नाचतील. आज ज्याच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप तोच उद्या कुंपण ओलांडून इकडे आला की पदरी पडून पवित्र होतो! इथे कुणीच कुणाचा कायमचा मित्र नाही. कायमचा शत्रू नाही. सगळे संधिसाधू.

हे कसले हिरो? यांना तर आदर्श कशाशी खातात हेही माहिती नाही. त्यांचे घोटाळे मात्र आदर्श! सगळ्यांच्या करामती एक से बढकर एक! जे लोकशाहीचे मंदिर मानले जाते त्या लोकसभेत, राज्यसभेत, विधानसभेत यांचे वर्तन बघा. शाळेतील मुले कधी इतका गोंधळ करीत नाहीत. ते पीठासीन अधिकाऱ्याच्या म्हणजे मास्तरच्या अंगावर धावून जात नाहीत. हे तर फक्त आरडाओरडा करतात तिथे. गलिच्छ भाषेत आरोप करतात एकमेकांवर. यांना आपणच निवडून दिलेले असते आपले अमूल्य मत देऊन. आपल्यासाठी चांगले कायदे करणे, त्याची नीट अंमलबजावणी करणे, आपल्या सर्वांच्या हिताच्या योजना आखणे, त्याची नीट अंमलबजावणी होतेय की नाही ते बघणे, हे यांचे कर्तव्य. पण हे आजच्या पिढीचे हिरो (झीरो) करतात काय प्रत्यक्षात? आपल्या पिढ्यान् पिढ्यांची सोय होईल असा भ्रष्टाचार करतात दिवसाढवळ्या! सर्वांच्या देखत. सर्वांना सर्व माहिती असूनही सर्व मूग गिळून चूप बसलेले असतात. कारण हे सगळे एकाच माळेचे मणी असतात. सगळ्यांची सगळ्या पापात भागीदारी असते. त्यासाठीच तर त्यांना सत्ता हवी असते. समाजसेवा वगैरे बोलण्याच्या गोष्टी. त्यांच्या खोट्या आश्वासनांना बळी पडणारे आपणही तितकेच दोषी. त्यांची गुंडगिरी, त्यांचा दिवसाढवळ्या चाललेला भ्रष्टाचार सहन करणारे आपण, लोकशाहीचे पाईक देखील तितकेच दोषी. किंबहुना जास्त दोषी. कारण आपण अशा गुंड बाहुबलींना निवडून देतो. त्यांच्या कुकर्माला खतपाणी घालतो. या झीरो हिरोंना हाताशी धरून आपणही आपली कामे करून घेतो. आपली पोळी भाजून घेतो. ती खरे तर एकप्रकारे त्यांच्या भ्रष्टाचारात आपली भागीदारीच असते. आपल्यालाही त्यांच्यासारखे बेगडी हिरो व्हायचे असते. आपलाही स्वार्थ साधायचा असतो. 'सब पंछी एक डालके...' अशी परिस्थिती.

केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक, नाट्य, सिनेमा, कला अशा सर्वच क्षेत्रांत अशी बजबजपुरी माजली आहे. जुने सिनेमे बघा, त्यातल्या नूतन, मीना कुमारीसारख्या नट्या आठवून बघा. राजा परांजपे, गदिमा, पुल यांचा काळ आठवून बघा. आजचे चित्रपट, आजच्या सीरिअल्स बघवत नाहीत. पण आजचे झीरो हिरो करोडोने कमावताहेत. जेन झीला जे हवे तेच वाढताहेत ताटात. सगळीकडे आनंदी आनंद आहे. आता आपण नव्याने विचार करण्याची गरज आहे. ज्याला आपण प्रगती म्हणतो ती खरेच प्रगती आहे की अधोगतीकडे वाटचाल? आपण सुख, शांतीकडे वाटचाल करतोय की युद्धाच्या, द्वेष, मत्सर, जाती, धर्म, भेद यांनी दूषित केलेल्या क्षितिजाकडे जातो आहोत? फसवी आमिषे, नाटकी चेहरे, खोटे आभासी संभ्रमित भविष्य अन् त्या वाटचालीवर आपले नेतृत्व करणारे बेगडी झीरो हिरो! सगळेच हास्यास्पद आहे. अचंबित करणारे आहे. गोंधळात टाकणारे, संभ्रम वाढवणारे आहे. आपण या मोहजालातून जितके लवकर बाहेर पडू, जितक्या वेगाने सतर्क होऊन नवी वाट शोधू तितके बरे. एरवी जेन झीचे काही खरे नाही!

७६५९०८४५५५

## वाचक पत्रे

### वाहतूक नियम पाळणाऱ्यांना प्रशासनाने प्रोत्साहन द्यावे

एआय कॅमेऱ्याच्या माध्यमातून वाहतूक नियंत्रण आणि नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई होणार, अशी व्यवस्था होणार असल्याची बातमी वाचली. त्याबद्दल काही नकारात्मक प्रतिक्रिया आल्या. आधी नवीन नंबर प्लेट, आता एआय चलित कॅमेरे प्रत्येक चौकात. त्याची सुरुवात नागपुरातून होणार आणि अगदी छोटीशीही चूक अनवधानाने जरी झाली तरी आपल्या मोबाईलवर लगेच फोटोसह चालानचा संदेश येणार या कल्पनेने अनेक धास्तावले. हेल्मेट हवे, बेल्ट हवा, स्पीड नको, जुनी गाडी नको हे सर्व फार जाचक आहे, अशी भावना व्यक्त होऊ लागली. परदेशातील आधुनिक व्यवस्था आपल्याकडे येणार म्हटल्यावर अनेकांना सर्वात आधी धडकी भरते. वास्तविक वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना एआय कॅमेऱ्याच्या मदतीने धडा शिकविण्याची व्यवस्था करण्याचा अभिनव प्रयोग काही महिन्यांपूर्वी पुणे पोलिसांनी केल्याच्या बातम्या वृत्तपत्रात आल्या आहेत. आपण मात्र सगळी संक्रांत केवळ आपल्यावरच आली आहे, अशा पद्धतीने ओरड करतो. प्रथमदर्शनी अडचणीचे वाटतात म्हणून या तंत्रज्ञानासह येणाऱ्या नव्या नियमांना लगेच विरोध करण्याऐवजी याच तंत्रज्ञानाचा वापर करून त्यातून काय चांगले करता येऊ शकेल याबद्दल आपण काही सूचना करू शकतो का, याचा विचार व्हायला हवा. एआय कॅमेऱ्यामुळे लहानातला लहान नियम तोडणारे सहज ओळखता येऊ शकतात. नियमितपणे नियम पाळणाऱ्यांचा रेकॉर्डही सहज उपलब्ध होऊ शकतो. नियम मोडल्याबद्दल जसा दंड आहे, त्याच प्रकारे नियम पाळणाऱ्याला क्रेडिट पॉईंट्स देऊन नियम पालनाला प्रोत्साहन दिले जाऊ शकते. शंभर क्रेडिट पॉईटस् जमा असणाऱ्या व्यक्तीने एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत किंवा अनावधानाने नियम मोडला तर त्याला या क्रेडिट पॉईट्स आधारे दंडातून सूट देण्याची तरतूद कायद्यात केली जाऊ शकते. त्यासाठी आपल्या सरकारकडे आग्रह धरता येईल. काही महिन्यांपूर्वी नागपुरातील काही सिग्नलवर अशी व्यवस्था करण्यात आल्याचे ऐकिवात होते. त्या व्यवस्थेचा काय सकारात्मक परिणाम झाला आहे याचाही धांडोळा घेतला गेला पाहिजे.

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी** /महाल, नागपूर

### 'डेज'मुळे संस्कृती, मूल्यांशी दुरावा

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरे करण्याचे. त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोझ डेपासून सुरू झालेला डेजचा हा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, टेडी डे, प्रॉमिस डे , चॉकलेट डे, टेडी डे, हग डे, किस डे असे विविध प्रकाराचे डे येतात. डेजचा हा महोत्सव आठवडाभर चालतो. तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात. आजच्या सोशल मीडियाच्या युगात डेजचे तर पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, ब्रदर डे, सिस्टर डे, डॉक्टर्स डे, वकील डे, इंजिनीयर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अति झाले नि हसू आले अशी गत या डेजची झाली आहे. सोशल मीडियावर ॲक्टिव्ह राहणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांच्या पोस्टवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडत असतो. वर्षभर कधी आई-वडिलांप्रति प्रेम, आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप सक्रिय असतात. जन्मदात्या आई-वडिलांसाठी, त्यांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम करण्यासाठी, त्यांच्याप्रति आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डेची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमूल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेजची आवश्यकता आहे का, असा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्त्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### इतर पक्षांनी भाजपाकडून धडा घ्यावा

'भाजपच्या संघटनेचे यश' हा अग्रलेख भाजपाच्या संघटन कौशल्याचे योग्य कौतुक करणारा आहे. आता महाराष्ट्रात सर्वत्र भाजपने यश मिळवले आहे आणि तो फक्त शहरी लोकांचा पक्ष राहिला नाही हे सिद्ध केले आहे. त्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांपासून ते मोठ्या नेत्यांपर्यंत सर्वांनी समान कष्ट केले आहेत. मग ते बुथ पातळीवरील लोकसंपर्क असो वा विविध पक्षांना सोबत घेणे असो. सर्वांनी जीव तोडून प्रयत्न केले आणि त्याचे फळ आता दिसत आहे. भाजपातील कार्यकर्ते आणि नेते यांच्यात संवाद असतो आणि वरच्या फळीतील नेत्यांनी घेतलेला निर्णय मान्य करण्याची मानसिकता असते. इतर पक्षांनी फक्त मोदींवर टीका करत राहण्यापेक्षा जर भाजप का व कसा जिंकतो याचे निरीक्षण करून स्वत:मध्ये बदल केला तर त्यांनाच उपयोग होईल. शेवटी संघटना महत्त्वाची असते आणि तिच्यासाठीच काम करायचे असते हे भाजपाच्या कार्यकर्त्यांना पटलेले आहे.

**माया हेमंत भाटकर**/९८६९०७४४९९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच <u>कुठलाही लेख</u> पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





# मुक्ताई रत्न जीवन गौरव सोहळा उत्साहात

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

वै. मातोश्री जनाबाई अनंत इंगळे यांच्या तृतीय पुण्यतिथी प्रित्यर्थ गुलालाचे कीर्तन ह भ प चैतन्य देहूकर संत जगद्गुरू तुकाराम वंशज यांचे झाले व नंतर पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

वारकरी संप्रदायामध्ये ज्या महिलानी व महिला भजनी मंडळानी विशेष योगदान दिले आहे. आषाढी वारी, माघवारी किंवा सप्ताह मध्ये विशेष सेवा केलेली आहे. शिवाय निष्ठा आणि श्रद्धा यांचा समन्वय हाच आदर्श मानून जीवन जगणाऱ्या एका महिलेला कोयना नगरचे ह भ प सुभद्राबाई ज्ञानदेव गायकवाड व रुक्मिणी महिला भजनी मंडळ मित्रनगर, शेळगीचे अध्यक्ष अनिता तंबाके या महिला भजनी मंडळाला ह भ प अनंत इंगळे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली ह भ प चैतन्य महाराज देहूकर, प्रदेश अध्यक्ष ह भ प जोतिराम चांगभले यांच्या हस्ते शहर अध्यक्ष संजय पवार, प्रदेश उपाध्यक्ष किसन बापू कापसे, जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली भगरे, पार्वती आवताडे, दिनकर देशमुख, दगडू डोंगरे आदी पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानित केले. तसेच वारकरी संप्रदायातील प्रमुख कीर्तनकार महाराज, गायक, वादक, माघवारी पालखी सोहळा समिती २०२६ पदाधिकारी यांचा ही सन्मान करण्यात आला. श्री संत मुक्ताई मंदिर, राजेश कोठे नगर, लक्ष्मी पेठ येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमानंतर महाप्रसाद ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी तानाजी दादा बेलेराव, शंकर भोसले, बाळकृष्ण इंगळे, किशोर धायगुडे, प्रभाकर ताटे यांनी परिश्रम घेतले.


**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## वीज उपकेंद्रासाठी जागा पाहिजे.

महाराष्ट्र राज्य विदुयत वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, बार्शी तर्फे निवेदन करण्यात येते की, खालील ठिकाणी नवीन 33/11 केव्ही उपकेंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. या उपकेंद्रासाठी किमान 40 ते 60 आर क्षेत्रफळ व शक्यतो चौकोनी आकार असलेली तसेच सार्वजनिक रस्त्या लगत असणारी जमीन आवश्यक आहे. अशा प्रकारच्या जागा देऊ इच्छिणाऱ्या जमीन मालकांनी आपल्या जागेच्या प्रमाणित कागद पत्रासह जाहिरात दिलेल्या दिनांकापासून 15 दिवसाच्या आत महाराष्ट्र राज्य विदुयत वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, बार्शी आझाद चौक (पॉवर हाऊस), बुरूड गल्ली, बार्शी येथे जमिनीच्या अपेक्षित दरासह संपर्क साधावा.

| अ.क्र. | प्रस्तावित 33/11 के.व्ही. उपकेंद्राचे नाव | योजना |
|---|---|---|
| 1 | ढोकरी ता. करमाळा जि. सोलापूर | RDSS-MSKVY 2.0 |
| 2 | निमगाव (टे) ता. माढा जि.सोलापूर | ADB |

PRO/BMTZ/ 203/2025-26

कार्यकारी अभियंता
महावितरण, विभागीय कार्यालय, बार्शी



## जाहीर समन्स

**श्री. पी.डी. सुभेदार साहेब यांचे कोर्टात**

निनं. ३३
दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७०/२०२४

### बार्शी येथील मे. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब यांचे न्यायालयात

**नामदेव ज्ञानदेव यादव, वगैरे- ५**
रा. जामगाव (पा), ता. बार्शी, जि. सोलापूर -- अर्जदार
विरूध्द
१) लक्ष्मण जालींदर काकडे (मयत), वारस
२) प्रविण लक्ष्मण काकडे, वगैरे रा. ढोराळे, ता. बार्शी, -- सामनेवाला
३) सोपान निवृत्ती यादव, वय-६५ वर्षे,
४) मुळ राहणेचे गाव जामगाव (पा), ता. बार्शी,

ज्याअर्थी, प्रस्तुत अर्जदारानी सामनेवाला १ मयत लक्ष्मण जालीदर काकडे याचे विराध्द बार्शी येथील में. सि. ज. ज्यू, डि यांचे न्यायालयात अर्जदाराचे मयत वडिल ज्ञानदेव निवृत्ती यादव यांचे विरुध्द जमिनीच्या खरेदी मागणीचा दावा रे.मु. नं. १६३/२०१५ चा केलेला होता. त्याचा निर्णय सामनेवालाचे बाजूने झाल्यामुळे अर्जदाराने सामनेवाला विरुध्द जिल्हा न्यायालयात अपील केल आहे व अपीलाच्या उशिराच्या माफीसाठी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

प्रस्तुत प्रकरणात सामनेवाला नं. २ सोपान निवृत्ती यादव हा प्र.वादी नं. २ होता त्याचेवर सदर प्रकरणातील समन्स बजावणेसाठी पूर्वी राहत असलेल्या पत्त्यावर समन्स/नोटीसा पाटविण्यात आल्या परंतु त्या त्या पत्त्यावर राहत नसलेमुळे समन्स/नोटीसीची बजावणी झाली नाही, त्याचा अचूक पत्ता व ठावठिकाणा लागत नाही.

तरी सामनेवाला नं. २ सोपान निवृत्ती यादव यांनी या अर्जाची नेमली तारीख ०९/०३/२०२६ रोजी अथवा सदरचे जाहिर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसात जातीने अथवा प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपला बचाव दाखल करावा व आपला कायमचा पत्ता सदर प्रकरणात हजर करावा वरीलप्रमाणे सदर प्रकरणात हजर न झाल्यास अर्जदाराचा अर्जातील मागणीप्रमाणे सामनेवाला नं. २ विरोधात अर्जदार यांचे हक्कात अर्जाचा हुकूमनामा होईल याची नोंद घ्यावी.

हे जाहीर समन्स आमच्या सही व शिक्क्यानिशी दिले असे दि.१२/२/२०२६

सही/-
कनिष्ठ लिपिक

बार्शी

सही/-
अधिक्षक,
जिल्हा व सत्र न्यायाधीश बार्शी



## HEALTH DEPARTMENT
## GOVERNMENT OF MAHARASHTRA
## TENDER NOTICE - 2025-26
## CIVIL SURGEON SOLAPUR

**E Tender for Supply & Installation of Air Source Water Heating System.**

**Tender Reference No. CSS/Med.Store/Air Source Water Heating System / E Tender-06/25-26**

Civil Surgeon, Solapur invites proposals from reputed and experienced companies, Recognized Manufacturers, Authorized supplier to participate in the competitive bidding process to Supply & Installation Of Air Source Water Heating System. For the detailed tender documents, interested bidders should visit

**http://www.maharashtra.gov.in/tenders**

Tender submission would be online and the deadline to submit the proposals is 27/02/2026 (05.00 PM)

Civil Surgeon, Solapur

Aryan Creation



## Classifieds

**नोकरीविषयक**

**नोकरीची संधी!**
**सिक्युरिटी गार्ड, हॉस्पिटल सिक्युरिटी इंचार्ज, मामा-मावशी, बाईक वॉशिंगसाठी मुले तसेच प्रसिद्ध हॉटेलमध्ये वेटर व हाऊस किपिंगसाठी मुले पाहिजेत.**
**संपर्क: ९१५८१५८९७२, ७६६६५६०१४१, ९८५०६८०५२२**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**


# शेतकरीपुत्र ओंकार गवळीची तालुका कृषी अधिकारी पदाला गवसणी

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.१२ फेब्रुवारी-**

**ओंकार गावाकडे आल्यानंतर नेहमीच आई-वडिलांना शेतामध्ये काम करण्यासाठी मदत करायचा.१० तारखेला देखील आई-वडिलांना दिवसभर शेतातील कामे करण्यासाठी मदत करत असताना सायंकाळी ५:३०वा.सुमारास त्याने नेटवर निकाल पाहिला.आणि रँक पाहून त्याच ठिकाणी आई-वडिलांना घट्ट मिठी मारून आपल्या आनंद साजरा केला.**

माढा तालुक्यातील तांदुळवाडीचे ओंकार दिलीप गवळी याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या १८ मे २०२५ मधील मुख्य परीक्षेत व २३ जानेवारी २०२६ मध्ये घेतलेल्या मुलाखतीत राज्यात ५२ वी रँक मिळवत तालुका कृषी अधिकारी वर्ग -२ या पदाला गवसणी घातली आहे. विशेष बाब म्हणजे ज्या दिवशी निकाल जाहीर झाला त्या दिवशी ओंकार हा आपल्या आई-वडिलां बरोबर शेतीकामात मदत करत होता. शेतकऱ्याचा मुलगा तालुका कृषी अधिकारी झाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



ओंकारचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा,तांदुळवाडी व माध्यमिक शिक्षण महात्मा गांधी विद्यालय,काटेगाव ता.बार्शी येथे तर उच्च माध्यमिक शिक्षण मदर पब्लिक स्कूल,माढा येथे व बीएससी अग्रीकल्चरची पदवी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथून तर एमएससी इन अग्रो फॉरेस्टीची डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली येथून पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. त्याला आई वडील व प्राध्यापक व्ही.एम.मस्के यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.


## बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

### नियम - ८ (१)
### ताबा सूचना

याद्वारे, बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, २८/१०/२०२५ रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती.

कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, या सूचनाद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, ०९/०२/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा-मोहोळ.**<br>**कर्जदार :**<br>१. **M/s. नवीन मेट्रो बफ.**<br>**Prop.Mr. सलाम उस्मान शेख**<br>**पत्ता :** उस्मान पचुमियाँ शेख<br>सुळे नगर, घरकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर, पिन कोड-४१३२१३<br>मोबाईल क्रमांक - ९९७५४३५०२८ / ७४४७८३०९०९.<br>**२.सौ. फरीदा सलाम शेख.**<br>**सलाम उस्मान शेख**<br>सुळे नगर, घरकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर, पिन कोड-४१३२१३<br>मोबाईल क्रमांक - ९९७५४३५०२८ / ७४४७८३०९०९.<br>**जामीनदार : -**<br>**३.सौ. महमूद अब्दुल इनामदार**<br>पत्ता: S/o. अब्दुल सादिकसो इनामदार.<br>क्लासिक बेकरी जावळ.गुलशन नगर ता.मोहोळ.सोलापूर पिन कोड-४१३२१३<br>मोबाईल क्रमांक - ९८२२३५१०४१ | **सुरक्षा: -**<br>श्री. सलाम उस्मान शेख आणि श्रीमती फरीदा सलाम शेख यांच्या नावे मालमत्ता गहाण.<br>घर क्रमांक ७४३३ चे सर्व तुकडे आणि पार्सल १२३७ चौरस फूट आणि मोहोळ नगरपरिषदेच्या मोहोळ, ता. च्या अधिकारक्षेत्रात आहेत.<br>**सीमा:**<br>पूर्व - जीएटी क्रमांक ६६४/१९ रस्ता<br>पश्चिम - जीएटी क्रमांक -१२६८/१/अ पैकी सय्यद<br>दक्षिण - जीएटी क्रमांक -१२६८/१/अ पैकी तांबोळी<br>उत्तर - जीएटी क्रमांक -१२६८/१/अ पैकी खुली जागा | **मागणी सूचना**<br>२८.१०.२०२५ रोजीची<br>**एकूण** = ३७,२२,५१६.८५/-<br>(रुपये सदतीस लाख बावीस हजार पाचशे सोळा रुपये पंच्याऐंशी पैसे फक्त)<br>**सांकेतिक ताबा**<br>**दिनांक :** ०९/०२/२०२६ |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - 09/02/2026

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.



### जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मो.प्र.-१ दिनांक-१८/१०/२०२३
**परिशिष्ट-३**
**महाराष्ट्र शासन**
कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्रमांक २, सोलापूर यांचे कार्यालय
मोहिते नगर, आयकर भवन शेजारी, होटगी रोड, सोलापूर-४१३००३
दुरध्वनी क्रमांक ०२१७-२७४०६६० ई-मेल-eebdd2solapurgmail.com

### ई-निविदा सूचना क्रमांक २८ सन २०२५-२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र. २, सोलापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई- निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र.२, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये कांही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

कामाचे नाव :- सीना नदीला आलेल्या महापुरामुळे बाधीत झालेल्या को.प. बंधारा सिंदखेड.ता. दक्षिण सोलापूर येथील अत्यावश्यक दूरुस्ती काम सन-२०२५-२६.
जिल्हा :- सोलापूर
निविदेची किंमत रुपये:- रु.५०,६०,५२०/-
१. निविदा उपलब्ध कालावधी:- दि. १८.०२.२०२६ ते दि. २५.०२.२०२६
२. निविदा उघडण्याचा दिनांक: दि. २७.०२.२०२६ रोजी (सकाळी १०:०० वा.)

जा.क्र. भीविवि-२/लेशा-४/४५७/२०२६
भीमा विकास विभाग क्र.२,
सोलापुर दि. ०९/०२/२०२६.

सही/-
(प्र.पा. कडुसकर)
कार्यकारी अभियंता
भीमा विकास विभाग क्र.२,
सोलापुर

विमाका/पुणे/जाहि./३१०/२०२५-२६



## बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

### नियम - ८ (१)
### ताबा सूचना

याद्वारे, बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, १३/११/२०२५ रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती.

कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, या सूचनाद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, ०७/०२/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा-कळम्ब**<br>**कर्जदार:**<br>**श्री.अविनाश हरिभाऊ उमप**<br>पो.हिंगणगाव ता.कळम्ब येथे जि. धाराशिव.<br>**जामीनदार:**<br>**सौ ज्योती अविनाश उमप**<br>पो.हिंगणगाव ता.कळम्ब येथे जि. धाराशिव | **सुरक्षा: -**<br>श्री. अविनाश हरिभाऊ उमप आणि श्रीमती ज्योती अविनाश उमप यांच्या नावावर निवासी घराचे गहाण.<br>लातूर येथील म्हाडा इमारतीत असलेल्या आणि पडलेल्या जमिनीच्या सर्व तुकड्यांचे नोंदणीकृत गहाणखत, ज्याची निवासी मालमत्ता (फ्लॅट) फ्लॅट क्रमांक २१८ दुसरा मजला इमारत ई-७/बी-२ आहे. प्लॉट क्रमांक आर-१ जमीन क्रमांक १२४, योजना ३१४/७५६/टी/एस ईडब्ल्यूएस, एमआयडीसी, तालुका लातूर शहर लातूर.<br>**सीमा :**<br>पूर्व :- डक्ट<br>पश्चिम :- जिना आणि लॉबी<br>दक्षिण :- इमारतीचा मागील मार्जिन<br>उत्तर :- सदनिका क्रमांक २१७<br>CERSAI आयडी : २०००८६०८५२७५ | **मागणी सूचना**<br>दिनांक १३.११.२०२५<br>**एकूण** = रु. २२,९०,८८९.८०/-<br>(रुपये बावीस लाख नव्वद हजार आठशे एकोणऐंशी रुपये आणि ऐंशी पैसे फक्त )<br>**लाक्षणिक ताबा :**<br>**दिनांक :** ०७/०२/२०२६ |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - 07/02/2026

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.



## बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

### नियम - ८ (१)
### ताबा सूचना

याद्वारे, बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, ०२/१२/२०२५ रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती.

कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, या सूचनाद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, ०३/०२/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा-कलमन**<br>**कर्जदार:**<br>**श्री.कृष्णनाथ महादेव पेटकर.**<br>श्री.कृष्णनाथ महादेव पेटकर.<br>पत्ता- जीपीएच क्रमांक-६२० प्रशासन. १५००.०० चौरस फूट काका नगर ब्राशी रोड वडाळा ता.उत्तर सोलापूर जि. सोलापूर<br>पिन कोड ४१३४०१.<br>२.श्री. महादेव रामचंद्र पेटकर<br>पत्ता- जीपीएच - ६२० प्रशासन १५००.०० चौरस फूट काका नगर .बार्शी रोड वडाळा ता.उत्तर सोलापूर जि. सोलापूर.<br>**जामीनदार:**<br>३.श्री. आदम जाकीर सय्यद<br>पत्ता- वडाळा ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर | **सुरक्षा: -**<br>ग्रामपंचायत वडाळा ताई, उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर येथे आणि त्याच्या हद्दीत असलेल्या ग्रामपंचायत घर क्रमांक ६२०, १३९.४० चौ.मी. येथे असलेल्या आणि असलेल्या सर्व जमिनीच्या आणि इमारतीच्या तुकड्यांचे रजिस्टर गहाणखत.<br>सीमा खालीलप्रमाणे:-<br>पूर्व: ग्रामपंचायत घर ६१९ दक्षिण: ग्रामपंचायत घर क्रमांक ६२३/१<br>पश्चिम: ग्रामपंचायत घर क्रमांक ६२१<br>उत्तर: रस्ता.<br>मालमत्तेचे मालक कृष्णात महादेव पेटकर. | **मागणी सूचना**<br>दिनांक ०२.१२.२०२५<br>**एकूण** = रु.२४,१९,४९८.००/-<br>(रुपये चोवीस लाख एकोणीस हजार चारशे अठ्ठ्यान्ऊ रुपये फक्त )<br>**सांकेतिक ताबा**<br>**दिनांक :** ०३/०२/२०२६ |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - 03/02/2026

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.



## बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

### नियम - ८ (१)
### ताबा सूचना

याद्वारे, बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, १३/११/२०२५ रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती.

कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, या सूचनाद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, ०९/०२/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा - कॅम्प**<br>**कर्जदार :**<br>**१. श्री. सिध्दाराम श्रीनिवास विठ्ठल.**<br>पत्ता १: १३४/३५ गणेश पेठ, साखरपेठ सोलापूर.<br>पत्ता २: फ्लॅट क्रमांक: १, एस विंग, दुसरा मजला, अन्नपूर्णा अपार्टमेंट, प्लॉट क्रमांक: २३७, सिटी सर्व्हे क्रमांक: ९२०५/१, हनुमान मंदिराजवळ, उत्तर सोलापूर, सोलापूर ४१३००२.<br>**२. सौ. संध्या श्रीनिवास विठ्ठल**<br>पत्ता १: १३४/३५ गणेश पेठ, साखरपेठ सोलापूर.<br>पत्ता २: फ्लॅट क्रमांक: १, एस विंग, दुसरा मजला, अन्नपूर्णा अपार्टमेंट, प्लॉट क्रमांक: २३७, सिटी सर्व्हे क्रमांक: ९२०५/१, हनुमान मंदिराजवळ, उत्तर सोलापूर, सोलापूर ४१३००२. | **सुरक्षा: -**<br>श्री. सिध्दाराम श्रीनिवास विठ्ठल आणि श्रीमती संध्या श्रीनिवास विठ्ठल यांच्या नावावर निवासी घराचे गहाण.<br>सोलापूर जिल्हा सोलापूर येथे निवासी असलेल्या सर्व जमिनीच्या तुकड्यांचे नोंदणीकृत गहाण<br>फ्लॅट क्रमांक: १, एस विंग, दुसरा मजला, अन्नपूर्णा अपार्टमेंट, प्लॉट क्रमांक: २३७, शहर सर्वेक्षण क्रमांक: ९२०५/१, हनुमान मंदिराजवळ, उत्तर सोलापूर, सोलापूर ४१३००२.<br>**सीमा :**<br>पूर्व :- बोड्याल यांच्या मालकीची मालमत्ता<br>पश्चिम :- सुरवसे यांच्या मालकीची मालमत्ता<br>दक्षिण :- रस्ता<br>उत्तर :- रस्ता<br>CERSAI आयडी: २०००६४४२३३७२ | **मागणी सूचना**<br>दिनांक १३.११.२०२५<br>**लेजर बॅलन्स:**<br>रु. २४,७०,५८२/-+ लागू न केलेले व्याज: रु. ६७२५५.००/-+<br>**एकूण** = रु. २५,३७,८३७.००/-<br>(रुपये पंचवीस लाख सदोतीस हजार आठशे सदोतीस फक्त)<br>**लाक्षणिक ताबा :**<br>**दिनांक :** ०९/०२/२०२६ |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - 09/02/2026

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.



## PRECISION CAMSHAFTS LIMITED
Regd. Office : D5, M.I.D.C. Chincholi, Solapur, MH, 413255
CIN: L24231PN1992PLC067126

**Extract of unaudited Consolidated Financial Results for the Quarter and Nine Months ended December 31, 2025**
**[(Regulation 47(1)(b) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015]**

(Rs. in lakhs),except Earnings Per Share)

| Sr. No. | Particulars | Consolidated | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended Dec. 31, 2025 (Unaudited) | Nine Months ended Dec. 31, 2025 (Unaudited) | Quarter ended Dec. 31, 2024 (Unaudited) |
| 1. | **Revenue From Operations** | **17,867.97** | **57,186.57** | **19,454.75** |
| 2. | Profit Before Exceptional Item & Tax | 1,273.67 | 4,870.15 | (574.82) |
| 3. | Profit Before Tax | 1,119.04 | 5,665.21 | (451.61) |
| 4. | Profit for the Period | 920.84 | 4,118.73 | (635.92) |
| 5. | Total Comprehensive Income/(loss) (after tax) | 1,058.07 | 5,037.48 | (420.07) |
| 6. | Paid up Equity Share Capital (Equity Share of 10/- each) | 9,498.58 | 9,498.58 | 9,498.58 |
| 7. | Earnings per share (of Rs.10/- each) | - | - | - |
| | Basic : | 0.97 | 4.34 | (0.67) |
| | Diluted : | 0.97 | 4.34 | (0.67) |

**Notes:**
1. The above financial results for the quarter and nine months ended December 31, 2025 have been reviewed and approved by the Audit Committee and the Board of Directors of the Holding Company at the meeting held on February 11, 2026. The financial results are subjected to limited review by the statutory auditors of the Group and have issued unmodified opinion on the same.
2. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the Securities and Exchange Board of India ('SEBI') (Listing Obligations and Disclosure Requirements ('LODR')) Regulations, 2015. The full format of the unaudited Standalone & Consolidated Financial Results of the Company are available on the Stock Exchange's website **(www.bseindia.com and www.nseindia.com)** and also on the Company's website - **www.pclindia.in**.
3. These Financial Results have been prepared in accordance with Indian Accounting Standards ("Ind AS") prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 read with relevant rules issued there under and in terms of Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with SEBI circular no. CIR/CFD/FAC/62/2016 dated 5th July, 2016.
4. Key Standalone Financial information.

(Rs. in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Standalone | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended Dec. 31, 2025 (Unaudited) | Nine Months ended Dec. 31, 2025 (Unaudited) | Quarter ended Dec. 31, 2024 (Unaudited) |
| 1 . | **Revenue From Operations** | **14,290.11** | **42,006.74** | **14,307.56** |
| | Profit Before Exceptional Item and Tax | 1,329.56 | 5,936.53 | 595.74 |
| | Profit Before Tax | 1,152.37 | 783.39 | 718.95 |
| | Profit for the period/Year | 957.92 | -744.24 | 535.82 |
| 2. | Total Comprehensive Income (after tax) for the period | 1,118.77 | -576.91 | 542.52 |

Place : Solapur
Date : February 11, 2026

For and on behalf of the Board of Directors
Sd/-
Ravindra R. Joshi
Whole-time Director & CFO



# टी-२० विश्वचषकाचा थरार



## महत्त्वाचे

### अव्वल स्पर्धेत भाग घेणे हेच आमचे ध्येय : हॅरी मॅनेंटी



**मुंबई :** अव्वल स्तरावर स्पर्धा करणे हे नेहमीच इटली संघाचे ध्येय राहिले आहे, असे इटलीचा प्रभारी कर्णधार हॅरी मॅनेंटी पहिल्या टी-२० विश्वचषक विजयानंतर म्हणाला. इटलीने उत्कृष्ट कामगिरी करत नेपाळला तिन्ही विभागांमध्ये हरवून १० गड्यांनी विजय मिळवला, हा निकाल देशातील क्रिकेटसाठी एक निर्णायक क्षण होता. हो, हे खरोखरच विलक्षण आहे. इटलीचा विजय स्वप्नवत आहे, असे तो म्हणाला. जेव्हा आम्ही पात्र ठरलो, तेव्हा तो निश्चितच एक खास क्षण होता, पण आमचे ध्येय नेहमीच या पातळीवर स्पर्धा करणे आणि या अव्वल स्पर्धेत भाग घेणे हे होते आणि आज आम्ही ते दाखवून दिले, असे तो म्हणाला. आमच्या संघात किती ताकद आहे, हे आज आम्ही जगाला दाखवून दिले आहे. इटलीचा संघ नियमित कर्णधार वेन मॅडसेनशिवाय होता. मॅडसेन खांद्याच्या दुखापतीतून अजूनही बरा होत आहे. आमचा नेता आणि आमचा कर्णधार वेन गमावल्याने आम्हाला खूप दुःख झाले आणि मला आशा आहे की तो लवकरच परत येईल, परंतु मुले खरोखरच चांगली संघटित झाली, असेही तो म्हणाला.

### खेलो इंडिया हिवाळी स्पर्धा २३ फेब्रुवारीपासून गुलमर्ग येथे

**नवी दिल्ली :** खेलो इंडिया हिवाळी क्रकीडा स्पर्धेचा दुसरा टप्पा २३ ते २६ फेब्रुवारी दरम्यान गुलमर्ग येथे होणार आहे. या स्पर्धेत सुमारे ४०० स्पर्धक सहभागी होण्याची अपेक्षा आहे, अशी घोषणा क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी गुरुवारी केली. २० ते २६ जानेवारी दरम्यान लडाखमध्ये बर्फाच्या खेळांचा समावेश असलेला पहिला टप्पा झाल्यानंतर हे खेळांचे सहावे सत्र सुरू ठेवेल. गुलमर्गमध्ये बर्फाच्या स्पर्धांचे आयोजन केले जाईल आणि भारतीय सेना आपल्या एकूण विजेतेपदाचे रक्षण करेल. गुलमर्ग हिवाळी ऑलिम्पिकच्या मागे येत आहे आणि खेलो इंडिया हिवाळी खेळांचे आयोजन करण्याची ही योग्य वेळ आहे, असे मांडविया यांनी म्हटले आहे. लेहमध्ये आमचा पहिला टप्पा खूप यशस्वी झाला आणि जम्मू आणि काश्मीरमध्येही आम्हाला तोच उत्साह दिसेल, कारण खेळाडू पुन्हा एकदा निसर्गाशी आणि आव्हानात्मक परिस्थितीशी झुंजतील. लेहमध्ये, फिगर स्केटिंगच्या समावेशामुळे स्पर्धात्मक तीव्रता वाढली आणि गुलमर्गमध्ये आम्हाला कोंगदूरी उतारांवर काही प्रभावी वेळेची अपेक्षा आहे, असे ते पुढे म्हणाले. गुलमर्गमध्ये चार पदक स्पर्धा असतील - स्की माउंटेनियरिंग, अल्पाइन स्कीइंग, नॉर्डिक स्कीइंग (क्रॉस-कंट्री) आणि स्नोबोर्डिंग - ज्यामध्ये सुमारे ४०० खेळाडू स्पर्धा करतील अशी अपेक्षा आहे.

### आशियाई नेमबाजी स्पर्धेत ऐश्वर्य तोमरला सुवर्ण

**नवी दिल्ली :** जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील रौप्यपदक विजेता ऐश्वर्य प्रताप सिंग तोमरने गुरुवारी येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी ५० मीटर रायफल ३-पोझिशन स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. २०२५ मध्ये कझाकस्तानमध्ये आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून, तसेच जागतिक अजिंक्यपद आणि विश्वचषक अंतिम फेरीत रौप्यपदक जिंकून उच्चांक गाठणाऱ्या ऐश्वर्यने ही गती नवीन वर्षातही कायम ठेवली. त्याने ३६२ चा विश्वविक्रम नोंदवत नीरजला केवळ ०.२ गुणांनी मागे टाकले. २५ वर्षीय या खेळाडूने आपल्या शेवटच्या प्रयत्नात १०.७ गुणांसह उत्कृष्ट कामगिरी केली आणि ३६२ गुणांसह विजयावर शिक्कामोर्तब केले. निरजला ३६१.८ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर अखिल शेओरनने ३४३.५ गुणांसह कांस्यपदक जिंकले. यापूर्वी, निरजने पात्रता फेरीत ५९३ गुणांसह अव्वल स्थान पटकावले होते, तर ऐश्वर्य ५८८ गुणांसह दुसऱ्या आणि शेओरन ५८८ गुणांसह तिसऱ्या स्थानावर राहिला.

### कोनेरू हम्पी नॉर्वे महिला बुद्धिबळ स्पर्धेत भाग घेणार

**स्टॅव्हेंजर (नॉर्वे) :** भारतीय ग्रॅण्डमास्टर कोनेरू हम्पी २५ मे ते ५ जून दरम्यान होणाऱ्या प्रतिष्ठित नॉर्वे बुद्धिबळ महिला स्पर्धेत सहभागी होण्यास सज्ज आहे. या स्पर्धेत भाग घेण्याची हम्पीची ही तिसरी वेळ असेल. दोन वेळा जागतिक रॅपिड विजेती राहिलेली ३८ वर्षीय हम्पीचा या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या तीन भारतीय महिलांमध्ये समावेश आहे. नॉर्वे महिला बुद्धिबळ संघाचा भाग होण्याचा मला खरोखर आनंद आहे. ही एक अशी स्पर्धा आहे जी मी नेहमीच अनुभवली आहे, केवळ उच्च पातळीच्या स्पर्धेमुळेच नाही तर उबदार वातावरण आणि उत्कृष्ट आयोजन यामुळे देखील आनंददायक आहे, असे कोनेरु हम्पी म्हणाली.

# इटलीचा पहिला विश्वचषक विजय

## नवख्या इटलीची नेपाळवर १० गड्यांनी मात ● मोस्का बंधूची चमकदार कामगिरी



ॲन्थनी व जस्टीन मोस्काची विजयी खेळी

**◆ मुंबई, १२ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत क गटाच्या साखळी सामन्यात नवख्या इटलीने नेपाळवर १० गडी राखून दणदणीत विजय नोंदविला. विश्वचषकातील आपल्या दुसऱ्याच सामन्यात इटलीने पहिला विजय मिळवला. ॲन्थनी व जस्टीन मोस्का बंधू इटलीच्या विजयाचे शिल्पकार ठरले.

कर्णधार वेन मॅडसेनच्या अनुपस्थितीत इटली संघाचे नेतृत्व करणाऱ्या हॅरी मॅनेंटीने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या इटलीने १२ वर्षांपूर्वी स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या नेपाळला १९.३ षटकांत १२३ धावांत गुंडाळले. इटलीच्या जस्टिन व अन्थनी मोस्का या सलामी जोडी बंधूंनी स्वतःहून लक्ष्य गाठले. दोघांनीही अर्धशतके झळकावून सात षटके शिल्लक असताना विजयावर शिक्कामोर्तब केले.

नेपाळने आपल्या पहिल्या सामन्यात इंग्लंडविरुद्ध चिवट जुजंज दिली होती, परंतु इटलीविरुद्ध खेळताना त्यांना घाम फुटला. सलामीवीर कुशल भुर्तेल (५) लवकरच बाद झाला. मात्र त्यानंतर आसिफ शेखने (२०), कर्णधार रोहित पौडेल (२३), दीपेंद्र सिंग एअरी (१७) व आरिफ शेखने तेवढी २४ चेंडूंत २७ धावा करत इटलीची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांची घसरगुंडी उडाली. इटलीचा फिरकीपटू क्रिशन कालुगामेज , वेगवान गोलंदाज बेन मनेंटीच्या प्रभावी माऱ्यापुढे नेपाळचे फलंदाज टिकाव धरू शकले नाहीत. नेपाळचा संपूर्ण संघ १९.३ षटकांत १२३ धावांत बाद झाला.

इटलीच्या क्रिशन कालुगामेजने १८ धावांत ३ बळी, बेन मॅनेंटीने ९ धावांत २ बळी आणि जेजे स्मट्स, अली हसन, जसप्रीत सिंगने प्रत्येकी एक बळी टिपला. क्रिशन सामनावीर ठरला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना इटलीच्या ॲन्थनी मोस्काने दुसऱ्या चेंडूवर मिडविकेटवर जबरदस्त षट्कार मारला आणि जस्टिन मोस्का लवकरच आपल्या भावासोबत सीमारेषा गाठण्यात सहभागी झाला. जस्टिन ३७ चेंडूत ५० धावा करणारा पहिला फलंदाज ठरला, ॲन्थनीने केवळ २८ चेंडूत हा टप्पा गाठला. काही क्षणांनंतर ॲन्थनीनेच कव्हरमध्ये एक धाव घेऊन इटलीचा विजय पूर्ण केला. जस्टीन मोस्काने ४४ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद ६० धावांची, तर ॲन्थनी मोस्काने ३२ चेंडूंत ३ चौकार व ६ षट्कारांसह नाबाद ६२ धावांची विजयी खेळी केली.

इटलीच्या विजयामुळे मैदानात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आणि मुंबईत मोठ्या प्रमाणात उपस्थित नेपाळ समर्थक प्रेक्षक शांत झाले. कोलकाता येथे झालेल्या पहिल्या सामन्यात इटलीला स्कॉटलंडकडून पराभव पत्करावा लागला होता. त्यानंतर इटलीचा हा पहिला विश्वचषक विजय ठरला. ◀(वृत्तसंस्था)

# भारत-पाकिस्तान टी-२० विश्वचषकासाठी बीसीबीचे प्रमुख इस्लाम कोलंबोमध्ये येणार

## बीसीसीआयशी बैठक होण्याची शक्यता

**◆ ढाका, १२ फेब्रुवारी**



मी रविवारी भारत-पाकिस्तान टी-२० विश्वचषक सामना पाहण्यासाठी कोलंबोमध्ये असेल, असे बांगलादेश क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष अमिनुल इस्लाम म्हणाले.

गत काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या तणावपूर्ण वादानंतर बीसीसीआयशी वाद मिटवण्याची अपेक्षा आहे.

मला भारत-पाकिस्तान या हाय-प्रोफाइल सामन्याचे आमंत्रण आयसीसीकडून आले आहे, असे इस्लाम यांनी माध्यमांना सांगितले.

आयसीसीने निर्णय घेतला आहे. आयसीसीचे प्रमुख भागधारक हे पाच आशियाई देश आहेत आणि १५ तारखेला होणाऱ्या भारत-पाकिस्तान विश्वचषक सामन्यासाठी पाचही आशियाई देशांचे प्रतिनिधी एकत्र मैदानावर उपस्थित राहावेत, एकत्र सामना पाहावा आणि एकमेकांशी बोलावेत अशी त्यांची इच्छा आहे, असे इस्लाम म्हणाले.

भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान हे जागतिक संघटनेतील आशियाई गट आहेत.

ही बैठक बीसीसीआयसोबतचा तणाव संपवू शकते, अशी मला आशा आहे, असे ते म्हणाले.

बीसीसीआयने बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमान याला कोलकाता नाईट रायडर्ससोबतच्या आयपीएल करारातून मुक्त करण्याचा आदेश दिल्यानंतर बीसीसीआय-बीसीबी वाद सुरू झाला.

बांगलादेशने त्यांच्या राजकीय हिंसाचारामुळे हे पाऊल उचलले आहे, ज्यामध्ये हिंदूंना लक्ष्य केले जात आहे, असा व्यापक अंदाज होता.

बांगलादेशने सुरक्षेच्या कारणास्तव त्यांच्या विश्वचषक सामन्यांसाठी भारतात जाण्यास नकार दिला. तथापि, बीसीसीआयचे माजी सचिव जय शाह यांच्या नेतृत्वाखालील आयसीसीने त्यांच्या चिंता नाकारल्या आणि त्यांच्या स्वतःच्या मूल्यांकनानंतर धोक्याची भावना कमी ते मध्यम असल्याचे वर्णन केले.

जागतिक संस्थेशी दीर्घ चर्चा होऊनही त्यांच्या भूमिकेपासून हटण्यास नकार दिल्यानंतर बांगलादेशला अखेर स्पर्धेत स्कॉटलंडने स्थान दिले. ◀(वृत्तसंस्था)

### भारत-पाकिस्तान सामन्याचा पेच सुटला

त्यांच्या या चुकीमुळे बांगलादेशशी एकता व्यक्त करण्यासाठी पाकिस्तान सरकारने भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली. परंतु बीसीबी आणि श्रीलंका सरकारने पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांना हा निर्णय मागे घेण्यास राजी केल्यानंतर हा पेच सुटला.

चर्चेच्या दुसऱ्या फेरीनंतर, आयसीसीने मागील भूमिकेसाठी बीसीबीला दंड न करण्याचा निर्णय घेतला आणि २०२८-२०३१ सायकलमध्ये बांगलादेशला एक आयसीसी स्पर्धा देखील दिली. आश्वासने खऱ्या अर्थाने पूर्ण व्हावीत यासाठी बोर्ड एक सामंजस्य करार तयार करेल. एक सामंजस्य करार-प्रकारचा दस्तऐवज, जेणेकरून कोणतीही अनिश्चितता राहणार नाही, असे इस्लाम म्हणाले.

# नेदरलॅण्ड आव्हान कायम राखण्यास, तर अमेरिका पुनरुज्जीवनासाठी उत्सुक

**◆ चेन्नई, १२ फेब्रुवारी**





शुक्रवारी येथे होणाऱ्या गट अ सामन्यात टी-२० विश्वचषक सुपर एटच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या धोकादायक अमेरिकेविरुद्ध विजयासाठी नेदरलॅण्ड फलंदाजी आणि गोलंदाजी शिस्तीचे मिश्रण करण्याचा प्रयत्न करतील.

पाकिस्तानविरुद्ध स्पर्धेतील सलामीचा सामना थोडक्यात गमावल्यानंतर नेदरलॅण्ड संघाने गत सामन्यात नामिबियाविरुद्ध दमदार पुनरागमन केले.

१५७ धावांचा पाठलाग करताना, त्यांनी पुढील टप्प्यात स्थान मिळविण्याच्या शर्यतीत राहण्यासाठी दोन षटकांत सात गड्यांनी विजय मिळवला. अष्टपैलू बास डी लीडे त्यांच्या मोहिमेत केंद्रस्थानी असतील. त्याने नामिबियाविरुद्ध १५० च्या स्ट्राईक रेटने नाबाद ७२ धावा काढल्या आणि मधल्या षटकांमध्ये कर्णधार गेरहार्ड इरास्मससह दोन प्रमुख बळी टिपले. नेदरलॅण्ड संघाकडे अव्वल फळीत स्फोटक पर्याय आहेत, परंतु त्यांच्या मधल्या व तळाच्या फळीतील संघांबद्दल चिंता आहे. पाकिस्तानविरुद्ध त्यांची ही कमजोरी उघड झाली होती. त्यांनी शेवटचे सहा फलंदाज केवळ २४ धावांतच गमावले.

सातवा टी-२० विश्वचषक खेळत असताना नेदरलॅण्ड एक जबरदस्त संघात बदलला आहे आणि या स्पर्धेत अजूनही पहिल्या विजयाच्या शोधात असलेल्या अमेरिकन संघाची परीक्षा घेण्यासाठी विशेषतः डेथ ओव्हरवर आपल्या गोलंदाजीच्या खोलीचा आधार घेईल.

अमेरिकेने गोलंदाजीत आशादायक कामगिरी दाखवली आहे परंतु फलंदाजीने डळमळीत झाले आणि वाईट क्षेत्ररक्षणानेही त्यांना अडथळा निर्माण केला.

शॅडली व्हॅन शाल्कविक पॉवरप्लेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आहे, तर उंच लेग-स्पिनर मोहम्मद मोहसीनने डावखुरा फिरकी गोलंदाज हरमीत सिंगसह मधल्या षटकांमध्ये गोलंदाजी करण्यात प्रभावी कामगिरी केली आहे. गोलंदाजी ही अमेरिकेची ताकद आहे. कर्णधार मोनंक पटेलने भारताविरुद्ध ० आणि पाकिस्तानविरुद्ध ३ धावा केल्या आहेत, तर यष्टिरक्षक-सलामीवीर ॲण्ड्रीस गॉसने ६ आणि १३ धावा केल्या आहेत. दोन वर्षांपूर्वीच्या घरच्या विश्वचषकात गॉसने उत्कृष्ट कामगिरी केली होती. ◀(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**ऑस्ट्रेलिया वि. झिम्बाब्वे**
**स्थळ :** आर.प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो
**वेळ :** सकाळी ११.०० वाजतापासून

**कॅनडा वि. युएई**
**स्थळ :** अरुण जेटली स्टेडियम, दिल्ली
**वेळ :** दुपारी ३.०० वाजतापासून


**नेदरलॅण्ड वि. अमेरिका**
**स्थळ :** एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ :** सायंकाळी ७.०० वाजतापासून

**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# श्रीलंकेचा ओमानवर १०५ धावांनी विजय

## मेंडिस, रथनायके, शनाकाची अर्धशतके

**◆ कॅण्डी, १२ फेब्रुवारी**



सामनावीर पवन रथनायके २८ चेंडूंत ६० धावांची खेळी

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी एकतर्फी ठरलेल्या ब गटाच्या साखळी सामन्यात श्रीलंकेने ओमानवर १०५ धावांनी विजय नोंदविला. या सामन्यात श्रीलंकेच्या मेंडिस, रथनायके व शनाकाने अर्धशतके झळकावलीत व थिकशाना व चामिराने प्रभावी गोलंदाजी करत प्रत्येकी २ गडी बाद केले. अवघ्या २८ चेंडूंत ६० धावांची खेळी करणारा पवन रथनायके सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. दासुन शनाकाने १९ चेंडूत श्रीलंकेचे सर्वात जलद टी-२० आंतरराष्ट्रीय अर्धशतक झळकावले. श्रीलंकेचा हा दुसरा विजय असून त्यांनी ४ गुणांसह ब गटात अव्वल स्थान मिळविले.

प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने २० षटकांत ५ बाद २२५ धावा काढल्या. ही या विश्वचषकातील सर्वोच्च धावसंख्या आणि टी-२० विश्वचषकातील श्रीलंकेची दुसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. प्रत्युत्तर देताना ओमानला मर्यादित २० षटकांत ९ बाद १२० धावांपर्यंतच मजल मारता आली. ओमनाच्या मोहम्मद नदीने नाबाद ५३ धावांची अर्धशतकी खेळी केली, परंतु ही खेळी ओमानला विजय मिळवून देण्यास पुरेशी ठरली नाही, परिणामी ओमानला १०५ धावांनी पराभव पत्करावा लागला.

ओमानने नाणेफेक जिंकून श्रीलंकेला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. डावाच्या सुरुवातीला श्रीलंकेला दोन जबरदस्त हादरे बसले. पाथूम निसंका (१३) व कामील मिशारा (८) ही सलामी जोडी लवकरच तंबूत परतली, मात्र त्यानंतर कुसल मेंडिस, पवन रथनायके व कर्णधार दासून शनाकाने तडाखेबंद फलंदाजी केली व श्रीलंकेच्या धावसंख्येला आकार दिला. एक टोक सांभाळीत मेंडिसने पवन रथनायकेसोबत तिसऱ्या गड्यासाठी ९४ धावांची भागीदारी केली, तर दासून शनाकासोबत चौथ्या गड्यासाठी ६३ धावांची भागीदारी केली व संघाला दोनशे धावांचा टप्पा गाठून दिला. पवनने २८ चेडूत ८ चौकार व एका षट्कारसह ६० धावांची खेळी केली. दासून शनाकाने २० चेंडूंत ५० धावांची अर्धशतकी खेळी केली, यात त्याने २ चौकार व ५ षट्कार खेचलेत. कुस मेंडिसने ४५ चेंडूत ७ चौकारांसह ६१ धावांची खेळी केली. औमानकडून जितेन रामानंदीला २ बळी, तर जय ओबेद्रा व सुफियान मेहमूदला प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश आले. विजयासाठी धावांचा पाठलाग करताना ओमानची दाणादाण उडाली. त्यांचे पहिले तीन फलंदाज लवकरच तंबूत परतले, त्यावेळी ओमानची स्थिती ५.५ षटकांत ३ बाद ३६ अशी होती, मात्र त्यानंतर मोहम्मद नदीम व वसीम अलीने (२७) संयमाने फलंदाजी करत संघाच्या आशा जीवंत ठेवल्या. नदीमने वसीम अलीसोब त चौथ्या गड्यासाठी ४२ धावांची भागीदारी केली. मात्र वसीम बाद झाल्यावर मोहम्मद नदीमने एक टोकाहून किल्ला लढविला, मात्र दुसऱ्या टोकावरील फलंदाज नियमित अंतराने बाद होत गेले. श्रीलंकेने ओमानला २० षटकांत ९ बाद १२० धावांवर रोखले. श्रीलंकेकडून दुश्मंता चामिरा व महेश थिकशानाने प्रत्येकी २ बळी, दुनिथ वेल्लालगे, दुशान हेमंथा व कामिंदू मेंडिसने प्रत्येकी १ बळी टिपला. ◀(वृत्तसंस्था)



महेश थिकशानाचे दोन बळी

# कॅनडा, युएईचे विजयाचे लक्ष्य

**◆ नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी**





दिलप्रीत बाजवा मोहम्मद वसीम

मोठ्या पराभवामुळे अडचणीत आलेले कॅनडा आणि युएई शुक्रवारी टी-२० विश्वचषकातील गट ड च्या लढतीत एकमेकांविरुद्ध खेळतणार आहे. हे दोन्ही संघ विजयासाठी उत्सुक असतील.

न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान या तीन अव्वल-१० संघांसह 'ग्रुप ऑफ डेथ' मध्ये खेचले गेलेले युएई आणि कॅनडा या दोन्ही संघांना सुपर एट फेरीत पोहोचण्याचे कठीण आणि अशक्य आव्हान आहे. त्यांच्या मोहिमेची सुरुवात निराशाजनक झाली, दोन्ही संघांना मोठ्या पराभवांना सामोरे जावे लागले. सर्व सहा सामने जिंकून अमेरिका रीजनल फायनलमध्ये वर्चस्व गाजवणाऱ्या कॅनडाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आपला पहिला सामना ५७ धावांनी गमावला, तर युएईला न्यूझीलंडकडून १० गड्यांनी पराभव पत्करावा लागला.


गत चार महिन्यांत कॅनडाचा उच्च दर्जाचा सामना अनुभवाचा अभाव त्यांच्या पहिल्या सामन्यात स्पष्ट दिसून आला. तथापि, काही सकारात्मक बाबी देखील होत्या. २१४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना त्यांनी धाडस दाखवले आणि सुरुवातीच्या विकेट गमावल्यानंतरही त्यांचा डाव पुन्हा उभारला.


डावखुरा मनगट फिरकी गोलंदाज अंश पटेलने आपल्या विविधतेने प्रभावित केले. त्याने एडन मार्करामसह प्रमुख फलंदाजांना बाद केले. नवनीत धालीवालचे अर्धशतक व मधल्या फळीतील फलंदाज हर्ष ठाकरचा फॉर्म उत्साहवर्धक होता. ◀(वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलिया झिम्बाब्वेवर विजय मिळविण्यास उत्सुक

### मिचेल मार्शची तंदुरुस्ती चिंतेचा विषय

**◆ कोलंबो, १२ फेब्रुवारी**





शुक्रवारी टी-२० विश्वचषकातील गट ब च्या साखळी सामन्यात दुखापतग्रस्त ऑस्ट्रेलिया झिम्बाब्वेला मागे टाकून सुपर एटच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करत असताना कर्णधार मिचेल मार्शच्या तंदुरुस्तीवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल.

मार्श बुधवारी आयर्लण्ड विरुद्धच्या विजयात दुखापतीमुळे खेळू शकला नाही आणि क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या मते, या अष्टपैलू खेळाडूला पुन्हा खेळण्यासाठी बराच वेळ विश्रांती घ्यावी लागेल.

स्टीव्ह स्मिथ त्याच्या जागी संघात सहभागी झाला आहे, परंतु मार्शची अनुपस्थिती ऑस्ट्रेलियाच्या ६७ धावांच्या खेळात जाणवली नाही, कारण त्यांनी आयर्लण्डविरुद्ध अष्टपैलू प्रयत्न केले. लेग-स्पिनर ॲडम झॅम्पाने आठ बळी घेऊन आपल्या संघाला दोन पूर्ण गुण मिळवून दिले.

झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाला अधिक चांगले खेळायचे आहे. सलामीवीर ट्रॅव्हिस हेड आणि ग्लेन मॅक्सवेल यांच्याकडून खूप अपेक्षा आहे. जर मार्श अनुपस्थित असेल तर ऑस्ट्रेलियन संघासाठी स्मिथची उपस्थिती दिलासा देईल.

ऑस्ट्रेलियन संघाला झिम्बाब्वेविरुद्ध अशा प्रभावी गोलंदाजांची आवश्यकता आहे, त्यांच्याकडे प्रतिस्पर्धी संघांना आश्चर्यचकित करण्याची क्षमता आहे. त्यांच्याकडे ब्रॅड इव्हान्स, ब्लेसिंग मुझाराबानी आणि रिचर्ड नगारावासारखे वेगवान गोलंदाज आहेत. सिकंदर रझाच्या ऑफ आणि लेग ब्रेकच्या मिश्र बॅगमुळे त्यांच्या आक्रमणात आणखी एक आयाम भर पडतो.

अनुभवी टी-२० खेळाडू रझाला ब्रायन बेनेट, डायन मायर्स आणि ४० वर्षीय ब्रेंडन टेलरसह फलंदाजीतही आपले योगदान द्यावे लागेल. ◀(वृत्तसंस्था)

### अफगाणिस्तानच्या नबीला दंड

**◆ नवी दिल्ली, १२ फेब्रुवारी**

अफगाणिस्तान विरुद्ध दक्षिण आफ्रिका टी-२० विश्वचषक सामन्यादरम्यान पंचांच्या सूचनांचे उल्लंघन केल्याबद्दल मोहम्मद नबीला सामना शुल्काच्या १५ टक्के दंड ठोठावण्यात आला.

या घटनेत गोलंदाज लुंगी नगिदीच्या मनगटाच्या पट्ट्यावरून बराच वेळ वाद झाला, त्यामुळे आयसीसीच्या आचारसंहिता कलम २.४ चे उल्लंघन झाले. या गुन्ह्यासाठी नबीला डिमेरिट पॉइंट मिळाला. २४ महिन्यांच्या कालावधीत त्याचा पहिलाच गुन्हा होता. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या त्याच्या संघाच्या पराभवादरम्यान पंचांच्या निर्णयाचे उल्लंघन केल्याबद्दल अनुभवी अफगाणिस्तानचा अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नबीला दंड ठोठावण्यात आला आहे. ◀(वृत्तसंस्था)



# विजेत्या आरसीबी महिला संघाच्या प्रत्येक खेळाडूला मिळणार चेतक सी २५

**पुणे, १० फेब्रुवारी-**

जगातील सर्वांत मौल्यवान दुचाकी आणि तीन चाकी वाहन कंपनी असलेल्या बजाज ऑटो लिमिटेडने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू महिला संघाचे या वर्षीच्या महिला टी-20 लीगमधील विजयाबद्दल अभिनंदन केले. ते विजेत्या संघातील प्रत्येक खेळाडूला संपूर्ण हंगामात दाखवलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल एक नवीन चेतक सी २५ भेट देणार असल्याचे घोषित केले.

ही मान्यता एका संस्मरणीय हंगामाची आहे ज्यामध्ये चेतकने आरसीबी महिला संघाचा अधिकृत राइड पार्टनर म्हणून काम केले. संघ आणि बंगळुरू शहर पुन्हा एकदा या मोहिमेत एकत्र आले. आत्मविश्वास, ताकद आणि महत्त्वाकांक्षेने भरलेले, प्रगती, ऊर्जा आणि आधुनिक शहरी ओळख यावर सामायिक विश्वास दर्शवितात. चेतक सी २५ हे चेतक श्रेणीतील नवीन मॉडेल आहे, जे जलद गतीच्या शहरी जीवनासाठी विकसित केले गेले आहे. त्याची हलकी रचना आणि स्थिर रचना शहरांमध्ये आरामदायी आणि विश्वासार्ह राईड अनुभव प्रदान करते. सी २५ महिला संघाच्या विजेतेपद मोहिमेतील गुणांचेच प्रतीक आहे. यामध्ये चपळता, दबावाखाली संयम राखण्याची क्षमता आणि प्रत्येक आव्हानाला आत्मविश्वासाने स्वीकारण्याची क्षमता यांचा समावेश आहे. ते चेतकच्या ताकद, स्थिरता आणि विश्वासार्ह कामगिरी या मूलभूत मूल्यांचे देखील प्रतीक आहे.

याप्रसंगी बोलताना, बजाज ऑटो लिमिटेडचे मार्केटिंग अध्यक्ष सुमित नारंग म्हणाले, २०२६ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू महिला संघाचे त्यांच्या ऐतिहासिक विजयाबद्दल हार्दिक अभिनंदन. त्यांची दृढता आणि आत्मविश्वास चेतकच्या मूल्यांशी पूर्णपणे जुळते. ही भागीदारी आमच्या मजबूत वारशाला नवीन पिढीच्या महत्त्वाकांक्षेशी जोडते. या प्रभावी कामगिरीचा आनंद साजरा करण्यासाठी, आम्ही महिला २० संघातील प्रत्येक खेळाडूला एक नवीन चेतक सी २५ भेट देत आहोत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे सीओओ राजेश मेनन म्हणाले, चेतकने या हंगामात आमच्या संघात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे, ज्यामुळे मैदानावर आणि मैदानाबाहेर चाहत्यांचा सहभाग आणखी वाढला आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# सांगोल्यातील स्टेशन रोड रुंदीकरण, डांबरीकरणाची मागणी

## लवकर काम न केल्यास रास्ता रोकोचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१२ फेब्रुवारी -**

सांगोला शहरातील एचडीएफसी बँक, महात्मा फुले चौक- नेहरू चौक येथील रस्त्याच्या दुरावस्थेमुळे व्यापारी, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून सदर रस्त्याचे काम पूर्ण करावे तसेच सदर काम पूर्ण न केल्यास व्यापारी नगर परिषदेकडे कोणताही कर भरण्यास इच्छुक नसल्याचे कळवत महात्मा फुले चौकात तीव्र स्वरूपाचे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा व्यापारी व शहीद अशोक कामटे सामाजिक संघटनेच्यावतीने मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी व



नगराध्यक्ष आनंदा माने यांना निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी शहरातील व्यापारी, रहिवाशी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरातील या प्रमुख मार्गाची दुरावस्था झाली असून नेहरू चौकापर्यंत या रस्त्याची रुंदी फारच कमी असल्याने वाहतूक कोंडी होऊन अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच भुयारी गटारी कामाकरीता या भागात सर्व रस्ते खोदल्याने प्रचंड प्रमाणात स्टेशन रोडवर धुळीचे लोट दिवसभर हवेमध्ये वातावरणात राहत असल्याने शहरवासीयांना दमा, खोकला व श्वसनाचे आजार वाढले आहेत. तसेच येथील व्यावसायिकांवरही मोठा परिणाम झालेला आहे. तरी या रस्त्याच्या रुंदीकरण, दुभाजक तयार करून रस्ते करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती आ.डॉ. बाबासाहेब देशमुख, माजी आ.शहाजीबापू पाटील व जिल्हाधिकारी, सोलापूर यांनाही देण्यात आल्याची माहिती संघटनेच्यावतीने देण्यात आली.

> नगरपालिकेने केवळ पाणी न मारता कायमस्वरूपी लवकरात लवकर येथील रस्ते करून धुळमुक्त सांगोला करावा. शहरवासीयांचा अंत पाहु नये. याबाबत नगरपालिका प्रशासनाने पुढील कार्यवाही वेळेत करावी.
> **- निलकंठ शिंदे, अध्यक्ष, शहीद अशोक कामटे संघटना**

> सदर मागणीचे निवेदन प्राप्त झाले असून शिष्टमंडळाशी संपूर्ण सकारात्मक चर्चाही झाली आहे. हा रस्ता नवीन पूर्ण करण्याकरता नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवक यांची अनुमती मिळवून तात्काळ आवश्यक त्या निविदा प्रक्रिया राबवून हा मार्ग धुळमुक्त लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करणार आहे.
> **- डॉ.सुधीर गवळी, मुख्याधिकारी, न.प.सांगोला**

> एक वर्षापासून प्रचंड धुळीचा व खराब रस्त्याचा मुकाबला येथील व्यावसायिक, रहिवाशी नागरिक करीत आहेत. परिणामी व्यापाऱ्यांचे अतोनात नुकसान होऊन आरोग्य धोक्यात आले आहे. हा प्रश्न येत्या पंधरा दिवसात निकाली न निघाल्यास आम्ही सर्व व्यापारी रास्ता रोको आंदोलन करणार आहे.
> **- मोहिंदर बनकर, व्यापारी, सांगोला**

# भारत विकास परिषदेतर्फे शनिवारी मोफत दिव्यांग शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१२ फेब्रुवारी -**

भारत विकास परिषद शाखा पंढरपूर आणि दिव्यांग केंद्र पुणे यांच्या तर्फे तसेच महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड पुणे आणि कै. महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठान मंगळवेढा यांच्या सहयोगाने मोफत दिव्यांग शिबिराचे आयोजन शनिवार दि.१४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९वा. नवीन कराड नाका येथील डॉ. काणे यांचे गायत्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पंढरपूर येथे होणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन आ.समाधान आवताडे,माजी आमदार प्रशांत परिचारक, दिव्यांग केंद्र, पुणे चे विश्वस्त विनय खटावकर, आवताडे शुगर्स चे चेअरमन संजय आवताडे या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

भारत विकास परिषद शाखा पंढरपूर चे संस्थापक अध्यक्ष डॉ सुरेन्द्र काणे, अध्यक्ष सौ स्मिता कोर्टीकर, डॉ वर्षा काणे, सचिव मंदार केसकर, कोषाध्यक्ष सुनील परळीकर, सौ माधुरी जोशी, मिलिंद वाघ, राजेंद्र केसकर, डॉ अनिल पवार, अजित कुलकर्णी, आर डी देशपांडे, अमित शिरगावकर, सौ भाग्यश्री लिहिणे, डॉ मृणाल गांधी,

सौ अनुराधा हरिदास, सौ मोनिका शहा, सौ रेखा टाक, विवेक परदेशी, भारत गदगे , दत्तात्रय तरळगट्टी व सर्व सदस्य हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत.

या शिबिरात दिव्यांग व्यक्तींना हात व पाय बसविण्यासाठी मापे घेण्यात येणार आहेत.

एका हात, पायाची किंमत कमीत कमी ५०हजार रुपये आहे.




यामुळे दिव्यांग बांधवांना मोठा लाभ होऊन त्यांचे जगणे सुसह्य होणार आहे.

भारत विकास परिषद पंढरपूर शाखा ही समाजसेवा तसेच विविध सामाजिक ,सांस्कृतिक, साहित्यिक, लोकोपयोगी कार्यक्रम आयोजित करून

सातत्याने समाजाचे आपण काही देणे लागतो या विचाराने प्रेरित होऊन कार्य करत आहे,

तरी पंढरपूर व परिसरातील गरजू लोकांनी या मोफत दिव्यांग शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन भारत विकास परिषद शाखा पंढरपूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महत्वाचे...

### संत सेवालाल जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**अध्यक्ष सावन चव्हाण यांची माहिती**



**दक्षिण सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

बंजारा समाजाचे आराध्य दैवत आणि थोर क्रांतीकारक संत श्री सेवालाल महाराज यांची जयंती सेवालाल नगर, मंद्रूप येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. या निमित्ताने 'संत श्री सेवालाल महाराज जयंती उत्सव समिती' कडून विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहीती उत्सव समितीचे अध्यक्ष सावन चव्हाण यांनी दिली. यावेळी उत्सव समितीचे नूतन अध्यक्ष: सावन चव्हाण, उपाध्यक्ष सुनील राठोड, खजिनदार योगेश्वर पवार, सहखजिनदार प्रकाश पवार यांची निवड करण्यात आली आहे. सेवालाल महाराज यांची जयंती ही केवळ परंपरा नसून ती समाजाला एकसंध बांधण्याची पर्वणी आहे. या निमित्ताने महाराजांच्या विचारांचा जागर करण्यासाठी मिरवणूक, भजन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे अध्यक्ष सावन चव्हाण यांनी सांगितले.

### तिल्हेहाळ येथील जागृत महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त धार्मिक कार्यक्रम

**तिल्हेहाळ, दि. १२ फेब्रुवारी-**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील तिल्हेहाळ येथील जागृत महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी पहाटे ५ वाजता अभिषेक, होम हवन सकाळी ८ वाजता महाआरती आणि सकाळी ९ ते ५ वाजेपर्यंत फराळ व महाप्रसादाचे वाटप तसेच दिवसभर हनुमान भजनी मंडळ (तिल्हेहाळ), रेवणसिध्द भजनी मंडळ (औज), हनुमान महिला भजनी मंडळ (दमाणी नगर, सोलापूर),हनुमान भजनी मंडळ(हिपळे), हनुमान भजनी मंडळ, आलेगांव यांच्या भजनाचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी ६:१५ वाजता उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाआरती होणार आहे.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश हसापूरे, नूतन जि. प. सदस्य रामाप्पा चिवडशेट्टी, वळसंगचे सहायक पोलीस निरीक्षक राहूल डोंगरे,झुआरी सिमेंटचे हेडलबर्ग दीपक कक्कड, संभाजी अरमारचे संस्थापक श्रीकांत डांगे,कार्याध्यक्ष तथा नूतन नगरसेवक सोमपा शिवाजी वाघमोडे, नूतन पं.स. सदस्य अंबिकाताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. रात्री ८ वाजता प्रसिध्द भारुडकार ह.भ.प.पांडुरंग गवळी (भालेवाडीकर), ह.भ.प.रघुनाथ बिराजदार (बिदरकर), ह.भ.प. संभाजी झरे (लातूरकर)यांचा भारुडाचा कार्यक्रम होणार आहे.सोमवारी सकाळी ८ वाजता महाआरती व सुनीलसिंह सज्जनसिंह चौहान यांच्यातर्फे महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुजारी चरणसिंग राजपूत यांनी केले आहे.




# सामाजिक शास्त्रांमध्ये बहुविषयक संशोधन आवश्यक : कुलगुरु डॉ. दास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

आजचा समाज वेगाने बदलतो आहे. आर्थिक-तांत्रिक परिवर्तन, डिजिटलता, नव्या धोरणरचना आणि कृत्रिम बुध्दिमत्तेचा प्रसार या सर्वांचा अभ्यास केल्याशिवाय सामाजिक शास्त्रांचे संशोधन पूर्णत्वास जात नाही. त्यामुळे सामाजिक शास्त्रांमध्ये बहुविषयक संशोधन होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँन्ड इकॉनॉमिक्स, पुणेचे कुलगुरू प्रा.डॉ.उमाकांत दास यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुलाच्यावतीने आयोजित 'सामाजिक शास्त्रांतील नवे प्रवाह' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. प्रकाश महानवर हे होते. व्यासपीठावर सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ.गौतम कांबळे, इतिहास व पुरातत्वशास्त्र विभागप्रमुख डॉ.प्रभाकर कोळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सामाजिक शास्त्रांना आता एका विषयापुरते मर्यादित राहून चालणार नाही. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, डेटा विश्लेषण, लोकधोरणे आणि तंत्रज्ञान यांचा संगम म्हणजे भविष्यातील संशोधनाची खरी दिशा आहे. विद्यार्थ्यांनी आणि संशोधकांनी शास्त्रांची भिंत तोडून नव्या दृष्टीकोनातून समाजाचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

कुलगुरु प्रा.प्रकाश महनवर म्हणाले, बदलत्या सामाजिक रचनेच्या पार्श्वभूमीवर संशोधनाची गुणवत्ता आणि संशोधकांची जबाबदारी वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. एआय, मशीन लर्निंगच्या युगात सामाजिक शास्त्रांना खूप महत्त्व आहे. विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुलाच्यावतीने समाजाच्या विकासावर सतत विविध उपक्रम व कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते, ही बाब कौतुकास्पद आहे.

यावेळी डॉ.गौतम कांबळे, डॉ.प्रभाकर कोळेकर यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. हाजीमलंग शेख यांनी मान्यवरांचा परिचय करुन दिला. डॉ.अंबादास भासके यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.श्रीनिवास भंडारे यांनी आभार मानले. या परिषदेसाठी विद्यार्थी, अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयात क्रीडा महोत्सव जल्लोषात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

येथील छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमानाने क्रीडा महोत्सव जल्लोषात प्रारंभ झाला.

प्रारंभी किनीकर या विद्यार्थिनीने विविध प्रकाराच्या योगासनाचे प्रात्यक्षिक करून उपस्थितांची मने जिंकली. सोहेल पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली बॉक्सिंगचा डेमो ठेवण्यात आला होता. प्रास्ताविक प्रा.शंभूदेव गावडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. युवराज सुरवसे यांनी केले. या क्रीडा सप्ताहात संगीत खुर्ची, रस्सीखेच,चमचा लिंबू, पोते उड्या स्पर्धा, फनी गेम, कबड्डी, बॅडमिंटन, बेसबॉल, स्लो सायकल, हॉलीबॉल व क्रिकेट या क्रीडा प्रकारांचे आयोजन केले आहे.

याचे उद्घाटन छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मोटे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या मंजुश्री पाटील यांच्या हस्ते झाले. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष गवळी, पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य प्रा.सचिन गायकवाड, डॉ.अरुण मित्रगोत्री, डॉ.अरुण सोनकांबळे, डॉ.वाल्मीक कीर्तीकर, डॉ. अभिमन्यू ओहोळ, डॉ. राणी मोटे, प्रा.साळुंखे मॅडम, प्रा. जगताप मॅडम, प्रा.अश्विनकुमार नागणे, प्रा. अमर पवार, प्रा. पांढरे सर,दत्ता भोसले, संतोष अलकुंटे, केशव लोंढे, संजीव थिटे आदी उपस्थित होते.

# रुद्रशक्ती गुरुकुलची 20 पदकांची कमाई

## शालेय युग मुन डो राज्य स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

विभागीय क्रीडा संकुल मीनाताई ठाकरे इनडोअर स्टेडियम पंचवटी येथे झालेल्या शालेय युग मुन डो या कोरियन मार्शल आर्ट राज्यस्तरीय स्पर्धेत रुद्रशक्ती गुरुकुलचे २१ पैकी २० विद्यार्थ्यांनी ७ सुवर्ण, ७ रौप्य पदक ६ कांस्य अशी २० पदकाची कमाई केली.

त्यांना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्किन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे युग मुन डो असोसिएशन महाराष्ट्राचे सचिव नागेश शेट्टीकर, इंडियाचे अध्यक्ष मास्टर रोहित नारकर, रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी अभिनंदन केले.



**कामगिरी अशी :**
**१४ वर्षाखालील : सुवर्ण :** आदिती नल्ला, गौरी माळी, अथर्व बुरबुरे.
**रौप्य :** तेजल रच्चा, श्रद्धा इपनपल्ली, श्वेता वंगारी, भावेश कुने, संकल्प गोड्रा.
**कांस्य :** दिव्या मिस्किन, श्रावणी गवळी, स्वप्नाली जमादार, वेदांत सोमा, वैभव माडे. सहभाग : अथर्व स्वामी.
**१७ वर्षाखालील : सुवर्ण :** सोनाक्षी माडे, श्रद्धा सरवदे, बिंदुप्रिया कुणे, अजिंक्य गायकवाड.
**रौप्य :** दिव्या पावशेरे, प्रवलीका कामुर्ती. कांस्य : पल्लवी बिनगुंडी.

# चाचा नेहरू बालमहोत्सवात 'मुलांचे बालगृह सोलापूर'चे यश

**रेणुका सरवदे व पलक अडसूळ तिहेरीचे मानकरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र राज्य जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय यांच्या वतीने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय चाचानेहरु बालमहोत्सव मुलांचे बालगृह या संस्थेतील मुलां मुलींचे उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांना अधिक्षक भिसे, कांबळे उपअधिक्षक पंकज कस्तुरे, काळजीवाहक संतोष भगत यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे सचिव हर्षल कोठारी व सदस्य डॉ. नवनित तोष्णीवाल व ए.एस. बिराजदार यांनी कौतुक केले.

**कामगिरी : मुले : लहान गट :** कबडडी (विजेते) लहानगट विजेते १०० मीटर धावणे प्रथम (विठ्ठल गौडा), ५० मीटर धावणे द्वितीय (जयराज मोटे) बुध्दिबळ लहानगट व्दितीय (प्रणव सुर्यवंशी) बुध्दीबळ मोठा गट द्वितीय (जयराज मोटे) कॅरम लहान गट प्रथम (समर्थ पवार) वैयक्तिक नृत्य लहानगट व्दितीय (जयराज मोटे) लिंबुचमचा लहान गट द्वितीय (जयराज मोटे) सामुहीक नृत्य/ ग्रुप डान्स लहान गट (प्रथम)

**मुली :** लहान गट : सिध्दी फाटके (वक्तृत्व स्पर्धा, द्वितीय), स्वरांजली जाधव (हस्ताक्षर, द्वितीय), श्रावणी मलवे (तीन पायाची शर्यत, द्वितीय), रेणुका कुमार सरवदे (५० मी. धावणे, द्वितीय), रेणुका सरवदे (४ बाय १०० मी रिले द्वितीय व लिंबू चमचा प्रथम आणि वैयक्तिक नृत्य प्रथम) श्रावणी वि. मलवे (ग्रुप सामुहिक नृत्य, प्रथम). सिध्दी फाटके (वैयक्तिय गायन प्रथम), नंदिनी दत्तात्रय रोकडे (वक्तृत्व स्पर्धा, प्रथम). **मोठा गट :** पलक कुदंन अडसुळ (निबंध स्पर्धा प्रथम व वै. नृत्य, प्रथम आणि चित्रकला स्पर्धा द्वितीय व १०० मी. धावणे द्वितीय), शांतम्मा ग्रुप (४ बाय १०० मि. रिले, द्वितीय), नंदिनी दत्तात्रय रोकडे (गोळा फेक, द्वितीय).

## निधन वृत्त...

### श्रीकांत पुजारी



**सांगोला,दि.१२ फेब्रुवारी -**

सांगोला शहरातील महादेव गल्ली येथील रहिवासी दस्त लेखनीक व दत्तभक्त श्रीकांत श्रीराम पुजारी (वय-४८) यांचे अल्पशा आजाराने बुधवार दि.११ फेब्रुवारी रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगी, भाऊ, बहिण असा परिवार आहे.

### लक्ष्मी माने



**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

मूळ निपाणी-कर्नाटक व अवंतीनगर येथील लक्ष्मी चंद्रकांत माने (वय ७७) यांचे नुकतेच श्वसनाच्या आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे एक भाऊ, बहीण असा परिवार आहे. येथील महाराष्ट्र कॉम्प्युटर इन्स्टिट्युटच्या संचालिका सुलभा डांगे यांच्या त्या नणंद होत्या.

# बास्केटबॉलमध्ये सिद्धेश्वर वुमन्स, शासकीय तंत्रनिकेतन विजेते

## सी झोन इंटर डिप्लोमा स्पर्धा : व्हॉलिबॉल स्पर्धेत फॅबटेक सांगोला, स्वेरी पंढरपूरला विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

सी झोनच्या इंटर डिप्लोमा बास्केटबॉल स्पर्धेत मुलींच्या गटात सिद्धेश्वर वुमन्स व मुलांच्या गटात शासकीय तंत्रनिकेतनने तर व्हॉलिबॉल स्पर्धेत मुलींच्या गटात फॅबटेक सांगोला व मुलांच्या गटात स्वेरी पंढरपूरने विजेतेपद पटकाविले.



ब्रह्मदेवदादा माने पॉलिटेक्निकमध्ये या स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष दिलीप माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने, सचिवा जयश्रीताई माने, संकुलाचे संचालक प्रा. राहुल माने, प्राचार्य डॉ. जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलांच्या १२ तर मुलींच्या ४ तर बास्टेबॉलमध्ये मुले आणि मुलींचे प्रत्येकी ३ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी, प्रा. फुलारी, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. तुपे, प्रा. गायकवाड, प्रा.गावडे, प्रा.कबाडे, प्रा.यलगोंडे, प्रा.अवताडे, प्रा कामत, प्रा. घोडके, प्रा. सूतकर, प्रा. साळुंखे, प्रा.अरवत आणि प्रा. घुले यांनी परिश्रम घेतले. विजेत्या संघांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

**अंतिम विजेते व उपविजेते**

**व्हॉलिबॉल : मुली :** फॅबटेक कॉलेज सांगोला, सिद्धेश्वर वूमेन्स पॉलिटेक्निक . **मुले :** स्वेरी पॉलिटेक्निक पंढरपूर, श्रीराम पॉलीटेकनिक पाणीव.

**बास्केटबॉल : मुली :** सिद्धेश्वर वूमेन्स, शिवाजी पॉलिटेक्निक सांगोला. **बास्केटबॉल : मुले :** शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर, स्वेरी पॉलिटेक्निक पंढरपूर.

## महत्वाचे...




### महावीर हायस्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
होटगी रोड येथील महावीर हायस्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमांची सुरवात सरस्वती पूजनाने झाली. प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक विजय पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. पाटील होत्या. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्याकडून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापिका पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन बसवराज बिराजदार यांनी केले.




### स्मार्ट किड्स प्री-स्कूल वतीने वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण उत्साहात

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
स्मार्ट किड्स प्री स्कूल वतीने वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ तोगटवीर सांस्कृतिक भवन कन्ना चौक येथे संपन्न झाला. याचे उद्घाटन श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतपेढीचे चेअरमन लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ.सुवर्णमंदार आचार्य, तोगटवीर क्षत्रिय युवक संघाचे माजी अध्यक्ष संजीवकुमार नंदकिशोर उदगिरी आदी उपस्थित होते. स्नेहसंमेलनात प्लेग्रुप, नर्सरी, एलकेजी, युकेजी विद्यार्थीनी गणेश साँग, रिमिक्स गर्ल साँग, छावा बम बम बोले, गलतीसे मिस्टेक, रे टू साँग, स्क्रिप्ट-बिहेवर ऑफ पेरेंट्स विथ हर चाइल्ड, टीचर साँग या गाण्यांवर सुंदर असे नृत्य सादर करण्यात आले. तसेच प्ले ग्रुपचे युकेजी विद्यार्थ्यांचे फ्रुट कॉम्पिटिशन, ड्रॉइंग कॉम्पिटिशन, व्हेजिटेबल कॉम्पिटिशन, फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशन, पोएम्स कॉम्पिटिशन, इ लोकेशन कॉम्पिटिशन, वूमनपेरेंट्स कुकिंग कॉम्पिटिशन, गुड पेरेंट्स अवॉर्ड, न्यूट्रिशन अवॉर्ड, अकॅडमी अवॉर्ड या विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. वैष्णवी उदगिरी यांनी मान्यवरांचे परिचय करून दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुदर्शन उदगिरी, श्रुती भिमनपल्ली, पूजा चौधरी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीवत्स उदगिरी व मनस्वी उदगिरी यांनी केले. श्वेता गडेकर यांनी आभार मानले.



### पुण्यतिथीनिमित्त पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**
पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'समर्पण दिवस' म्हणून आज भारतीय जनता पार्टी कार्यालय येथे अभिवादन करण्यात आले होते.यावेळी नूतन महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीच्या वतीने नूतन महापौर विनायक कोंड्याल यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास भाजपच्या अध्यक्षा रोहिणी तडवळकर, भरतशिंग बडूर वाले, कुमुद अंकाराम, यशवंत पाथरूट, अक्षय अजिखाने उपस्थित होते.



### महापालिका कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनतर्फे महापौर विनायक कोंड्याल यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**
महानगरपालिका कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्यावतीने महापौर विनायक कोंड्याल यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्ष राम दुधाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मक्तेदार गणेश नरोटे, यशवंत पाथरूट, सागर राठोड, दिनेश अलकुंडे , दिनेश पवार, वाघमारे, भीमा राठोड, अक्षय राठोड, अभिजीत पांगळे, कानडे, नरळे, शंकर निंबाळकर, बेंद्रे, उमेश गायकवाड आदी उपस्थित होते.

# ...आमच्याच लोकांनी केला होता प्रयत्न

**पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे स्पष्ट प्रतिपादन**

**जिल्हा परिषदेच्या नूतन सदस्यांचा सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाची सत्ता येऊ नये म्हणून आमच्याच काही लोकांनी प्रयत्न केले. या लोकांमुळे आम्हाला आणखी जोमाने काम करावे लागले. या मंडळींनी असेच अडथळे आणण्याचे काम करावे, आम्ही आमचे काम जोमाने वाढवत राहू, असे स्पष्ट प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.



सोलापूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या भारतीय जनता पार्टीच्या नूतन सदस्यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. व्यासपीठावर आमदार देवेंद्र कोठे, समाधान आवताडे, माजी आमदार राजन पाटील, राजेंद्र राऊत, राम सातपुते, यशवंत माने यांच्यासह प्रा.शिवाजी सावंत, शहाजी पवार, शशिकांत चव्हाण, रोहिणी तडवळकर आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेच्या निवडणूक प्रचारादरम्यान जिल्हा परिषद सदस्यांना २१ कोटी रुपये देणार असल्याची ग्वाही दिली होती. त्या वक्तव्यावर विरोधकांनी माझ्यावर टीका केली. पण मी दिलेला शब्द पाळणारा माणूस आहे. प्रत्येक सदस्यांना २१ कोटी रुपये देणार आहे, असे सांगत पालकमंत्री गोरे यांनी आपल्या भाषणातून विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टील घवघवीत यश मिळाले. तळागाळातील कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनता यांच्यामुळे हे यश मिळाले. नूतन सदस्यांनी जनहिताची कामे करावीत, पक्षाला डाग लागेल असे कोणतेही काम करु नये, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**नव्या-जुन्या सांगड**

नगरपालिका, महापालिका व आता जिल्हा परिषद निवडणुकीत अनेक नेत्यांनी भाजपात प्रवेश केला. दरम्यान, नव्या व जुन्या कार्यकर्त्यांचा मेळ घातल्याने भाजपला तिन्ही निवडणुकीत चांगले यश मिळाले. ग्रामीण भागातील पदाधिकाऱ्यांनी त्या-त्या भागात चांगले काम केल्यानेच सत्ता आली आहे. भविष्यात नव्या आणि जुन्या पदाधिकाऱ्यांची सांगड घालून जिल्हा परिषदेचा विकास गाडा पुढे चालवावा, असेही पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

## बी २ उठविण्यासंदर्भात महापालिका सभेपुढे सभासद प्रस्ताव

**महापालिकेच्या या टर्ममधील पहिलाच सभासद प्रस्ताव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
महापालिकेचे सदस्य विनोद भोसले, सिध्देश्वर कमटम, विजया खरात यांनी सोलापूर शहरातील विविध परिसरातील मिळकतींवर असलेल्या बी २ संदर्भात २० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे सभासद प्रस्ताव ठेवला आहे. बी २ (सत्ता प्रकार) उठवण्याकरिता राज्य शासनास विनंती करण्यासाठी सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव हा पाठविण्यात येत आहे.

महापालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी रोजी होणार आहे. या सभेपुढे विनोद भोसले, सिध्देश्वर कमटम, विजया खरात यांनी बी २ संदर्भातील प्रस्ताव सादर केला आहे. संबंधित मिळकतींवर बी-२ (सत्ता प्रकार) असल्यामुळे खरेदी-विक्री बंद आहे. या ठिकाणी बांधकाम परवाने मिळत नसल्याकारणाने महानगरपालिकेच्या उत्पन्नावर विपरित परिणाम होत आहे. महापालिकेस मिळणारे उत्पन्न ठप्प झाले आहे. बी-२ (सत्ता प्रकार) उठल्यास, नियमितपणे व्यवहार सुरू होतील, संबंधित चाळी असतील त्यांना स्वतःचा मालकी हक्क मिळण्यास मदत होईल तसेच शासनाचा भरीव असा १ टक्के महसूल महानगरपालिकेस प्राप्त होईल व महानगरपालिकेस मिळकत कराच्या माध्यमातून भरीव असे उत्पन्न मिळेल. असे या प्रस्तावात म्हटले आहे.

अनेक चाळी ज्या जीर्ण अवस्थेमध्ये आहेत, त्यांना बी २ (सत्ता प्रकार) रद्द होऊन मालकी हक्क मिळाल्यास या ठिकाणी भविष्यामध्ये पुनर्विकास करण्यास मदत होईल. बी २ (सत्ता प्रकार) उठविण्याकरता राज्य शासनास विनंती करावी, असे यात नमूद

## ७०० जणांच्या नियुक्तीसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार : महापौर कोंड्याल

**महापालिकेत लाड कमिटी अंतर्गत १४ जणांना नियुक्ती आदेश वाटप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
माझ्या कारकिर्दीमध्ये प्रथमच आज लाड-पागे समिती अंतर्गत वारसांना माझ्या हस्ते नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. हे माझे भाग्य आहे. सोलापूर महापालिकेतील या अंतर्गत असलेल्या प्रतीक्षा यादीतील ७०० जणांना नियुक्ती आदेश देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार आहे, अशी ग्वाही महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली.

सोलापूर महापालिकेतील लाड-पागे समिती अंतर्गत निवृत्त, मयत सफाई कर्मचाऱ्यांच्या १४ वारसांना नियुक्ती आदेश प्रदान समारंभ महापौर विनायक कोंड्याल यांच्या यांच्या हस्ते पार पडला. यामध्ये ११ बिगारी, ३ सफाई कामगारांचा समावेश आहे. यावेळी सभागृह नेते नरेंद्र काळे, शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, उपायुक्त आशिष लोकरे, नगरसेवक सिध्देश्वर कमटम, महेश देवकर, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी उपस्थित होते. महापालिका कर्मचारी हे शहर स्वच्छतेसाठी मोठे योगदान देतात. त्यांच्यामुळेच स्वच्छ सोलापूर-सुंदर सोलापूर होते. महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये कार्यक्षम, पारदर्शक प्रशासन देण्यासाठी पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्यात येत आहे. लाड कमिटी माध्यमातून पारदर्शक प्रक्रियेने ही निवड करण्यात आली, असेही त्यांनी सांगितले.



**आतापर्यंत ४०० जणांना दिले नियुक्तीपत्र**

सोलापूर महापालिकेत लाड-पागे समिती अंतर्गत आतापर्यंत ४०० जणांना नियुक्तीपत्रे दिली आहेत. ही योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रयत्न आहेत. या योजनेअंतर्गत ७०० जणांची प्रतीक्षा यादी तयार आहे. त्यास मंजुरी कार्यवाही प्रस्ताव ठेवण्यात येत आहे, अशी माहिती उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

## सोलापूरच्या अर्थकारणाला पाठिंबा देणारे प्रदर्शन : डॉ. ओंबासे

**इलेक्ट्रो २०२६ प्रदर्शनाचे थाटात उदघाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
इलेक्ट्रो प्रदर्शन हे सोलापूरच्या अर्थकारणाला पाठिंबा देणारे असल्याचे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर सचिन ओंबासे यांनी स्पष्ट केले.सोलापूरचे जास्तीत जास्त नागरिकांनी इलेक्ट्रो २०२६ प्रदर्शनाचा फायदा घ्यावा, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉक्टर सचिन ओंबासे यांनी केले.

व्ही प्लस कंपनीचे सीईओ संदीप पाटील व महापालिका आयुक्त डॉ. ओंबासे यांच्या हस्ते द्विप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी व्ही प्लस कंपनीचे सुशील कुमार देशमुख व प्रफुल्ल देशमुख असेच महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांचा सत्कार करण्यात आला.या प्रदर्शनात प्रतिवर्षी ५० कोटींची उलाढाल होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रदर्शनाचे मुख्य प्रायोजक व्ही प्लस कंपनीचे सीईओ संदीप पाटील यांनी कंपनीचे लॉन्च सोलापुरात होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. पी प्लस च्या माध्यमातून भारतीय बनावटीचे उत्पादन करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.नवीन तंत्रज्ञानाचे प्रॉडक्ट देत असल्याचे सांगून त्यांनी प्रत्येक गोष्टीत नावीन्य आणण्याचा प्रयत्न केला असल्याचे स्पष्ट केले. सोलापूर इलेक्ट्रॉनिक्स डिलर्स असोसिएशन द्वारा इलेक्ट्रोनिक्स, कॉम्प्युटर्स, टेलिकम्युनिकेशन, होम ॲप्लायन्सेस, सोलार व फिटनेस इक्विपमेंटस वस्तूंचे भव्य प्रदर्शन ''इलेक्ट्रो २०२६'' प्रदर्शनाचे उद्घाटन व्ही प्लस कंपनीचे सीईओ श्री. संदीप पाटील यांच्या हस्ते व महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. दि. १८ फेब्रुवारीपर्यंत होम मैदानावर हे प्रदर्शन आयोजित केले आहे. यंदा इलेक्ट्रो प्रदर्शनाचे व्ही प्लस हे मुख्य प्रायोजक असून वीझी टीव्ही, हाईफा इलेक्टिकल, अपार इलेक्ट्रिकल्स, लक्ष्मी ऑटोमोबाइल्स , एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी, बजाज फायनान्स व सॅटीसफाय मिडीया हे सह प्रायोजक आहेत. अध्यक्ष सुरजरतन धुत प्रास्ताविकात म्हणाले की, इलेक्ट्रो २०२६चे हे २६वे वर्ष असून २५ वर्षापूर्वी २७ स्टॉल्सने सुरु झालेले हे प्रदर्शन आज जवळपास ३०० स्टॉलचे झाले आहे. आतापर्यंत इलेक्ट्रोने केलेल्या कामाची व ग्राहकांची दिलेल्या प्रतिसादाची ही पावतीच आहे. या वर्षी जवळपास एक लाख पेक्षा जास्त ग्राहक प्रदर्शनास भेट देतील असा अंदाज आहे. इलेक्ट्रो चेअरमन जितेंद्र राठी यांचा संदेश शिवप्रकाश चव्हाण यांनी वाचून दाखविला. काही स्टॉल्स् सामाजिक संघटनांना विनामुल्य देण्यात आले आहेत.



**दररोज लकी ड्राँ, शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉ**

या प्रदर्शनात खरेदी केलेल्या ग्राहकांसाठी दररोज लकी ड्रॉद्वारे आकर्षक बक्षिसे व शेवटच्या दिवशी ७ दिवसांत खरेदी केलेल्या ग्राहकांसाठी बंपर ड्रॉमध्ये आकर्षक बक्षिस असल्याची घोषणा करण्यात आली. ७ दिवस चालनाऱ्या इलेक्ट्रो २०२६ दररोज दु. ४ ते रा. ९.३० व रविवारी स.११ ते रा. ९.३० पर्यंत, या प्रदर्शनामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग असून एलसीडी,फ्रिज , साईड बाय साईड फ्रिज, एअर कंडीशनर, म्युझिक सिस्टीम, वॉशिंग मशीन, डिश टिव्ही, मायक्रोव्हेव ओव्हन, व्हॅक्यूम क्लिनर, एअर कंडीशनर, सोलर सिस्टीम, गॅस गिझर, मोबाईल, आय पॅड,टेलीफोन , हेल्थ इक्वीपमेंट, कॉम्प्युटर इत्यादी या प्रदर्शनामध्ये उपलब्ध करण्यात आली आहेत. अशा या प्रदर्शनामध्ये ठिकठिकाणी शुध्द पिण्याचे पाणीची सोय केलेली आहे. सर्व स्टॉल मध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कंपनीकडून ट्रेनिंग देवून ग्राहकांना माहिति देण्यात येते. रक्तदान प्रसार करण्याकरीता दररोज रक्तदान शिबीराचेही आयोजन करण्यात आले असून अवयव दान विषयी जनजागृती करण्यात येत असल्याची माहिती सचिव हरीष कुकरेजा यांनी दिली. तसेच प्रदर्शनास भेट देऊन रिल्स बनवून पाठविण्यांसाठीही स्पर्धा आयोजित केली असल्याची सांगण्यात आले.

## श्री बृहन्मठ होटगी संस्थेतर्फे रविवारपासून विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**
महाशिवरात्री,जगद्गुरु पंडिताराध्य व विश्वाराध्य यांच्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने रविवारपासून (दि. १५) विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

अक्कलकोट रोडवरील श्री वीरतपस्वी मंदिरात रविवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी पहाटे ५.०० वा. श्री पंचमुखी परमेश्वर लिंगास रुद्राभिषेक, सहस्त्रबिलवारचन, महामंगलारती, दुपारी १२.०० वा. पंडिताराध्य लिंगोदभव मूर्तीचे श्री वीरतपस्वी मंदिरात आगमन, रथपूजा व शालेय विद्यार्थ्यांचे कला- क्रीडा उत्सव, महामंगलारती व



महाप्रसाद वाटप, सायंकाळी ७.०० वा. दीपोत्सव, ८.०० वा. श्री वीरतपस्वी पालखी सोहळा, रात्री ९.०० वा. शोभेचे दारूकाम, महाप्रसाद वाटप, रात्री १०.०० वा. श्री वीरतपस्वी मंदिरात भजन व जागरण आयोजित करण्यात आलेला आलेला असून दिवसभर सर्व भक्तासाठी साबुदाणा व फराळाची सोय करण्यात आलेली आहे.

उत्तर कसबा (बाळीवेस)येथील मठात सकाळी ६.०० वा. श्री गुरु गादीस रुद्राभिषेक, बिलवारचन, महामंगलारती व महाप्रसाद, सकाळी ७.०० वा. श्री थोबडे यांच्या वाड्यातून श्री पंडिताराध्य लिंगोदभव मूर्तीचे होटगी मठात आगमन, ८.०० वा. श्री १००८ जगदाचार्य मूर्तीस महारुद्राभिषेकानंतर श्री १००८ जगद्गुरु पंडिताराध्य व विश्वाराध्य मूर्तीचे सवाद्य मिरवणूक उत्तर कसब्यातील होटगी मठातून संस्थेच्या विविध प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, अध्यापक विद्यालय व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे लेझीम, झांज पथक व नृत्य यांच्यासह मोठ्या वैभवात निघणार आहे. ही मिरवणूक मल्लिकार्जुन मंदिर ,बाळीवेस,चाटी गल्ली, मंगळवार पेठ पोलीस चौकी, मधला मारुती, कोतम चौक,कन्ना चौक, जोडबसवणा चौक, पाण्याची टाकी, जुना अक्कलकोट नाका या पारंपारिक मार्गाने निघून अक्कलकोट रोडवरील श्री वीरतपस्वी मंदिरात मिरवणुकीचे महामंगलारतीने सांगता होणार आहे. त्यानंतर भक्तासाठी महाप्रसादाची सोय करण्यात आलेली आहे. मिरवणूक मार्गावर अनेक संस्थांकडून सहभागी विद्यार्थ्यांसाठी व भक्तासाठी प्रसादाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**विशेष महाभिषेक व संगीत संध्या**

महाशिवरात्री निमित्त श्री वीरतपस्वी मंदिर, अक्कलकोट रोड येथे १५ फेब्रुवारी रोजी रात्री १२.१८ ते १.१८ पर्यंत चिटगुपाचे गुरुलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या उपस्थितीत विशेष महाभिषेक व रात्री ७.०० ते १०.०० पर्यंत अतुल बेले व त्यांच्या सहकाऱ्यांचा संगीत- संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. या दोन्ही कार्यक्रमाचा भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आलेला आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा









# गुरुवार ठरला आंदोलनाचा दिवस

## राज्य सरकारी कर्मचारी संघटना, अंगणवाडी सेविका, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, जनविकास क्रांती सेनेने उगारले आंदोलानास्त्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

**केंद्र सरकारने पारित केलेल्या कामगारविरोधी कायदा यांसह आपापल्या विविध मागण्यांसंदर्भात राज्य सरकारी कर्मचारी संघटना, अंगणवाडी सेविका, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीप्रणित सीटू आणि कामगार सेनेच्या वतीने जुना जिल्हाधिकारी कार्यालय येथील पुनम गेट येथे स्वतंत्रपणे आंदोलने करण्यात आले. त्या-त्या संघटनांच्या आंदोलकांनी विविध घोषणा देत परिसर दणाणून सोडले होते. त्यामुळे सोलापुरात गुरुवारचा दिवस हा आंदोलनाचा ठरल्याचे दिसून आले.**

## कायदेशीर संरक्षण काढून घेण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

मोदी सरकारने जनसुरक्षा कायदाद्वारे देशभरातील कामगारांचे कायदेशीर संरक्षण काढून घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असे जनविकास क्रांतीसेना पक्षाकडून सांगण्यात आले. केंद्र सरकारच्या या धोरणाविरुध्द कामगार नेते विष्णू कारमपुरी यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाद्वारे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

एकीकडे कामगारासाठी नवीन कायदे करुन त्यांना न्याय देत असल्याचे दिखाऊपणाचे कायदे करुन त्याच कायदयाद्वारे कामगारांचे सर्व हक्क काढून घेण्यात आले आहे. सोलापुरात यंत्रमाग व असंघटीत कामगार मोठ्या प्रमाणात असून त्या कामगांराना केंद्र व राज्य शासनाकडून न्याय मिळणे गरजेचे होते परंतु वरील सर्व कामगारांना किमान वेतनाची अंमलबजावणी देखील मालक वर्गाकडून करण्यात येत नाही, असे या निवेदनात म्हटले आहे.

या शिष्टमंडळात रेखा आडकी, सविता दासरी, पद्मा मॅकल, लक्ष्मी रच्चा , लक्ष्मी गुंठला, पप्पु शेख, श्रीनिवास बोगा, गुरुनाथ कोळी आदींचा समावेश होता.

## चार श्रम संहिता रद्द करा अन्यथा तीव्र आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

केंद्र सरकारने पारित केलेला चार श्रम संहिता रद्द करण्यात यावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीप्रणित सीटू या कामगार संघटनेने दिला आहे. दरम्यान, माजी आमदार नरसय्या आडम व 'सीटू'चे राज्य महासचिव एम.एच. शेख यांच्या नेतृत्वाखाली दत्त नगर येथील माकपा कार्यालयपासून मोर्चा काढण्यात आला.

विडी, यंत्रमाग व असंघटित कामगारांनी लाल झेंडे व मागण्यांचे फलक हातात घेत जोरदार घोषणाबाजी करत या मोर्चात सामील झाले होते. दत्त चौक, पद्मशाली चौक, जिंदाशाह मदार चौक, किडवाई चौक या मार्गावरुन सदर मोर्चा काढण्यात आला. पुनम गेट येथे या मोर्चाचे रुपांतर सभेत करण्यात आले.

माजी आमदार नरसय्या आडम याप्रसंगी बोलताना म्हणाले, ४४ कामगार कायद्यांपैकी २९ कायदे एकत्र करुन कामगारांचे हक्क कमकुवत करण्याचा प्रयत्न होत आहे. खासगीकरण, व कंत्राटीकरणामुळे कायमस्वरुपी रोजगार धोक्यात आला आहे. सीटूचे राज्य महासचिव एम.एच.शेख यांनी सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात आगपाखड केली.

या सभेनंतर विल्यम ससाणे, दीपक निकंबे, दत्ता चव्हाण, दाऊद शेख, मल्लेशम कारमपुरी, अकील शेख, ॲड.शाम आडम आदींच्या शिष्टमंडळाद्वारे निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

### या आहेत मागण्या

चार श्रम संहिता रद्द करण्यात यावे, महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक मागे घेण्यात यावे, सार्वजनिक क्षेत्रातील खासगीकरण थांबविण्यात यावे, सर्व कामगारांना किमान २६ हजार रुपये वेतन व १० हजार रुपये पेन्शन देण्यात यावे, ८ तासांच्या कामाचा कायदा काटेकोरपणे लागू करण्यात यावे, कंत्राटीकरण बंद करण्यात यावे, जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावे, असंघटित व गिरणी कामगारांना कायदेशीर हक्क देण्यात यावे, मनरेगा २०० दिवसांचे करण्यात यावे, हमीभावाचा कायदा करण्यात यावे.

## ▶▶ महत्वाचे...

### सुभाष भोसले यांना पीएच.डी प्रदान

**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिध्देश्वर वस्ती, कासेगाव या शाळेतील शिक्षक सुभाष मोरेश्वर भोसले यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी प्रदान करण्यात आली.



'ग्रामीण भागातील निम्न प्राथमिक स्तरावरील गणित अध्यापनात कृतियुक्त अध्ययन कार्यनितीच्या परिणाम कारकतेचा अभ्यास' या समस्येवर त्यांनी डॉ. आनंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले. डॉ.राजशेखर हिरेमठ यांचे अध्यक्षतेखाली व डॉ.रावसाहेब शेळके यांच्या प्रमुख उपस्थितीत यासंदर्भात परीक्षा घेंण्यात आली. याप्रसंगी कुलसचिव डॉ.उमराव मेटकरी, डॉ.खराड, प्राचार्य डॉ.अश्विन बोंदार्डे, प्रा.डॉ. बाळकृष्ण भावे, डॉ.अशोकानंद राक्षे, डॉ.दत्तात्रय मस्के, शशिकांत पोतदार आदी उपस्थित होते.



### मागील भांडणाचा राग मनात धरुन काठीने मारहाण

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

मागील भांडणाचा राग मनात धरून दोघांनी मिळून काठीने मारहाण केल्याने एकास डोक्यास जखम व सर्वांगास मुकामार लागला आहे.याबाबत थोडक्यात माहिती अशी की, लक्ष्मण शरणप्पा सोनकांबळे वय ४२ राहणार भोसगे ता.अक्कलकोट जि.सोलापूर यांना भोसगे गावातील धर्मशाळेसमोर मागील भांडणाचा राग मनात धरुन मल्लप्पा नडगिरी, सुनंदा नडगिरी यांनी मिळून काठीने मारहाण केल्याने त्यांना डोक्यास जखम व सर्वांगास मुकामार लागला. उपचारासाठी सरकारी दवाखाना अक्कलकोट येथे दाखल केले होते. पुढील उपचारासाठी ते स्वतः शासकीय रुग्णालय येथे दाखल झाले असल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### ट्रॅव्हल्स बसमधून प्रवास करत असताना जखमी

**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

ट्रॅव्हल्स बसमधून प्रवास करत असताना आयशर वाहनास पाठीमागून ड्रायव्हरने धडक दिल्याने त्यांना डोक्यास जखम व सर्वांगास मुकामार लागला. पवन मधुकर पाटील वय २९ रा.कारेगाव ता.औसा, जि.लातूर येथून पुणेकडे ट्रॅव्हल्स बसमधून प्रवास करत असताना इंदापूर येथील नदीजवळ पुढे जाणाऱ्या आयशर वाहनास पाठीमागून ड्रायव्हरने धडक दिल्याने त्यांना डोक्यास जखम व सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना इंदापूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. पुढील उपचारासाठी बहीण सुप्रिया यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल केले, अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## कुडल संगम येथे रविवारी संगम आरती



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

संगमेश्वर देवस्थान परिसर सुधारणा समिती व संगमेश्वर भक्त मंडळ यांच्यावतीने हत्तरसंग कुडल संगम, दक्षिण सोलापूर येथे महाशिवरात्रीनिमित्त रविवारी दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सव्वा वाजता संगम आरती आयोजित करण्यात आली आहे. काशीच्या धर्तीवर ही संगम आरती होत असून, भीमा व सीना या दोन्ही नद्यांच्या संगमावरील संगम घाटावर ही आरती होणार आहे. यंदा संगम आरतीचे सातवे वर्ष आहे.

नद्यांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या आरतीचे आयोजन करण्यात येते. तसेच दीपोत्सव होणार आहे. विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी पहाटे ६ वाजता संगमनाथ लिंगास महाभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ८ वाजल्यापासून जगातील एकमेव बहुमुखी शिवलिंगास निरंतर अभिषेक करण्यात येणार आहे. येथे एकदा अभिषेक केल्यास भक्तास वर्षभर अभिषेक केल्याचे पुण्य मिळते. दिवसभर भक्तांना निरंतर फराळाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच भजन होणार आहे. श्री संगमेश्वर भजन मंडळ व पंचक्रोशीतील गायक आपली सेवा संगम नाथाच्या चरणी अर्पण करतात. शिवरात्रीच्या रात्री जागरणाचे खूप महत्व आहे. संगमनाथ व परिसरातील सर्व देवतांची ५ वेळा पूजा व आरती होणार आहे. भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन संगमेश्वर देवस्थान परिसर सुधारणा समिती व संगमेश्वर भक्त मंडळ यांनी केला आहे.

## 'ॲपरिलाय टेक्नॉलॉजीज'च्या सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटरची सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

शहराच्या आयटी क्षेत्रातील वाटचालीत एक सकारात्मक पाऊल पडले आहे. ॲपरिलाय टेक्नॉलॉजीज या कंपनीच्या नवीन सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटरचा उद्घाटन सोहळा होटगी रोडवरील इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये उत्साहात पार पडला. ॲपरिलाय टेक्नॉलॉजीज कंपनीच्या नवीन सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटरमुळे सोलापूरची आयटी पार्कच्या दिशेने होत असलेली वाटचाल अधिक भक्कम झाली आहे. सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू गोपाळकृष्ण जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत या सेंटरचे उदघाटन करण्यात आले.



या नवीन कंपनीमुळे सोलापुरातील तंत्रशिक्षण घेतलेल्या तरुणांना आता शहरातच कामाच्या उत्तम संधी मिळणार आहेत, जी शहराच्या भविष्यातील विकासासाठी एक सकारात्मक बाब मानली जात आहे. या सोहळ्याप्रसंगी सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे, लक्ष्मी हायड्रोलिक कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक शरद ठाकरे, सिंहगड कॉलेजचे प्राचार्य शंकर नवले, ज्ञानप्रबोधिनीचे संचालक अमोल गांगजी, पेठे फुड्सच्या संचालिका सुवर्ण पेठे, मीना मोकाटे, आशा कंदलगावकर, सच्चिदानंद व्हटकर, अविनाश गवळी, दर्शन रुईकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोलापूरमध्ये आयटी पार्क सुरू होणार आहे, या पार्श्वभूमीवर ॲपरिलाय टेक्नॉलॉजीजची सुरुवात सकारात्मक आहे. शहरांमध्ये आयटी क्षेत्राचा प्रगतीसाठी भरपूर वाव आहे. प्रसाद आणि साकेत या दोघांची टीम वेगवेगळ्या देशांमध्ये सेवा देत आहे. या सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटरमुळे सोलापूरच्या स्थानिक तरुण तंत्रज्ञांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहे, असे महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

## महापालिकेच्या २० फेब्रुवारीच्या सभेत स्वीकृत, स्थायी व परिवहन सदस्यांची होणार नियुक्ती

### १० स्वीकृत सदस्य, स्थायी समितीचे १६ तर परिवहन समितीच्या १२ सदस्य पदांवर होणार शिक्कामोर्तब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेची नवीन टर्ममधील पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बोलवण्यात आली आहे. या सभेमध्ये १० स्वीकृत सदस्य, स्थायी समितीचे १६ तर परिवहन समितीच्या १२ सदस्यांची नियुक्ती होणार आहे. नूतन महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार आहे. ही सभा शुक्रवार, २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता महानगरपालिकेच्या कै. यशवंतराव बळवंतराव सभागृह (कौन्सिल हॉल) येथे होणार आहे. महापालिकेचे नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी या सभेचा अजेंडा प्रसिद्ध केला आहे.या अजेंड्यानुसार विविध नेमणुका होणार आहेत.



महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २० (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे आयुक्त यांच्या दि.९ फेब्रुवारीच्या टिपणीत नमूद केल्याप्रमाणे स्थायी समितीच्या १६ सदस्याच्या नेमणुका करण्यात येणार आहेत. सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन समितीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २५ (२) अन्वये आयुक्त यांच्या दि.९ फेब्रुवारीच्या टिपणीत नमूद केल्याप्रमाणे १२ सदस्यांची नेमणुका करण्याचा विषय सभेच्या अजेंड्यावर आहे. महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ नुसार सोलापूर महानगरपालिकेत १० नामनिर्देशित सदस्यांची आयुक्तांच्या दि.९ फेब्रुवारीच्या टिपणीत नमूदप्रमाणे नियुक्ती करण्याचा विषय सभेपुढे ठेवण्यात आला आहे. प्रशासकीय प्रस्तावांबरोबर सभासद प्रस्तावदेखील सभा पटलावर आहेत.


महापालिकेच्या नामनिर्देशित अर्थात १० स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीकरिता संबंधितांना बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत महापालिकेतील आयुक्त कार्यालयात अर्ज सादर करावे लागणार आहे, असे महापालिका सभेच्या अजेंड्यात नमूद करण्यात आले आहे.

स्थायी समिती व परिवहन समिती सदस्यांची नियुक्ती ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१-अ मधील तरतुदीनुसार मान्यताप्राप्त, नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाने तौलनिक संख्याबळानुसार करण्यात येणार आहे. नामनिर्देशित सदस्य व परिवहन समिती सदस्यपदासाठी महानगरपालिका पालिका सदस्यांप्रमाणे शपथपत्र, तद्अनुषंगिक कागदपत्रे महानगरपालिकेतील विविध खात्याचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

## 'मेदारवाणी' पुस्तकाचे १८ फेब्रुवारीला प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

बुरुड समाजातील दानशूर कार्यकर्ते व उद्योजक प्रकाश पळसे यांनी संतश्रेष्ठ बुरुड केतेश्वर महाराज यांच्या जीवनावर लिहिलेल्या 'मेदारवाणी' या पुस्तकाचे प्रकाशन बुधवार, १८ फेब्रुवारी रोजी सांगली येथील डेक्कन मॅन्यूफॅकचॅरिंग हॉलमध्ये होणार आहे. शिवसेनेचे माजी खासदार तथा माजी मंत्री चंद्रकांत खैरे यांच्या अध्यक्षतेखाली, मेदार बुरुड समाजाचे जगद्गुरु महामंडलेश्वर सुरेश नागेश्वर महाराज (खामगाव, बुलढाणा) यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे, असे संयोजक दशरथ वडतिले व सिध्दांत पळसे यांनी कळविले आहे.



## प्रसिध्दीच्या झोतात राहण्याची 'त्यांना' सवय आहे : खा. मोहिते-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.१२ फेब्रुवारी-**

पराभव झाल्यानंतर माजी आमदार राम सातपुते हे कुठल्याही स्तरावर जातात. मीडियासमोर वेगवेगळे स्टेटमेंट देऊन प्रसिध्दीच्या झोतात राहण्याची त्यांना सवय आहे. आमच्या माने नामक उमेदवारावर गुलालाची गन मारण्यात आले. माढा लोकसभा व विधानसभा क्षेत्रात त्यांना सपाटून अपयश आल्याने ते वैफल्यग्रस्त झाले आहेत, असा टोला खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी लगावला.

आम्हाला जिल्हा परिषदेच्या ९ पैकी ७ जागा मिळाल्या. त्यांनी एक जागा मॅनेज करुन मिळवली. त्यापासून लक्ष विचलित करण्यासाठी ते लोकांना चुकीच्या दिशेने घेऊन जात असतात, असेही खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले. सत्ताधारी आणि विरोधी पक्षाकडून सुरु असलेल्या आरोप-प्रत्यारोपांमुळे माळशिरस तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. माजी आमदार राम सातपुते यांनी आपल्या हत्तेचा कट उघड झाला असून त्याची पोलिस पातळीवर चौकशी सुरू असल्याचे सांगितले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही याबाबत सूतोवाच केले आहे. आमदार उत्तमराव जानकर यांनी त्या मुर्दाड माणसाला कोण मारतयं? म्हणत खिल्ली उडवली आहे. खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनीही माजी आमदार राम सातपुते पराभवानंतर कुठल्याही स्तरावर जात असल्याचे म्हटले आहे.

माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते या विजयी झाल्यावर भाजप कार्यकर्त्यांचा जल्लोष सुरू असतानाच माजी आमदार राम सातपुते हे ही त्याठिकाणी आले. लोकांनी त्यांना उचलून घेतले. त्यावेळी राम सातपुते यांच्या हातातील गुलालाच्या गनमधील गुलाल विरोधी उमेदवाराचे पती बाबासाहेब माने यांच्या अंगावर पडल्याने तणाव निर्माण झाला होता.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३५५

**पंढरीचा वारकरी।
वारी चुको नेदी हरी ।।**

आळंदी ते पंढरपूर असं आम्ही ज्ञानेश्वर महाराजांच्या दींडीत होतो. ज्ञानेश्वर माऊली दुपारच्या विसाव्याला थांबली होती.आम्ही माऊलींच्या थोडे पुढे जाऊन रस्त्याच्या बाजूला एका झाडाखाली बसलो होतो. आम्ही सहजपणे रस्त्याने पुढे जात असलेल्या वारकऱ्यांकडे कोणी ओळखीचा दिसतो का म्हणून पहात होतो. अन ओळखीचा कोणी दिसला की, अहो, माऊली, जय हरी ! या इकडं, म्हणून बोलावत होतो. खरे म्हणजे ही आमचीच नव्हे, तर दिंडीत अनेकांची नेहमीचीच सवय होऊन बसते. या सवयीमुळे बोलावणाऱ्यालाही आणि ज्याला हाक देऊन बोलावले ज्याते त्यालाही आनंद होतो. असो, असा एका वारकऱ्याचा योग आला. परभणी जिल्ह्यातील एक ओळखीचा वारकरी दिसला. म्हणून आम्ही त्यांना,अहो माऊली या इकडं अशी हाक दिली. ती माऊली त्यांच्या सोबतच्या अन्य काही माऊलींसह आमच्याकडे आली. एकमेकांचा परिचय झाला. आम्ही आमच्या बाटल्यातील पाणी त्यांना दिलं. मी सहज म्हणालो,माऊली मागच्या वारीत आपली भेट झालीच नाही. त्यावर ते म्हणाले, अहो माऊली, मागच्यावेळी नेमका दिंडीच्यावेळी माझ्या पायाला मार लागला होता. त्यामुळं मी दिंडीला येऊ शकलो नाही. म्हणून यावर्षी माऊलीचं दर्शन झालं, तिथं तिथं मी माऊलींना माझी वारी कधीच चुकू देऊ नको, अशीच मागणी घालतोय. मला दुसरी काई अपेक्षा न्हाई. दिंडीत यावं, तुमच्या सारख्याच्या सहवासाचा आनंद घ्यावा अन् पुढच्या दिंडीपर्यंत आनंदात राहावं, याच्याशिवाय दुसरं काही नको असं ती माऊली थोडसं भारावून बोलत होती. मागच्या वर्षी वारीला येऊ न शकल्यानं त्यांना किती दु:ख झालं होतं, तेही त्यांनी डोळ्यात अश्रू आणून सांगीतलं. गर्दीमुळे दररोज माऊलींच्या पादुकांच दर्शन होईलच असं नसल्यानं ती माऊली दर्शन होईल तेव्हा माऊलींना असं म्हणाली होती.



या माऊलींच्या जीवनात अनेक समस्या, अडचणी असतांनाही व घरची साधारण परिस्थिती असतांनाही ही माऊली, श्री ज्ञानेश्वर माऊलींचे दर्शन घेतांना माऊलींकडे त्यांच्या अडचणी दूर होण्याचा आशीर्वाद न मागता किंवा सांसारिक काही न मागता, जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या, हेचि व्हावी माझी आस। जन्मोजन्मी तुझा दास।। पंढरीचा वारकरी।वारी चुको नेदी हरी ।। संतसंग सर्वकाळ । अखंड प्रेमाचा कल्लोळ ।। चंद्रभागे स्नान । तुका मागे हेंचि दान।। या अभंगाप्रमाणे भविष्यात वारी न चुकण्याची व संतसंगाची मागणी करीत होते. खरे म्हणजे सांसारिक जीवानं ज्ञानदेवांकडे अशी मागणी करणं हे तेवढं सोपं नव्हे. संसाराच्या मोहातून, अहंकारातून बाहेर पडलेल्यांचे हे लक्षण आहे. ज्याला ही वृत्ती साध्य करता आली त्याचे दैनंदिन जीवनातील प्रत्येक पाऊल पंढरीच्या वारीतील पाऊल असेल. मी उठलो, त्या माऊलींनाही उठवलं, अन् त्यांना कडाडून मिठी मारली. साक्षात् माऊलींनाच आपण गळा भेट देत आहोत, असा मी त्या भेटीचा आनंद घेतला. या भेटीला माझ्या आणि त्या माऊलींच्या डोळ्यातील अश्रू साक्षी ठरले. मला हृदय भेटीतून त्यांच्या हृदयातून बरेच कांही माझ्या हृदयात आल्याचे जाणवले.

जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. १३ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ दशमी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- मूळ (१६.११)**
**योग - वज्र (२७.२२)**
**करण - कौलव (२७.१७)**
**राहू काल :**
**शुक्रवार : दु. १०.३० ते १२.००**
**दिनविशेष :**
✻ विजया एकादशी

✻ १६३०: आदिलशाही आणि निजामशाही संपवण्याच्या उद्देशाने मुघल बादशहा शहाजहान मध्य प्रदेशातील बुर्हाणपूर येथे पोहोचला. ✻ १६६८: स्पेनने पोर्तुगालच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली. ✻ १७३९: कर्नालची लढाई - पर्शियाच्या नादिरशहाने मुघलांच्या मुहम्मदशहावर तीन तासांत विजय मिळवला. या विजयामुळे नादिरशहाचा दिल्लीत येण्याचा मार्ग सुकर झाला. ✻ १९६०: फ्रांसने पहिली परमाणुबॉम्बची चाचणी केली.

# शिवजयंतीनिमित्त मध्यवर्ती महामंडळातर्फे आजपासून विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १३ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर शहरातील डाळींबी आड मैदान, शिंदे चौक येथे शिवाजी महाराज जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. शुक्रवार, १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता श्रींची स्थापना महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. रविवार १५ फेब्रुवारी रोजी कबड्डी खो-खो स्पर्धा, १७ फेब्रुवारी रोजी कुस्ती स्पर्धा घेण्यात येणार आहे.

शिवजन्मोत्सवाचा पाळणा कार्यक्रम १८ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक येथे आयोजित केला आहे. या पाळण्याच्या कार्यक्रमासाठी सोलापूर शहर व जिल्ह्यातील शहिद माता, शहिद पत्नी, शहिदांच्या कन्या, विशेष गुणवत्ताधारक महिला यांना खास आमंत्रित करण्यात आले असून त्यांच्या हस्ते पाळण्याचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी सोलापूर व आजूबाजूच्या परिसरातील हजारो महिलांना एकत्रित आणून सामुहिकरित्या पाळणा गायनाचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी उपस्थित राहणाऱ्या महिलांना कोणत्याही प्रकारचा त्रास होवू नये म्हणून मध्यवर्ती महामंडळाचे पदाधिकारी, स्वयंसेवक, स्वयंसेविका रात्रंदिवस परिश्रम घेत असून या कार्यक्रमासाठी सर्व शासकीय यंत्रणेशी संपर्क व समन्वय साधून योग्य नियोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी सोलापूर शहर व जिल्हा परिसरातून हजारो नागरीक वाहनाद्वारे येणार असल्याने येथे येणाऱ्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. पारस इस्टेट, सुराणा मार्केट, अजंठा लॉज या ठिकाणी पार्क चौक, भैय्या चौक परिसरातून येणाऱ्यांनी पार्किंग करावे.

हॉटेल अँबेसडर ते प्रभाकर महाराज मंदिर रस्ता एक बाजूस, छत्रपति संभाजी महाराज चौक, पुणे महामार्गावरून येणारी सर्व वाहने तसेच भवानी पेठ भागातून येणाऱ्या वाहनांनी पार्किंग करावे.

बाजी आण्णा मठ ते पत्रा तालीम रस्ता येथे कोंतम चौक, बाळीवेस मार्गे येणाऱ्या वाहनांनी या रस्त्यावर एका बाजूस पार्किंग करावे, असे आवाहन महामंडळातर्फे करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेला ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, सुनील रसाळे, श्रीकांत डांगे, शिवाजी वाघमोडे, राजन जाधव आदी उपस्थित होते.

### १९ फेब्रुवारी रोजी मिरवणूक

दि. १९ फेब्रुवारी दुपारी ४ वाजता विविध मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ठीत मूर्तीची पूजा करून डाळींबी आड येथून मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे.डाळींबी आड येथून पारंपारिक मार्गाने म्हणजेच सरस्वती बुक डेपो, नवी पेठ, मेकॅनिक चौक, भागवत थिएटर, छ. शिवाजी महाराज चौक, म. गांधी रोड, बाळीवेस, मधला मारूती, माणिक चौक, दत्त चौक, राजवाडे चौक, चौपाड़ विठ्ठल मंदिर मार्गे निघून डाळींबी आड मैदान येथे विसर्जित होईल. मिरवणुकीमध्ये सोलापूर शहरातील वारकरी संघटनेचे भजनी मंडळ, लेझीम, झांज, ढोल पथक, छत्रपतींच्या जीवनातील देखावे, लेझर शो इत्यादी विविध प्रकार सादर करण्यात येणार आहेत.

### पुतळा परिसराचे सध्याचे सुशोभीकरण महामंडळाला मान्य नाही

महापालिकेकडून सध्या शिवरायांचा पुतळा परिसराचे सुशोभीकरण सुरू आहे, हे काम महामंडळाला मान्य नाही. शिवजयंतीनंतर महामंडळ यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करणार आहे. या ठिकाणी ऐतिहासिक पद्धतीचे स्मारक व्हावे, अशी महामंडळाची अपेक्षा आहे, असे महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, श्रीकांत डांगे यांनी सांगितले.



## बटरफ्लाय स्कूल येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

बटरफ्लाय इंग्लिश मीडियम स्कूल येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डी.एन. के. फुड्स प्रा. लि.चे संस्थापिका व व्यवस्थापन संचालिका डॉ. रश्मी कुलकर्णी तसेच कॉलेज ऑफ आर्किटेक्चर सोलापूरचे विभाग प्रमुख वैष्णवी यादव अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या. यावेळी संस्थेचे खजिनदार शंकर पाटील, प्रशालेच्या माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका डॉ. रश्मी कुंभार, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रश्मी पुरवत यांची उपस्थिती होती.

प्रारंभी सहशिक्षिका सिमरन मुल्ला यांनी प्रास्ताविक केले. तर पाहुण्यांचा परिचय सहशिक्षिका कोमल सोनकांबळे यांनी करून दिला. अध्यक्षीय भाषण वैष्णवी यादव यांनी केले. प्रशालेतील दहावीचे विद्यार्थी युसूफ सौदागर, वैष्णवी पोलू, शितल कुंभार यांनी शिक्षकांप्रती भावना व शाळेतील अनुभव आपल्या मनोगतातून व्यक्त केले. तसेच सहशिक्षिका अपर्णा कदम व स्वप्ना शिंदे यांनी आपले विचार मांडले. सूत्रसंचालन व आभार सहशिक्षिका सिमरन मुल्ला यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन करण्यात आली.




## सोशल उर्दू हायस्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप सभारंभ

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

सोलापूर सोशल उर्दू हायस्कूल विडी घरकुल प्रशालेत दहावीचा विद्यार्थ्यांना निरोप सभारंभ व वार्षिक बक्षिस वितरण पार पडला. अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य आसिफ वडवान होते प्रमुख पाहुणे समाज सेवक साहिल रामपुरे व सदर नुरेदरिया मस्जिदचे सलाम मौलाना, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सालेहा खान उपस्थित होते.

मुख्याध्यापक खलील अहमद धोटेघर यांनी शाळची सविस्तर माहिती दिली व विद्यार्थाना मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे सलाम मौलाना म्हणाले, विद्यार्थीनी चांगले मार्क घेऊन शाळेचे नाव उज्वल केले पाहिजे. अध्यक्षीय भाषणा आसिफ वडवान यांनी केले.

यावेळी विविध स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थाना प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरव करण्यात आले. विशेष करुन खेळामध्ये सहभागी विद्यार्थाचा सन्मान करण्यात आला. वासिमबारी शेख यांनी शिक्षणाबरोबर खेळालाही महत्व दिले पाहिजे.

राज्य सहभागी खेळाडूना शिक्षणाबरोबर नोकरीतही फायदा होतो, असे सांगितले. सूत्रसंचालन लालकोट यांनी केले.

## बौध्द समाजातील संस्थांसाठी पायाभूत सुविधा अनुदान योजना जाहीर

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

राज्यातील बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी विशेष अनुदान योजना जाहीर केली आहे.

या योजनेअंतर्गत पात्र संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत असून, संबंधित संस्थांना या योजनेचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ही योजना राज्यातील धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या संस्थांसाठी लागू आहे. संबंधित संस्थेमध्ये बौद्ध समाजातील विश्वस्त किंवा सदस्यांची संख्या किमान ५१ टक्क्यांपेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. बौद्ध समाजाच्या विकासासाठी विविध सांस्कृतिक उपक्रम, शैक्षणिक कार्य, सामाजिक सेवा व जनजागृतीचे उपक्रम राबविणाऱ्या संस्थांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

पात्र संस्थांनी सन परिपूर्ण व आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन शाखा, सोलापूर येथे सादर करावेत. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत २० फेब्रुवारी २०२६ आहे. याबाबतची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी, सोलापूर तसेच जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी दिलीप पवार यांनी दिली आहे.

# अतिवृष्टी, पूरबाधित शेतकऱ्यांना एकरी ५० हजार नुकसान भरपाई द्या

### आम आदमी पार्टीची मागणी

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

अतिवृष्टीमुळे व सीना नदीला आलेल्या पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी आम आदमी पार्टीचे प्रदेश संघटनमंत्री ॲड. सागर पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली.

महाराष्ट्र शासनाने सीना नदीला आलेल्या पुरामुळे व अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याचे वचन दिले होते. या नैसर्गिक संकटात शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. उभ्या पिकावर १५ ते २० फूट इतके पाणी होते. पाण्यामध्ये जनावरे वाहून गेली होती. घरामध्ये पाणी शिरुन शेतकऱ्यांचा संसार उध्वस्त झालेला होता. अशा वेळेस तातडीच्या मदतीची अपेक्षा असताना थोडीफार रक्कम शेतकऱ्यांना देऊन त्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम सरकारने केले.

आम्ही महाराष्ट्र सरकारला अशी मागणी करतो की, ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी पाण्यामध्ये वाहून गेलेल्या आहेत, बांध फुटलेली आहेत अशा सर्व शेतकऱ्यांना तातडीने एकरी ५० हजार इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर त्वरीत जमा करावी, अन्यथा आम आदमी पार्टी आंदोलन करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देईल.

आम आदमी पार्टी दि. १३ फेब्रुवारीपासून रोजी शेतकरी संवाद यात्रा उपक्रम राबवण्यात येणार आहे. सीना नदीलगतची गावे, शेतकऱ्यांची दूरवस्था समजून घेवून आंदोलनाचे वेगवेगळे टप्पे हाती घेण्यात येणार आहे. आम आदमी पार्टीच्या पंजाब सरकारने एकरी रक्कम रुपये २० हजार शेतकऱ्यांना जमा केली. जनावरे दगावलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात ५० हजार जमा केले तसेच शेत वाहून गेलेल्या, बांध फुटलेल्या शेतकऱ्यांना एकरी ५० हजार इतकी रक्कम देण्यात आली. या धर्तीवर महाराष्ट्र सरकारने मदत करण्याची गरज आहे, असे ॲड. पाटील म्हणाले.

या पत्रकार परिषदेला जुबेर हिरापुरे, मल्लिकार्जुन पिलगेरी, जफर मदनी आदी उपस्थित होते.

# प्रशिक्षित नगरसेवकच सक्षम शहर घडवू शकतात !

### प्रशिक्षणातूनच नवे नेतृत्व अन् नेतृत्वातूनच परिवर्तन घडेल




किरण बनसोडे
मो. ९८२२६१६१४१

सोलापूर महापालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीने शहराच्या राजकारणात नवा अध्याय लिहिला आहे. भाजपाने तब्बल ८७ जागा जिंकत अभूतपूर्व यश मिळवले, तर विरोधकांना केवळ १५ जागांवर समाधान मानावे लागले. महापौर विनायक कोंड्याल यांची बिनविरोध निवड होत त्यांनी शहराच्या इतिहासात चौथे बिनविरोध महापौर म्हणून नोंद केली. तर उपमहापौर पदी पर्यावरणवादी ज्ञानेश्वरी देवकर यांची निवड बिनविरोध झाली. सभागृह नेतेपदी अनुभव संपन्न असलेले नरेंद्र काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मोठी जबाबदारी नरेंद्र काळे यांच्याकडे देण्यात आली आहे. सभागृह नेते पदाचा पदभार घेतेवेळी नरेंद्र काळे यांनी पहिल्या विशेष सभेतील काही नगरसेवकांच्या वर्तनाबद्दल स्पष्ट नाराजी व्यक्त केली. तेवढ्यावरच न थांबता नरेंद्र काळे यांनी सभा शास्त्राचे थोडेफार धडेही दिले. सत्ता हे केवळ राजकीय समीकरण नाही; हा जनतेने दिलेला प्रचंड विश्वास आहे. पण बहुमताची ही लाट जितकी दणदणीत आहे, तितकीच तिची जबाबदारीही भक्कम आहे.

या नव्या सभागृहातील बहुतांश नगरसेवक हे प्रथमच निवडून आलेले आहेत. लोकांचा कौल मिळवणे ही एक गोष्ट; पण लोकांचा कारभार चालवणे ही त्याहून मोठी गोष्ट. महापालिका म्हणजे केवळ रस्ते, पाणी आणि कचरा यांची चर्चा करणारे व्यासपीठ नाही; ती कायदे, नियम, अर्थसंकल्प, स्थायी समित्या, ठराव, अधिनियम आणि सभाशास्त्र यांच्या गुंतागुंतीतून चालणारी एक सक्षम यंत्रणा आहे. या यंत्रणेचा प्रत्येक गिअर योग्यरीत्या फिरला, तरच शहराचा विकास गती घेऊ शकतो. नवख्या नगरसेवकांकडे उत्साह आहे, ऊर्जा आहे, लोकांशी नाळ आहे; पण त्यांना कायद्याचे, प्रक्रियेचे आणि प्रशासकीय मर्यादांचे भान देणारे प्रशिक्षण अत्यावश्यक आहे.'बहुमताची लाट' ते 'जबाबदारीची वाट' महत्वाची बाब आहे. नवख्या नगरसेवकांसाठी प्रशिक्षणाची अपरिहार्यता आहे. सभागृहात प्रश्न कसा मांडायचा? विषयसूची कशी समजून घ्यायची? अर्थसंकल्पातील तरतुदींचे वाचन कसे करायचे? स्थायी समिती आणि विशेष समित्यांची भूमिका काय? महापालिका अधिनियमातील कलमे कशी वापरायची ? या साऱ्यांचे सखोल ज्ञान नसल्यास लोकप्रतिनिधींचा आवाज प्रभावी ठरू शकत नाही.

त्यासाठी सर्व नगरसेवकांना भारतीय संविधान, महापालिका अधिनियम आणि इतर नियमांची पुस्तके भेट देण्याची गरज आहे. 'अवघ्या सोलापूरचा कारभार ' पाहायचा असेल, तर नगरसेवक माहितीने समृद्ध असले पाहिजेत. अन्यथा बहुमत असूनही निर्णयप्रक्रिया काही मोजक्या जाणकारांपुरती मर्यादित राहण्याचा धोका असतो. लोकशाहीची खरी ताकद म्हणजे सुजाण आणि सजग प्रतिनिधी. प्रशिक्षण म्हणजे केवळ औपचारिक कार्यशाळा नव्हे; ती दृष्टी देणारी प्रक्रिया आहे. यातूनच प्रश्न विचारण्याची सवय, कागदपत्रांचा अभ्यास आणि प्रशासनावर प्रभावी नियंत्रणाची क्षमता विकसित होते.

सोलापूर महापालिकेने तातडीने सर्व नगरसेवकांसाठी संरचित प्रशिक्षण कार्यक्रम आखावा. सोलापुरातील प्रिसिजन, बालाजी अमाईन्स, सिंहगड, एमआयटी यासह मोठ्या कंपन्या, संस्था-संघटनांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. यासाठी प्रशासन, विधिज्ञ, निवृत्त अधिकारी, अभ्यासक आणि स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग असावा. सभाशास्त्र, शहरी नियोजन, अर्थव्यवस्था, विकास, नागरी समस्या, पर्यावरणीय प्रश्न, डिजिटल प्रशासन, नागरिकांचा सहभाग या सर्व विषयांवर मार्गदर्शन व्हावे. प्रशिक्षणातूनच नवे नेतृत्व घडते आणि नेतृत्वातूनच परिवर्तन घडेल.

आज सोलापूरला केवळ राजकीय स्थैर्याची नाही, तर प्रशासनिक परिपक्वतेची गरज आहे. बहुमताने दिलेली ताकद ही विकासासाठी वापरायची संधी आहे. पण संधीचे सोने करण्यासाठी ज्ञान, शिस्त आणि तयारी आवश्यक आहे. बहुमत हे केवळ सत्ता नसते, ती जनतेच्या अपेक्षांची उभी जबाबदारी असते. अनुभव नसलेल्यांच्या हातात कारभार गेला तर विकासाची गती मंदावते. प्रशिक्षित नेतृत्वच शहराला दिशा देते. सभागृहात टाळ्यांपेक्षा अभ्यासाचे आवाज घुमले, तरच लोकशाही बळकट होते.

नियम, कायदे आणि अर्थसंकल्प यांचे भान असलेला नगरसेवकच खऱ्या अर्थाने जनतेचा रखवालदार आणि सेवक ठरतो. सोलापूरचा भविष्यकाळ ठरवणारे निर्णय भावनेने नव्हे, तर ज्ञान आणि शिस्तीने घ्यावे लागतील. प्रशिक्षित नगरसेवकच सक्षम शहर घडवू शकतात. बहुमताने दरवाजे उघडले आहेत, आता सुजाण नेतृत्वाने विकासाची वाट चालायची आहे. सोलापूरच्या सर्वांगीण, चौकस आणि पारदर्शक भविष्यासाठी प्रशिक्षण हीच पहिली पायरी ठरावी. तरच महापालिकेतला आवाज बुलंद राहू शकणार आहे.

# पोलिस भरतीसाठी ३३९ उमेदवारांनी दिली चाचणी

### ३०३ जणांची चाचणी पूर्ण, ३६ उमेदवार अपात्र

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १२ फेब्रुवारी-**

पोलीस भरती प्रक्रिया ही मुख्यालय येथे घेण्यात आली. यामध्ये मैदानी चाचणीमध्ये बुधवारी एकुण ५०० उमेदवारांना बोलविण्यात आलेले होते. त्यापैकी प्रत्यक्षात ३३९ उमेदवार हजर राहीले होते. ३६ उमेदवार अपात्र ठरले तर ३०३ उमेदवारांची मैदानी चाचणी पुर्ण झाली असुन त्यामध्ये १४२ उमेदवार अपात्र ठरले आहेत अशी माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगण्यात आले.

११ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलाची सन २०२४-२०२५ ची पोलीस शिपाई भरती दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरु करण्यात आली आहे.

दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या मैदानी चाचणीमध्ये एकुण ५०० उमेदरवारांना बोलविण्यात आलेले होते. त्यापैकी प्रत्यक्षात ३३९ उमेदवार हजर राहीले होते. हजर राहीलेल्या उमेदवारापैकी शारिरीक मोजमापात ३६ उमेदवार अपात्र ठरले असुन ३०३ उमेदवारांची मैदानी चाचणी १६०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे व गोळा फेकीची चाचणी पुर्ण झाली असुन त्यामध्ये १४२ उमेदवार अपात्र ठरले आहेत.

या भरती प्रकियेमध्ये एकुण १६१ उमेदवार हे शारिरीक मोजमापात व मैदानी चाचणीमध्ये पात्र ठरले आहेत. पोलीस भरतीकरीता येणाऱ्या सर्व उमेदवारांना पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलामध्ये भरती प्रक्रिया हि पारदर्शक असुन कोणी प्रलोभण अथवा अमीष दाखविल्यास तात्काळ पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांना संपर्क साधावा असे आवाहन सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या वतीने करण्यात आले.




पोलीस भरती प्रक्रिये करीता येणाऱ्या उमेदवारांना राहण्यासाठी पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण समोरील ॲचीव्हर्स हॉल येथे सोय करण्यात आलेली आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### नेहरु विद्यालयात पालक मेळावा व दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**जेऊर, दि. १२ फेब्रुवारी-**

रावगाव (ता. करमाळा) येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात पालक मेळावा व दहावी निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बापूसाहेब जाधव हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ लाभले होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध असलेल्या शैक्षणिक व करिअरच्या विविध संधींवर प्रकाश टाकला. ग्रामीण विद्यार्थीही योग्य दिशा, कष्ट आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मोठे यश संपादन करू शकतात, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक विजय कोळेकर यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, यश हे केवळ परीक्षेतील गुणांवर नव्हे, तर चिकाटी, सातत्य आणि योग्य निर्णयक्षमतेवर अवलंबून असते, असे सांगत विद्यार्थ्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते सादर केली. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतर्फे सर्व विद्यार्थी व पालकांसाठी स्नेहभोजनाची सुयोग्य व्यवस्था करण्यात आली होती.

### पिलीव येथे आज मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन

**पिलीव, दि.१२ फेब्रुवारी-**

पिलीव (ता.माळशिरस) येथील डॉ. शेटे हॉस्पीटलमध्ये दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये स्त्री रोग तपासणी व उपचार, बाळंतपण मार्गदर्शन व उपचार, गर्भधारणा न होणे, अनियमित मासिक पाळी व पाळीचे विकार, गर्भ पिशवीबद्दल समस्या व रक्तस्राव, हार्मोनल समस्या तसेच मधुमेह, दमा, उच्च रक्तदाब, थायरॉईड, त्वचारोग यावर निदान व उपचार तसेच अत्याधुनिक मशिनद्वारे डोळ्याची तपासणी, बिनटाका मोतीबिंदू शस्त्रक्रिया, बुबळावरील मांस शस्त्रक्रिया व उपचार तसेच दर मंगळवारी मोफत स्त्रीरोग तपासणी या शिबीराचा नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन डॉ. निखीलेश शेटे यांनी केले आहे.

### हंजगे यांची प्रगतशील शेतकरी पुरस्कारासाठी निवड

**वळसंग, दि.१२ फेब्रुवारी-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील रहिवाशी लक्ष्मण श्रीशैल हंजगे यांना श्री साई समर्थ फाउंडेशन यांच्याकडून राज्यस्तरीय प्रगतशील शेतकरी समाजभूषण पुरस्कारासाठी निवड केली आहे. साई समर्थ फौंडेशन कडून शैक्षणिक, औद्योगिक, कला-क्रीडा, वैद्यकीय व सांस्कृतिक क्षेत्रात गेली दहा वर्षे सातत्याने कार्यरत असलेल्या समाजातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविले जाते.



फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हिंदुराव ढवळे, संस्थापक संतोष ढवळे व अध्यक्ष डॉ. अशोक नाईक यांनी यंदाच्या प्रगतशील शेतकरी समाजभूषण या पुरस्काराची निवड वळसंगचे सुपुत्र लक्ष्मण हंजगे यांना १४ फेब्रुवारी रोजी देण्याची ठरवले आहे. तर संपूर्ण गावात लक्ष्मण हंजगे यांचा गुण गौरव होत आहे.

### मुख्याध्यापक संघाच्या जिल्हा सचिवपदी हत्तीकणबस प्रशालेचे श्रीशैल पाटील

**अक्कलकोट, दि १२ फेब्रुवारी**

सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या जिल्हा सचिवपदी अक्कलकोट तालुक्यातील हत्तीकणबस येथील शंकरलिंग प्रशालेचे मुख्याध्यापक श्रीशैल पाटील यांची निवड झाल्याने अक्कलकोट तालुक्यात शिक्षक वर्गात जलोष करण्यात आला., जिल्हा सचिवपद पहिल्यांदाच अक्कलकोट तालुक्याला मिळाल्याने तालुक्यात मुख्याध्यापकां मध्ये आनंदाचे वातावरण आहे, यापूर्वी त्यांनी अक्कलकोट तालुका माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष पद, सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव पद भूषविले आहे ,त्यांच्यामध्ये संघटनात्मक दृष्टिकोन असून



सर्व कर्मचाऱ्यांना मुख्याध्यापकांना शिक्षकांना न्याय मिळवून देण्याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे, त्यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी तालुक्यात अनेक शैक्षणिक उपक्रम राबवले . प्रशासकीय कामकाज संघटनात्मक कौशल्याने काम करीत असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊन जिल्हा सचिव पदी निवड झाल्याने तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे, त्यांच्या निवडीबद्दल गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे , शिक्षण विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी , शिक्षण विस्तार अधिकारी लखाप्पा पुजारी,अक्कलकोट तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रभाकर बंदीछोडे, उपाध्यक्ष शिवराज किलजे ,सचिव सिद्धया स्वामी ,प्रसिद्धी प्रमुख प्राचार्य शंकर व्हनमाने ,कल्याणी देशेट्टी ,लक्ष्मण चलगेरी ,सुपुत्र जाधव, नंदाजी कदम ,शहाजी प्रशालेचे मुख्याध्यापक पडळकर सर,आदी मान्यवरांनी अभिनंदन केले,

### बार्शीत बारावीच्या परीक्षेला प्रारंभ

**बार्शी, दि. १२ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यावतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या वार्षिक परीक्षेला मंगळवारपासून बार्शी तालुक्यात सुरुवात झाली आहे. तालुक्यात एकूण ६ हजार ६८० विद्यार्थी या परीक्षेसाठी नोंदणीकृत असून, पहिल्या दिवशी इंग्रजी विषयाच्या पेपरसाठी ५ हजार ९४० विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. बार्शी शहरात परीक्षेसाठी एकूण चार परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली असून, त्यामध्ये श्री शिवाजी महाविद्यालय, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय आणि बार्शी टेक्निकल हायस्कूल या केंद्रांचा समावेश आहे. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी तालुक्यात विविध ठिकाणी परीक्षा केंद्रे उभारण्यात आली आहेत. त्यामध्ये विद्यामंदिर कन्या प्रशाला वैराग, सर्वोदय विद्यालय पांगरी, सदगुरु अनुराधाताई आश्रम शाळा वैराग, शोभाताई सोपल कनिष्ठ महाविद्यालय पांगरी, कर्मवीर विद्यालय चारे, अर्णव विद्यालय सासुरे, शेळगाव हायस्कूल शेळगाव आणि हेमुजी चंदेले हायस्कूल शेळगाव या परीक्षा केंद्रांचा समावेश आहे.

# पिलीवच्या यात्रेत जोरदार हाणामारी; सहा जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१२ फेब्रुवारी-**

पिलीव (ता.माळशिरस)येथील महालक्ष्मी देवीच्या यात्रेत शेवटच्या दिवशी प्रचंड गर्दीत होती. यावेळी रात्री साडेअकरा वाजता गर्दीत चुकुन धक्का लागल्याच्या कारणावरून बाळू खुर्द यांच्या परिवारातील पाच जणांस मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी रोहन बोडरे, अर्जुन बोडरे, रणजीत सोलंकर, गणेश सुळे, सौरभ बोडरे, विजय बोडरे या सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिलीव पोलीस ठाण्यात बालू खुर्द यांनी गुन्हा नोंदवला आहे. त्यानुसार रात्री ११.३० वाजता बाळु खुर्द (रा. पिलीव) हे आपला भाचा राहुल सोलंकर, पुतण्या सुरज खुर्द, वहीणी शैला, मेहुणी उषा मोटे, पुतण्या गोविंदराज खुर्द यांच्यासह देवीच्या छबीन्यापासून पाळण्याकडे जात होते. त्याठिकाणी ओळखीचे रोहन बोडरे, अर्जुन बोडरे, रणजीत सोलंकर, गणेश सुळे, सौरभ बोडरे, विजय बोडरे हेही सोबत पाळण्याजवळ



आले. त्याठिकाणी गोविंदराज खुर्द याचा रोहन बोडरे यास गर्दीत चुकून धक्का लागला. यानंतर गोविंदराज याने त्याची लगेच माफीही मागितली. तरीही रोहन बोडरे याने गोविंदराज याच्या गालावर जोरात चापट मारली. रोहनने त्याच्या सोबत असणाऱ्या मित्रांना मोठ्याने ओरडून बोलावून घेत गोविंदराज यास जोरदार मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी सर्वजण जाऊ द्या चुकुन झाले असेल असे त्यांना विनवणी करीत असतानाच रणजीत सोलंकर याने पाळण्याजवळ पडलेली लोखंडी खुर्ची माझ्या डोक्यात घातली. तसेच अर्जुन

> **ऐन यात्रेच्या शेवटच्या गर्दीच्या दिवशी सदरची घटना रात्री साडे अकराच्या सुमारास घडल्यामुळे यात्रेत तणावपूर्ण व भीतीचे वातावरणात निम र्ण झाले होते. या सर्वावर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.**

बोडरे याने लोखंडी मेक भाचा राहुल सोलंकर याच्या मानेवर जोराने मारली, तर रोहन बोडरे, गणेश सुळे, सौरभ बोडरे, विजय बोडरे यांनी मला तसेच माझा भाचा राहुल सोलंकर, पुतण्या सुरज खुर्द, वहीणी शैला खुर्द, मेहुणी उषा मोटे, पुतण्या गोविंदराज यास लाथा बुक्यांनी त्या सहा जणांनी जोरदार मारहाण करीत अर्वाच्य शिवीगाळ केली तसेच जिवे मारणयाची धमकी दिली. अशी फिर्याद पिलीव पोलीस ठाण्यात नोंदवली आहे. या घटनेचा अधिक तपास माळशिरस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विकास दिंडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल पंडीत मिसाळ हे करीत आहेत.

## देबडवार यांना पोस्ट ऑफ द मंथ पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.१२ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद व ओपन लिंक्स फाउंडेशन विनोबा प पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खंदारेवस्ती येथील उपक्रमशील शिक्षक रविंद्र देबडवार यांचा नुकताच डिसेंबर महिन्याचा तालुकास्तरीय द्वितीय क्रमांकाचा पोस्ट ऑफ द मंथ पुरस्कार तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी विकास यादव यांचे हस्ते देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या जीवनकौशल्य विकासासाठी विनोबाच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविले जातात. प्रोत्साहन म्हणून कृतिशील उपक्रम व शिक्षकांना दरमहा सन्मानित केले जाते. या उपक्रमांतर्गत शाळेद्वारे Spoken English, Story Telling, Spelling Bee व Poetry Recitationया स्पर्धांमध्ये शालेय स्तरावर सराव करून विनोबा ॲपवर व्हिडीओ अपलोड तसेच शाळेत राबविले जाणारे विविध उपक्रमही



अपलोड केले होते. या उपक्रमांची उपयुक्तता व मिळालेले लाईक्स यांच्या एकत्रिकरणातून केंद्र, तालूका, जिल्हा स्तरावर गुणांकन केले जाते व पुरस्कार घोषित केले जातात. यातूनच हे यश मिळाले असून केंद्रस्थानी असलेल्या विद्यार्थ्यांमुळेच हा सन्मान मिळाल्याचे शिक्षकांनी सांगितले.या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी विकास यादव, बीट विस्ताराधिकारी तथा केंद्रप्रमुख डॉ. शिवराज ढाले, राजन सावंत, मुख्याध्यापक कैलास परबळकर,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष तानाजी माने आदींनी अभिनंदन केले.

## राज्य पुरस्कार चाचणी परीक्षेत महाराष्ट्र विद्यालयाचे यश



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.१२ फेब्रुवारी**

रामबाग, भोर जि. पुणे या ठिकाणी २७ जानेवारी ते ३० जानेवारी स्काऊट व ३ ते ६ फेब्रुवारी दरम्यान गाईड यांची राज्यस्तरीय परीक्षेत स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त केला आहे. त्यातील स्काऊटची नावे पुढीलप्रमाणे- सुखदेव प्रकाश गव्हाणे, संस्कार योगेश उपळकर, श्रेयस प्रवीण पांगरे, स्वर्णीम सुशीलकुमार मुठाळ, वेदांत संतोष गव्हाणे, अथर्व श्रीराम सातपुते, रणवीर काकासाहेब गुंड तर गाईड प्राची सुनील शिंदे, शरयू राहुल ठोंगे, श्रावणी राहुल हणमंते, प्रतीक्षा अतुल आवारी, श्रुती हरिदास दांगट, क्रांती धीरज शेळके या सर्व विद्यार्थ्यांना योगेश उपळकर, पी.डी. पाटील, अतुल नलगे, व्ही. पी. चौधरी व जी. एम. लोमटे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य डॉ. मिराताई यादव, एस. बी. शेळवणे, जिल्हा स्काऊट संघटक श्रीधर मोरे, गाईड संघटक अनुसया सिरसाट विद्यालयाच्या प्राचार्या के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक मदने के. जी. पर्यवेक्षिका एन.बी. साठे आदींनी अभिनंदन केले.

## राजर्षी शाहू लॉ कॉलेजमध्ये पुरस्कार वितरण



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १२ फेब्रुवारी -**

राजर्षी शाहू लॉ कॉलेजमधील एलएलबी व बीए एलएलबी अभ्यासक्रमामधील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थीनींना कै. मोहनलाल बन्सीलाल परदेशी यांच्या पुण्यस्मरण प्रित्यर्थ कु. पल्लवी बसवेश्वर फल्ले व कु. राजश्री पद्माकर कवडे यांना सुवर्णपदक, सन्मानचिन्ह व रोख रक्कम दहा हजार रुपये प्रत्येकी देऊन फल्ले सन्मान करण्यात आले.

हा पुरस्कार महाविद्यालयामध्ये मागील वर्षापासून दिला जातो चालू वर्षाचे या पुरस्काराचे द्वितीय वर्ष असून यामध्ये सदर दोन विद्यार्थिनींना हा पुरस्कार देण्यात आला. कै. इंजिनिअर मोहनलाल बन्सीलाल परदेशी हा पुरस्कार राजेश परदेशी, डेप्युटी चॅरिटी कमिशनर, पुणे यांच्यावतीने देण्यात येतो. सदर पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. त्यामध्ये माजी आमदार राजेंद्र राऊत, प्रमुख पाहुणे प्रा. मिलिंद जोशी, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती डॉ. अरुणा ढेरे, मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी प्रकाशजी पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, नूतन नगराध्यक्षा तेजस्विनीताई कथले व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रत्नदीप सोनकांबळे आदी मान्यवरांसह महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

## हौशी कलाकारांच्या गीतांनी बार्शीकर मंत्रमुग्ध




**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १२ फेब्रुवारी -**

व्हॅलेंटाईन सप्ताह निमित्त रविवारी दि. ८ फेब्रुवारी रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह बार्शी येथे आयोजित केलेल्या फक्त हौशी कलाकार ग्रुपतर्फे प्रेम गीताचा 'हम है राही प्यार के' कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमास डिजीटल मीडियाचे अध्यक्ष राजा माने यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमास बार्शीतील सर्व स्तरावरील प्रेक्षक उपस्थित होते. ३ ऑगस्ट २०२५ च्या कार्यक्रमानंतर फक्त हौशी कलाकारांचे बार्शीतील कायम उपस्थित असणारे प्रेक्षक आतुरतेने वाट पहात होते. त्या प्रेक्षकांना ही फक्त हौशी कलाकार ग्रुप सदस्यांनी आनंद देण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाची सुरुवात 'हम है राही प्यार के' या चित्रपटातील 'युही कट जायें गा सफर साथ चलने से' या गीताने झाली. सदर गीत सर्व सदस्यांनी सामूहिक गायले.

सदर कार्यक्रमात सी ए बालकिसन जाजू, मेजर अविनाश हिंगमीरे, प्रशांत माळवदे, रवींद्र मैंदर्गीकर, अशोक डहाळे, गोविंद तापडिया, अजय खंडेलवाल आणि सुनील फल्ले या पुरुष सदस्यांनी गीतांची पेशकश केली. त्याचबरोबर लक्ष्मी तोरड, रुपाली पवार, सुजाता हिंगमीरे, स्वाती डोळे, निमा कांबळे आणि अरुणा तापडिया या महिला सदस्यांनी एकापेक्षा एक सरस, अवीट आणि बहारदार गीतांची पेशकश केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी पलसे यांनी पद्धतशीर आणि कार्यक्रम उंचीवर नेणारे केले. सदर कार्यक्रमात रफ्ता रफ्ता देखो आंख मेरी लडी है, हाल क्या है दिलो का क्या सनम, हे चिंचेचे झाड चिंचेचे झाड, क्या मौसम आया है या गीतांना प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. सदर कार्यक्रमात अरे संसार संसार, अनोखी अदा, खुद्दार (नवा), सपने साजन के, दूध का कर्ज, चमत्कार, देवता, हा मैने भी प्यार किया है, गंमत जमंत, अनाडी (नवा), एक दुजे के लिये, पतीता, मधुचंद्र, नागीण, आई मिलन की बेला, सिलसिला, नाईट इन लंडन, आप तो ऐसे ना थे या, पत्थर के सनम, कहानी किस्मत की, अनुराग या जुन्या नव्या चित्रपटातील गीतांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या गाण्याची निवड हटके असल्याने प्रेक्षक सुरुवातीपासून शेवटपर्यंत खुर्चीला खिळून बसले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सीए बालकिसन जाजू, गोविंद तापडिया, लक्ष्मी तोरड, रवींद्र मैंदर्गीकर तसेच सुनिल फल्ले यांनी परिश्रम घेतले.





## क्रिकेट व कबड्डी स्पर्धेत कर्मयोगी पब्लिक स्कूल विजेते

### क्रीडा भारती स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ फेब्रुवारी-**

क्रीडा भारती पंढरपूरतर्फे घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धेमध्ये कर्मयोगी पब्लिक स्कूल पंढरपूरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांनी १४ वर्षांखालील गटात क्रिकेट व १७ वर्षांखालील गटात कबड्डी स्पर्धेत विजेतेपद पटकाविले.

एमआयटी विश्वशांती गुरुकुल वाखरी येथे झालेल्या या स्पर्धेमध्ये सोलापूर, पुणे, दौंड, मंगळवेढा, सांगोला आणि बार्शी येथील वीस शाळांतील ६०० स्पर्धक सहभागी झाले होते. याचे उद्घाटन एमआयटी गुरुकुल पंढरपूर चे प्रोजेक्ट डायरेक्टर कर्नल तथा प्राचार्य शिवाजीराव गवळी यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रांत मंत्री ज्ञानेश्वर मॅकल, कर्मयोगी पब्लिक स्कूलचे प्राचार्य सिबा नारायण दास, सोलापूर क्रीडा भारती जिल्हा मंत्री रवी ओहोळ व क्रीडा भारती पंढरपूर तालुका मंत्री दत्तात्रय शिरसट उपस्थित होते. स्पर्धेच्या उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांनी सुरेख कवायत संचलन सादर केले.

**कामगिरी : वैयक्तिक :** १४ वर्षे गट : आर्यन शिरसट (थाळीफेक, प्रथम), गणेश देठे (द्वितीय). तोषीत भुसनर (२०० मीटर धावणे प्रथम), सृष्टी नागणे (थाळीफेक प्रथम), प्रगती सावंत (द्वितीय). कल्याणी होळकर (२०० मीटर प्रथम). हर्षदा लेझे (गोळा फेक द्वितीय) अर्पिता लोकरे (गोळा फेक तृतीय), सृष्टी शिंदे (२०० मीटर धावणे प्रथम). सिद्धी नागटिळक (२०० मीटर धावणे, तृतीय) संचिता लोकरे (गोळा फेक, प्रथम), प्रणाली बागल (१०० मीटर धावणे प्रथम), दिग्विजा पवार(गोळा फेक, द्वितीय). सार्थक साळुंखे ( २०० मीटर धावणे, प्रथम) स्वरा असबे (गोळा फेक द्वितीय).

**सांघीक :** १४ वर्षांखालील मुले क्रिकेट (विजेते). कबड्डी (उपविजेते), १७ वर्षांखालील मुले कबड्डी (विजेते), व्हॉलिबॉल (तृतीय)



## 'आयटक'तर्फे बार्शी तहसील कचेरीवर निदर्शने व आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१२ फेब्रुवारी-**

केंद्र सरकारच्या शेतकरी कामगार विरोधी धोरणा विरोधात देशव्यापी संपाचा भाग म्हणून बार्शी तहसील कार्यालयासमोर आयटक संलग्न ग्रामपंचायत कर्मचारी संघटना, डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल श्रमिक संघ, बांधकाम कामगार संघटना, अर्धवेळा आरोग्य स्त्री परिचर कर्मचारी संघटना, बार्शी नगरपालिका कंत्राटी कामगार संघटना, बँक एम्प्लॉईज समन्वय समिती, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह संघटना सीटू, एमएसईबी वर्कर्स फेडरेशन, अखिल भारतीय किसान सभा यांनी आज दि. १२ फेब्रुवारी रोजी संयुक्तपणे घोषणाबाजी करत जोरदार निदर्शने केली. यावेळी सर्व कामगार संघटनांच्या प्रमुख नेत्यांनी भाषणे करत सरकारच्या विरोधामध्ये हल्ला चढविला.

यावेळी दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी अचानक जारी केलेली अधिसूचना रद्द करा, श्रमिकांना सुरक्षा प्रदान करा, किमान मासिक वेतन तीस हजार रुपये करा, समान काम समान वेतन द्या, खाजगीकरण कंत्राटीकरण बाह्य स्रोत पद्धत बंद करा, फिक्स टर्म एम्प्लॉयमेंट रद्द करा, सार्वजनिक क्षेत्र बँक, विमा, वीज, उद्योग, कोळसा उद्योग, रेल्वे इ. यांचे खाजगीकरण बंद करा, किमान हमीभावची कायदेशीर हमी करा, वीज विधेयक तसेच जनसुरक्षा कायदा मागे घ्या, जल, जंगल, जमीन, कृषी भूमी, आजीविका व खाद्य सुरक्षा यांचे रक्षण करा, शिक्षणाचा बाजार थांबवा, बँकांचे खाजगीकरण रद्द करा, एफडीआयचे धोरण मागे घ्या, खाजगी बँकातील विदेशी भांडवल वाढ रद्द करा, बँकांचे विलनीकरण थांबवा आदी मागण्या करण्यात आल्या. या अंदोलनामध्ये कॉ. लहू आगलावे, डॉ. प्रवीण मस्तुद, अनिरुद्ध नखाते, बालाजी शितोळे, सरिता कुलकर्णी, मुबारक मुलाणी, भारत भोसले, भारत चव्हाण, प्रमिला शिंदे, सुवर्णा नेंदाने, लक्ष्मण घाडगे, आनंद गुरव, धनाजी पवार, निर्मला सरवदे, दीपक भोसले, नानासाहेब ठाकरे, राजू ढेंबरे, दादा काकडे, परमेश्वर नागटिळक, विनोद गायकवाड, विशाल तांबडे, वर्षा गवळी, गौतम गव्हाणे, बबन चव्हाण, आप्पासाहेब देवकर, कोमल लोखंडे, मैना तोरणे, साधना उबाळे, खंडू खांडेकर, सुवर्णा कांबळे, शकील मुलानी, सूरज अन्नदाते, अक्षय मंडलिक, बाळासाहेब वाकळे, आकाश सांगाडे, केदार फुले, मयुर ननावरे, ओंकार राजमाने, उमेश काळे, मनोज कुलकर्णी, बाळासाहेब प्रतापे, सचिन काळे, गिरीश वस्ताद आदी उपस्थित होते.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माळशिरसमध्ये अनेकांना पराभवाचे धक्के

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१२ फेब्रुवारी-**

नुकत्याच झालेल्या जिल्ह्य परिषद व पंचायत समिती निवडणुकीत अनेक दिग्गजांना पराभवाचा धक्का बसला. यामध्ये माळशिरस तालुक्याचे विद्यमान आमदार उत्तमराव जानकर यांचे चिरंजीव जीवन जानकर यांना दहीगाव जिल्हा परिषद गटात माळशिरस तालुक्याचे माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या पत्नी संस्कृतीताई सातपुते यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला. तर गुरसाळे पंचायत समिती गणात माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनसिह मोहीते-पाटील यांना भाजपचे शेळके यांच्याकडून पराभवाचा सामना करावा लागला. पिलीव पंचायत समिती गणात जिल्हा परिषदेचे माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार यांच्या पत्नी यज्ञासेन जहागिरदार यांना भाजपच्या शिवराज पुकळे यांच्या पत्नी नम्रता पुकळे यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला.

पिलीव गटात माजी पंचायत समिती सदस्य रणजितसिंह जाधव यांना भाजपच्या चंद्रकांत जाधव यांच्याकडून पराभवाचा सामना करावा लागला. निमगाव पंचायत समिती व जिल्हा परिषद गटावर कायम वर्चस्व असणाऱ्या के.के. पाटील यांचा पुतण्या किरण पाटील यांना पैलवान दत्ता मगर यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला. या निवडणुकीत प्रतिष्ठीत राजकीय घराणे व कायम राजकारणात सक्रिय असणाऱ्या नेतेमंडळीना जनतेने घरचा रस्ता दाखविला आहे. तर माळशिरस तालुक्यात आतापर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये एकतर्फी वर्चस्व असणाऱ्या मोहीते-पाटील यांना सुद्धा जनतेने चांगलाच शह दिला आहे. तालुक्यात त्यांचे जिल्हा परिषदेचे उमेदवार निवडून आले पण जिल्हा परिषदेवर भाजपने निर्विवाद वर्चस्व मिळविल्याने त्यांना प्रथमच सत्तेबाहेर बसावे लागत आहे.

माळशिरस पंचायत समितीत मोहिते-पाटील यांनी सत्ता अबाधित ठेवली आहे. तर सध्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीनंतर झालेल्या महानगरपालिका, नगरपंचायत, नगरपरिषद या सर्वच निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाची वाताहत झाल्याचे चित्र आहे. भाजपाने मात्र आता थोडेसे पाय घट्ट रोवल्याचे चित्र आहे. आता गावपातळीवरील राजकारण मात्र काय असणार याकडे लक्ष आहे.



# सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांची पुण्यतिथी विविध संस्थांच्यावतीने साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१२ फेब्रुवारी-**

सहकार महर्षि कारखान्याचे संस्थापक सहकार महर्षि कै. शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील यांची ४७ वी पुण्यतिथी विविध संस्थांच्या वतीने साजरी करण्यात आली. यानिमित्त शिवरत्न बंगला येथील सहकार महर्षी यांच्या समाधीचे पूजन विधिवत, धार्मिक पद्धतीने करण्यात आले.

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील व त्यांचे कुटूंबीय तसेच कारखाना व विविध संस्थाचे पदाधिकारी, खातेप्रमुख व कामगार यांनी सहकार महर्षि काकासाहेब यांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर सहकार महर्षिंच्या प्रतिमेची मिरवणूक शिवरत्न बंगला येथील समाधीस्थळ ते सहकार महर्षि कारखाना स्थळावरील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्या पर्यंत काढण्यात आली. संस्थापक सहकार महर्षि कै. काकासाहेब यांचे पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पचक्र व पुष्पहार अर्पण करून तसेच विधीवत पूजन कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख यांचे व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर दिपआरती करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये सहकारमहर्षिंच्या जिवनावरील गीत गायन व मराठी, हिंदी व इंग्रजीतून शालेय विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यामध्ये महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला, शंकरनगर च्या विद्यार्थ्यांनी सहकार महर्षिंचे जिवनावरील समुह गीत गायन केले त्याच प्रशालेच्या विद्यार्थीनी कु.भुमिका कारमकर, कु. इरिना पठाण व लक्ष्मीबाई कन्या प्रशाला, शंकरनगर ची विद्यार्थीनी कु. श्रावणी मोहिते यांनी मराठीतून तसेच सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील इंग्लिश स्कुल, घवलनगर च्या विद्यार्थीनी कु. तन्वी भांगे हिने हिंदीतून व कु. राजनंदिनी गायकवाड यांनी इंग्रजीतून मनोगत व्यक्त केले.

या सर्व सहभागी विद्यार्थ्यांना कारखान्याचे पदाधिकारी व अधिकारी यांचेकडून बक्षीस वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता कारखान्याचे संचालक सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, रावसाहेब मगर, विराज निंबाळकर, रामचंद्र ठवरे, जयदिप एकतपुरे तज्ञ संचालक-राम चंद्राव सावंत-पाटील, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक जयवंत माने-देशमुख व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, धनंजय सावंत, श्रीकांत बोडके, राजेंद्र भोसले, अनिलराव कोकाटे, हर्षाली निंबाळकर तसेच कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले व कारखान्याचे माजी संचालक धनंजय चव्हाण, भिमराव काळे, भारत फुले, मोहराव लोंढे तसचे श्री विजय गणेशोत्सव मंडळ पब्लीक ट्रस्टचे ट्रस्टी श्रीकांत राऊत, वसुंधरा देवडीकर, तुकाराम जाधव व संतोष माने तसेच कारखान्याचे खातेप्रमुख, अधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विजय गणेशोत्सव मंडळाचे ट्रस्टी चंद्रकांत कुंभार यांनी आभार मानले. याचबरोबर शिव अमृत दूध संघ, शिवरत्न शिक्षण संस्था, महर्षी संकुल सदाशिवराव माने विद्यालय, शिवशंकर बाजार, सुमित्रा पतसंस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती आदी संस्थांमध्ये सहकार महर्षींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच विजय चौक येथील सहकार महर्षींच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन करण्यात येऊन त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

शंकरनगर ग्रामपंचायतच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील यांनी सहकार महर्षींच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन केले. सायंकाळी विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट यांचे वतीने कारखाना स्थळावर ह.भ.प. अंकुश रणखांबे महाराज यांचे हरीकीर्तन झाले.



# अकलूजच्या महाशिवरात्री यात्रेचे विजयदादांच्या हस्ते उद्घाटन

### कृषी, औद्योगिक, पीक प्रदर्शन व दुग्ध स्पर्धा, जनावरांचा बाजार तसेच जंगी कुस्त्यांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१२ फेब्रुवारी-**

महाशिवरात्र यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज यांच्या वतीने दि.११ ते १६ या कालावधीत आयोजित केलेल्या महाशिवरात्र यात्रेचे उद्घाटन माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते यात्रा समितीचे कार्याध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत झाले.

यावेळी संचालिका कु. स्वरूपारांणी मोहिते पाटील, व्हा.चेअरमन शंकरराव माने देशमुख, ॲड. प्रकाशराव पाटील, शिवामृतचे व्हा. चेअरमन दत्तात्रय भिलारे, शंकरनगरच्या सरपंच वर्षाताई सरतापे, कारखान्याचे व परिसरातील विविध संस्थांचे आजी-माजी संचालक, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाशिवरात्र यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या महाशिवरात्र यात्रेत कृषी व औद्योगिक प्रदर्शन, पीक प्रदर्शन व स्पर्धा, दुग्ध स्पर्धा, जनावरांचा बाजार तसेच जंगी कुस्त्यांच्या फडाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेमधील विविध दालनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. रविवारी महाशिवरात्री दिवशी शिवपार्वती महा रुद्रभिषेक विश्वतेसिंह रणजीत सिंह मोहिते पाटील यांचे हस्ते होणार आहे.

दि.१६ रोजी दुपारी ३ वा. मल्लांच्या जंगी कुस्त्याच्या फडाचे उद्घाटन विजयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, सयाजिराजे मोहिते-पाटील यांचे हस्ते संपन्न होणार आहे.

# नवयुवकांनी शिक्षणासह राष्ट्रविकास अन् समाजसेवेसाठी पुढे यावे : जरांगे-पाटील

**▸▸मंगळवेढ्यात शिवजयंती निमित्त कार्यक्रम; येथील उत्सवाचे केले कौतुक**



**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.१२ फेब्रुवारी-**

आजच्या नवयुवकांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेत शिक्षण, राष्ट्रविकास आणि समाजसेवेत पुढे यावे. केवळ पुस्तकी शिक्षण नव्हे, तर स्वावलंबन, नेतृत्वगुण आणि शिस्त यांचे पालन करून समाजासाठी योगदान देणे महत्त्वाचे आहे. शिवरायांच्या विचारांनी प्रेरित होऊन आपले कार्य अधिक प्रभावी करण्याचा संकल्प केला पाहिजे. शिवरायांची आदर्श अशी जयंती मंगळवेढा प्रमाणे सर्वत्र साजरी केली पाहिजे असे मत संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी व्यक्त केले.

मराठा आरक्षण लढ्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये लढा उभा करणारे संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या उपस्थितीत मंगळवेढा येथे शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष भिमराव मोरे, माजी अध्यक्ष रामचंद्र वाकडे, पोलिस निरीक्षक दत्तात्रय बोरगिड्डे, मंडल अधिकारी धनंजय इंगवले, मराठा महासंघाचे अध्यक्ष अर्जुन चव्हाण, काळकोटे पाटील, माऊली पवार, नगरसेवक सोम नाथ आवताडे, नगराध्यक्षा सुनंदा आवताडे आदी उपस्थित होते.

यावेळी जरांगे पाटील म्हणाले, मराठा सम ाजाला आरक्षण मिळवून देण्याचे ध्येय घेऊन मी लढत आहे. माझा लढा मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याशिवाय बंद होणार नाही. कुणबी नोंदीच्या माध्यमातून समाजातील काही लोकांना लाभ मिळायला सुरुवात झालेली आहे, उर्वरित समाज बांधवांचा प्रश्नही शासनाकडून लवकरात लवकर सोडवून घेतला जाईल. शिवजयंती साजरी करणे, म्हणजे केवळ पोवाडे लावणे किंवा एखादा गाण्याचा कार्यक्रम करणे एवढ्यापुरते मर्यादित आहे का? खऱ्या अर्थाने शिवजयंती साजरी करणे, म्हणजे शिवरायांचे गुण आपल्या अंगी बाणवण्याचा निश्चय करणे होय. सध्या याला एका उत्सवाचे स्वरूप आले आहे. आपल्याला यामध्ये पालट करायचा आहे; कारण शिवरायांसारखे आदर्श जीवन जगणे, ही आजच्या काळाची आवश्यकता आहे. शिवरायांचे शौर्य, प्रशासनकौशल्य यांचे महत्त्व पटवून देत, आजच्या तरुणांनी त्यांचे विचार आचरणात आणावेत, असे आवाहन केले. त्यांनी शिवरायांचा आदर्श घेऊन समाजात एकता, शिस्त आणि राष्ट्रसेवेची भावना वृद्धिंगत करण्याचा संदेश दिला.

महाराष्ट्रात बहुसंख्य असलेल्या मराठा समाजा समोर सध्या अनेक मोठी आव्हाने उभे आहेत. अशा वेळेस तरुणांनी व्यसनापासून दूर राहून समाजाची एकी कायम ठेवून संघटित होऊन आव्हानांना सामोरे जावे. कार्यक्रमास मंडळाचे सर्व माजी अध्यक्ष, नेते, पदाधिकारी, शिवप्रेमी कार्यकर्ते, अधिकारी-कर्मचारी,व व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. रामचंद्र वाकडे यांनी प्रास्ताविक केले. भारत मुढे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.




# वैरागच्या लेकीची भरारी!

### प्राची गोवर्धन यांची कृषी उपसंचालक (वर्ग-१) पदी निवड

**तभा वृतसेवा,**
**वैराग, दि.१२ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा २०२४चा निकाल जाहीर झाला असून, यात वैराग (ता. बार्शी, जि. सोलापूर) येथील प्राची शाम गोवर्धन यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातून १४ वा क्रमांक पटकावला असून, महिला प्रवर्गातून त्या राज्यात प्रथम (१) आल्या आहेत. या घवघवीत यशाबद्दल त्यांची कृषी उपसंचालक (वर्ग-१) या उच्च पदावर निवड झाली आहे.

**बार्शी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा**

प्राची यांचे वडील शाम गोवर्धन हे वैराग परिसरातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्व असून ते वैराग येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. शैक्षणिक वारसा लाभलेल्या प्राची यांनी सुरुवातीपासूनच अभ्यासात सातत्य ठेवले होते. अत्यंत कठीण सम जल्या जाणाऱ्या कृषी सेवा परीक्षेत त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हे यश खेचून आणले आहे. त्यांच्या या निवडीमुळे वैराग शहरासह संपूर्ण बार्शी तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले असून, सोलापूर जिल्ह्याचा नावलौकिक राज्यस्तरावर उंचावला आहे.

**जिद्दीला कष्टाची जोड**

ग्रामीण भागातील सोयी-सुविधांचा वापर करून आणि जिद्दीच्या जोरावर स्पर्धा परीक्षेत यश मिळवता येते, हे प्राची यांनी सिद्ध करून दिले आहे. एका मुख्याध्यापकाच्या कन्येने थेट राज्याच्या कृषी विभागात वर्ग-१ चे पद मिळवल्याने सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्राची गोवर्धन यांच्या या यशाबद्दल वैराग मधील ग्रामस्थ, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि मित्रपरिवाराकडून त्यांचे कौतुक होत आहे. कृषी उपसंचालक म्हणून काम करताना महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी त्या प्रयत्नशील राहतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# मंगळवेढ्यात कृषी महाचर्चासत्र

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.१२ फेब्रुवारी-**



मंगळवेढा येथे शिवजयंतीनिमित्त आयोजीत डाळिंब-आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठीच्या कृषी महाचर्चासत्रास आज दि.१२ जानेवारीला सुरूवात झाली.

सकाळी १०.३० वाजता झालेल्या या चर्चासत्रात डाळिंब व आंबा पिकांचे शास्त्रीय व्यवस्थापन, पाणी व अन्नद्रव्यांचे संतुलित नियोजन, रोग-किड नियंत्रण, तण व्यवस्थापन तसेच उत्पादन वाढीसोबत जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, उत्पादन दर्जेदार व्हावे व शाश्वत शेतीकडे वाटचाल व्हावी, या उद्देशाने आयोजित या चर्चासत्राला तालुक्यातील व परिसरातील शेकडो शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाला अखिल भारतीय डाळिंब संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्रातील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ पोखरे, तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ, अजय अदाटे, आटपाडीचे डाळिंब मार्गदर्शक अक्षय सागर, प्रगतशील आंबा बागायतदार सचिन कुलकर्णी, तसेच डाळिंब बागायतदार भाऊसाहेब जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. तज्ज्ञांनी डाळिंब पिकात लागवड व बहार व्यवस्थापन, तेलकट व मर रोग नियंत्रण, किड व्यवस्थापन, पाणी व अन्नद्रव्य नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आंबा पिकासाठी लागवड पद्धती, मोहोर व्यवस्थापन, भुरी व खोड रोग नियंत्रण, किड नियंत्रण व आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देण्यात आला. कमी खर्चात अधिक उत्पादन कसे घ्यावे, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर बागायतीचे संरक्षण कसे करावे, यावरही शेतकऱ्यांना उपयुक्त सूचना देण्यात आल्या. या महाचर्चासत्रात शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष प्रश्नांना तज्ज्ञांनी थेट उत्तरे देत व्यावहारिक उपाययोजना सुचविल्या. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या अनुभवांचे आदान-प्रदान करत शेतीतील अडचणी मांडल्या. कार्यक्रमामुळे बागायतदारांमध्ये नव्या तंत्रज्ञानाबाबत जागृती निर्माण होऊन शास्त्रीय पद्धतीने शेती करण्याचा आत्मविश्वास वाढल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. शिवजयंतीच्या पवित्र दिवशी महाराजांच्या विचारांना अनुसरून शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी घेतलेला हा उपक्रम तालुक्यातील शेती विकासासाठी मैलाचा दगड ठरेल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.



कार्यक्रम यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे. दि.१३ फेब्रुवारी रोजी सकाळी ऊस १०० टन या विषयावर होणाऱ्या चर्चासत्रासाठी सर्व शेतकऱ्यांनी हजर रहावे असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. मंगळवेढ्यात शिवजयंतीनिमित्त शेतकऱ्यांसाठी आयोजीत या कृषी विषयक महाचर्चेचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. राज्यातील विषय तज्ञांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना मिळत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद आहे.

# गौडगाव येथे नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य संजय भड यांचा सत्कार

### एकता महिला मंचाच्या वतीने आयोजन; महिलांच्या विकासासाठी कटीबद्ध राहण्याची भड यांची ग्वाही



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.१२ फेब्रुवारी-**

बार्शी पंचायत समितीच्या गौडगाव गणामधून नवनिर्वाचित सदस्य म्हणून निवडून आल्याबद्दल श्री. संजय भड यांचा गौडगाव येथील एकता महिला मंचाच्या वतीने भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. गुरुवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संस्थानच्या आवारात हा सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते राहुल भड आणि एकता महिला मंचाचे मार्गदर्शक प्रभाकर क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. सदस्यांचे स्वागतासाठी महिलांनी गर्दी केली होती.

कार्यक्रमाची सुरुवात अतिशय नेटकेपणाने झाली. एकता महिला मंचाचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी मंचाच्या कार्याचा आढावा घेतला आणि संजय भड यांच्या निवडीमुळे गौडगाव गणाला एक सक्षम नेतृत्व मिळाल्याची भावना व्यक्त केली.

याप्रसंगी एकता महिला मंचाच्या पदाधिकारी व सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यामध्ये तालुका प्रमुख कविता दसवंत, तालुका कार्यकारणी सदस्य वसुधा कुंभार व रीना गुरव, तसेच मैना सोनवणे, सविता दसवंत, सुखनंदा सुरवसे, मथुरा दशवंत, शामल सुतार, अरुणा काजळे, मनीषा काजळे, मैना भड, उज्वला गुरव, अनिता दसवंत व अन्य सदस्यांचा समावेश होता.

सत्काराला उत्तर देताना संजय भड म्हणाले की, म हिलांच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कटीबद्ध राहील. पंचायत समिती सदस्य म्हणून काम करताना महिलांच्या विविध अडचणी आणि प्रलंबित प्रश्न सोडवण्याला माझे प्राधान्य असेल. येणाऱ्या काळात शासनाच्या आणि पंचायत समितीच्या विविध लोकोपयोगी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन. कार्यक्रमाच्या शेवटी एकता महिला मंच बार्शी तालुका प्रमुख कविता दसवंत यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या आशीर्वादाने आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा सोहळा यशस्वीरित्या संपन्न झाला. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संस्थानच्या आवारात हा सोहळा पार पडला. सदस्यांचे स्वागतासाठी महिलांनी गर्दी केली होती. बार्शी तालुक्यातील महिलांचे एकता महिला मंचच्या माध्यमातून संघटन चांगले असल्याने महिलांचा वेगळा आवाज निर्माण झाला आहे. या मंचच्या माध्यमातून महिलांच्या विविध प्रश्नावर तालुक्यात कार्यक्रम घेतले जात आहेत.